# आमची जागतिक मुसाफिरी

पुनम सिंगवी | अच्युत ओक



''इन मीन तीन'' जगप्रसिद्ध चीनी भिंतीच्या पार्श्वभूमिवर



शुभेच्छा कारंजे, रोम

# आमची जागतिक मुसाफिरी

लेखक
**पुनम सिंगवी * प्रा. अच्युत ओक**

**किंमत १५० रुपये**

अंकुर प्रकाशन, ठाणे
जिथे शिक्षणातून
ज्ञान उमलते

# अनुक्रमणिका

## विभाग १ : पुनम सिंगवी


१. कॅलिफोर्नियातील निसर्गरम्य 'योसेमिटे पार्क' ........ १३
(रंगीत फोटो पान क्र. १ फोटो क्र. १)
२. पश्चिमेकडील 'झाडाझडती' (पानगळ) ........ १९
(रंगीत फोटो पान क्र. १ फोटो क्र. २)
३. निसर्गरक्षण, शिक्षण आणि संशोधनात अग्रणी असलेली 'शिकागो बोटॅनिकल गार्डन' ........ २२
(रंगीत फोटो पान क्र. १ फोटो क्र. ३)
४. रॉक रॉक रॉकी ॲन्ड सॅन्ड सॅन्ड सॅन्डी ........ २५
(रंगीत फोटो पान क्र. २ फोटो क्र. ४)
५. पाश्चात्त्य सण 'हालोवीन' ........ २८
(रंगीत फोटो पान क्र. २ फोटो क्र. ५)
६. वृक्षसंस्कृतीचे धडे देणारे 'मॉर्टन आर्बोरिटम' ........ ३१
(रंगीत फोटो पान क्र. २ फोटो क्र. ६)
७. जपान : ऐश्वर्याच्या शिखरावर स्थिरावलेली एक औद्योगिक संस्कृती ........ ३४
(रंगीत फोटो पान क्र. ३ फोटो क्र. ७)
८. लंडनमधील अजब म्युझियम 'शेरलॉक होम्स' ........ ४०
(रंगीत फोटो पान क्र. ३ फोटो क्र. ८)
९. ईन–मीन–तीन, वॉक इन चीन ........ ४३
(रंगीत फोटो पान क्र. ३,४ फोटो क्र. ९–११, मुखपृष्ठ २)
१०. अज्ञानवासात जगणारी भारतातील 'पाचूची बेटे' लक्षद्वीप – मिनिकॉय ........ ५०
(रंगीत फोटो पान क्र. ४ फोटो क्र. १२)


## विभाग २ : प्रा. अच्युत ओक


११. ''यासार विद्यापीठ आंतरराष्ट्रीय परिषद'' आणि तुर्कस्तान २००७ ........ ५५
(रंगीत फोटो पान क्र. ५ फोटो क्र. १३)
१२. केनिया : पर्यटन आणि पर्यावरण ........ ५९
(रंगीत फोटो पान क्र. ५ फोटो क्र. १४)
१३. दर्यावर्दी ख्रिस्तोफर कोलंबस त्याच्या अस्थी, वंश, रंग आणि डीएनए ........ ६४
(रंगीत फोटो पान क्र. ५ फोटो क्र. १५)

१४. नॉर्वे–स्वीडन–फिनलंड (स्कँडेनेव्हियन राष्ट्रे) ........................................... ६७
(रंगीत फोटो पान क्र. ६ फोटो क्र. १६)
१५. काळे पाणी ते निळे पाणी... ........................................................................ ७२
(रंगीत फोटो पान क्र. ६ फोटो क्र. १७)
१६. रशियाची दोन महत्त्वाची शहरे : सेंट पीटर्सबर्ग आणि मॉस्को ..................... ७५
(रंगीत फोटो पान क्र. ६ फोटो क्र. १८,१९)
१७. रोहिडेश्वर, शनिवारवाडा ते पर्ल हार्बर ......................................................... ८०
१८. इजिप्त, ग्रीस आणि तुर्कस्तान ................................................................... ८३
(रंगीत फोटो पान क्र. ७ फोटो क्र. २०,२२)
१९. मोरोक्को आणि पोर्तुगाल ........................................................................... ९०
(रंगीत फोटो पान क्र. ८ फोटो क्र. २१)
२०. इटली, रोम आणि व्हेटिकन ........................................................................ ९६
(रंगीत फोटो पान क्र. ८ फोटो क्र. २३,२४)

– – –

**आमची जागतिक मुसाफिरी**

**पहिले मुद्रण : सप्टेंबर २०१४**

**लेखन आणि निर्मिती :**
पुनम सिंगवी
५/७०२, फ्लॉवर व्हॅली,
इस्टर्न एक्स्प्रेस हायवे,
ठाणे ४००६०१.
दूरध्वनी : ०९३२३२९१८९०
email :
punamsingavi@gmail.com

प्रा. अच्युत ओक
८ अमितश्री, १२वी गल्ली,
८५२, भांडारकर इन्स्टिट्यूट रस्ता,
पुणे ४११००४.
फोन नं. (०२०) २५६५५५१२
email :
achyutoak@gmail.com

**सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित**

**प्रकाशक आणि प्रमुख वितरक :**
**अंकुर प्रकाशन**
डॉ. आंबेडकर मार्ग,
ठाणे (पश्चिम)–१.
दूरध्वनी : ०२२–२५४७ ४६२२,
९९८७ ०५१५२९
website :
ankurpublications.com

**मुखपृष्ठ** : अश्विनी देशपांडे, पुणे.

**अक्षरजुळणी :**
**अक्षय फोटोटाइपसेटर्स,**
डॉ. आंबेडकर मार्ग,
ठाणे (पश्चिम)–१.

**मुद्रक** : राजमुद्रा प्रिंटर्स,
ए १८ – अमरग्यान औद्योगिक वसाहत,
लाल बहादूर शास्त्री मार्ग,
ठाणे (पश्चिम)–१.

’ आमची जागतिक मुसाफ़िरी’ या पुस्तकाचे लेखक श्री. पुनम सिंगवी आणि प्रा. अच्युत ओक हे आहेत. ‘अंकुर प्रकाशन’ यांनी ते २०१४ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना हे ई पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

**श्री पुनम सिंगवी,**

9323291890, email: punam.singavi@gmail.com

व **प्रा. श्री अच्युत ओक**

achyutoak@gmail.com

यांचे आभारी आहोत.

# ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# आमची जागतिक मुसाफ़िरी

## भाग १

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : ३ ऑगस्ट २०२०(नारळीपोर्णिमा- समुद्रपर्यटनारंभशुभदिन)**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

# लेखकांचे मनोगत

आम्ही दोघांनी आणि आमच्या मित्रपरिवाराने भारतात एकत्र प्रवास आणि पर्यटन बरेच केले आहे. परंतु परदेशात एकत्र प्रवास आत्तापर्यंत होऊ शकला नाही. व्यक्तिशः दोघांनी भारताचा किनारा सोडून परदेशांना कामासाठी आणि पर्यटनासाठी भेटी दिलेल्या आहेत. भारतातील पर्यटन अनुभवले आहे. त्यात फणसाडचे राखीव जंगल, बिहारचे नालंदा, कर्नाटकातील हाळेबीड-बेलूर, सिल्व्हासा, पंढरपूर वारीचा अभ्यास होता, तसेच नागझीराचे जंगल, नवेगावचे पक्षिअभयारण्य, पंचमढी परिसर, लक्षद्वीप बेटे इत्यादी होते. भारतातील आणि परदेशातील प्रवास आनंदमय आणि यशस्वी होण्यात आमचे सहप्रवासी आणि मित्र श्री. व्ही. के. केळकर, सौ. भावना केळकर, श्री. नितीन खरे, सौ. आसावरी खरे, प्राचार्य लक्ष्मण भोळे, सौ. आशालता भोळे श्री. रत्नाकर जावडेकर, सौ. विजया जावडेकर, सौ. पुष्पलता सिंगवी, श्री. दत्ताजी सहस्रबुद्धे आणि प्रा. शरद उमराणी यांनी दिलेले उत्स्फूर्त आणि हसतमुख सहकार्य कारणीभूत आहे. त्या सर्वांचे मनापासून आभार मानतो. पण परदेशातील अनुभव आम्हां दोघांना आजवर एकत्रित घेता आला नाही.

मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स, मुलुंड जिमखाना, हरियाली, ठाणे अशा निरनिराळ्या शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांच्या उपक्रमांमध्ये/सभांमध्ये आम्ही भेटत असू आणि दर वेळी परदेशात एकत्र पर्यटन करण्याचा विचार चर्चेत येत असे. याच विचारातून दोघांचे परदेशप्रवासाचे अनुभव एकत्र करण्याचे आणि पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे ठरले. अतिपूर्वेतील जपानपासून पूर्वेकडून पृथ्वीप्रदक्षिणा सुरू करून हवाई बेटांची राजधानी होनोलूलू, अमेरिका, इंग्लंड, युरोप, तुर्कस्थान, इजिप्त, केनिया, चीन अशी परिक्रमा संपते.

दोन निरनिराळे लेखक, निरनिराळे देश, निरनिराळे अनुभव, निरनिराळी निरीक्षणे, सौंदर्यस्थळे या सर्वांच्या मिश्रणातून तयार केलेले खास मराठमोळे रुचकर ‘थालीपीठ’ वाचकांना नक्कीच आवडेल या हेतूने सादर करण्यात आम्हांला आनंद होत आहे.

ह्या संग्रहातील बरेच लेख वृत्तपत्रातून अथवा अन्य ठिकाणी प्रसिद्ध झालेले आहेत ते त्या-त्या प्रकाशकांच्या सौजन्याने समाविष्ट केलेले आहेत. मूळ लेखात आवश्यक ते बदल केलेले आहेत. दिनांक आणि वर्ष यांचा उल्लेख गरज भासल्यास केला आहे. प्रत्येक प्रवासात नवीन मित्र, नवीन ओळखी, असा परीघ वाढतच गेला. त्या सर्वांचा उल्लेख खूप लांबेल म्हणून नामनिर्देश न करता त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. या जगप्रवासात आमचे कुटुंबीय आणि मित्रवर्ग यांच्या सहकार्याने सर्व गोष्टी सुलभ होत गेल्या, आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

'आमची जागतिक मुसाफिरी' या प्रवासवर्णनात्मक लेखसंग्रहास डॉ. नितीन काकोडकर, आय.एफ.एस., मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण वृत्त) महाराष्ट्र राज्य, यांनी प्रस्तावना आणि चार शब्द दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सौ. अश्विनी देशपांडे, इलेफंट डिझाईन, पुणे यांनी पुस्तकाचे सुरेख मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ करून दिले. तसेच आतील कव्हर पेज आणि रंगीत फोटोंची आखणी श्री. विकास फडके यांनी सुंदररीत्या करून दिली याबद्दल त्यांचे मनापासून आभार. वेळोवेळी लेख वाचून, परीक्षण करून सूचना आणि सुधारणा सुचविल्याबद्दल श्री. हर्षद आणि सौ. संगीता ओक, ॲड. सौ. चारुशीला काणे तसेच श्री. जगन्नाथ बहाळकर यांना धन्यवाद देतो.

पुण्याच्या उन्मेष प्रकाशनच्या सौ. मेधा राजहंस यांनी केलेल्या काही मौलिक सूचनांसाठी त्यांचे खास आभार मानायला हवेत.

या पुस्तकाची सर्वांगसुंदर छपाई करण्याचे व ते वेळेनुसार प्रकाशित करण्याच्या कामाचे श्रेय राजमुद्रा प्रिंटर्सचे श्री. राजन फडके आणि श्री. मिश्राजी, अंकुर प्रकाशनच्या सौ. वृषाली फडके, आणि त्यांचे सहकारी यांच्याकडे जाते.

२ सप्टेंबर २०१४

पुनम सिंगवी अच्युत ओक

# लेखक श्री. पुनम सिंगवी यांचा संक्षिप्त परिचय

'पुनम सिंगवी' (पुनमचंद उत्तमचंद सिंगवी) हे शिक्षण आणि व्यवसायाने चार्टर्ड अकाउन्टन्ट. सुमारे बारा वर्षे मुंबई येथील पोदार आणि मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये अध्यापन. लघुउद्योग प्रकल्पांच्या निर्मितीत प्रमुख सहभाग. 'स्पन पाईप' या स्पन पाइप्स् मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मासिकाचे संस्थापक-संपादक. मुलुंड जिमखाना आणि हरियाली आदी सेवाभावी संस्थांचे जनक.

मध्यमवर्गीय सुशिक्षित, सुसंस्कृत शेतकरी-उद्योजक कुटुंबात जन्म. प्राथमिक शिक्षण धुळे जिल्ह्यातील फागणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, तर माध्यमिक शिक्षण धुळे व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईसारख्या ठिकाणी. त्यामुळे व्यक्तिमत्त्व सव्यसाची होण्यास मदत.

शालेय जीवनापासूनच भटकंती आणि रचनात्मक सामाजिक कार्याची आवड. भटकंतीच्या आवडीतून पर्यावरणरक्षणाच्या रचनात्मक कार्यात जोडले गेले. ठाणे परिसरात पर्यावरणविषयक जनजागृती निर्माण करण्यात सिंहाचा वाटा.

हरियालीच्या माध्यमातून लक्षावधी वृक्षांची लागवड करण्यात प्रमुख सहभाग. पर्यावरणरक्षण, भटकंती आदी विषयांवर विपुल वृत्तपत्रीय लिखाण. ठाणे गौरव, ठाणे नगररत्न, व्यासरत्न, वसुधा महाबळ पुरस्कार आदी विविध पुरस्कारांचे व सन्मानांचे मानकरी. महाराष्ट्र राज्याच्या वनविभागातर्फे मानद वन्यजीव रक्षक म्हणून सन्मानित. वनविभाग आणि ठाणे महानगरपालिका यांच्या विविध समित्यांवर सेवाभावी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत.

सध्या वास्तव्य ठाणे येथे.

५/७०२, फ्लॉवर व्हॅली, पूर्व द्रुतगती मार्ग,
ठाणे ४००६०१
punamsingavi@gmail.com

# लेखक प्रा. अच्युत ओक यांचा संक्षिप्त परिचय

सांख्यिकी, वॉटर रिसोर्सेस इन्व्हेस्टिगेशन सर्कल, पुणे.

सिनियर सायंटिफिक ऑफिसर, डिफेन्स सायन्स सर्व्हिस, भारत सरकार,

प्राचार्य (नि.), मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई ४०० ०८०

संचालक (नि.), इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड प्रोफेशनल स्टडीज, मुंबई.

गणित, संख्याशास्त्र, ऑपरेशन रिसर्च या विषयांतील पुस्तकांचे लेखक.

संख्याशास्त्र, क्वालिटी कंट्रोल, अर्थशास्त्र, शिक्षण या विषयांवरील लेख/शोधनिबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांतून, मराठी विश्वकोश इत्यादीत प्रसिद्ध झाले आहेत आणि प्रत्यक्ष वाचलेले आहेत.

देशात आणि परदेशात विस्तृत पर्यटन आणि त्यावरील लेख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध.

मुलुंड जिमखाना व हरियाली, ठाणे या संस्थांचे विश्वस्त. सुहृद मंडळ, पुणे; महाराष्ट्र महाविद्यालयीन प्राचार्य समिती; वंचित विकास, पुणे; मुंबई बुद्धिबळ असोसिएशन; मुंबई विद्यापीठ; मुंबई महापौर फंड समिती अशा अन्य संस्थांमध्ये आजी/माजी पदाधिकारी.

स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट (माजी) महाराष्ट्र शासन.

सध्या वास्तव्य पुणे येथे.

८ अमितश्री, १२वी गल्ली,
८५२, भांडारकर इन्स्टिट्यूट रस्ता,
पुणे ४११००४
फोन नं. (०२०) २५६५५५१२
achyutoak@gmail.com

## पुनम सिंगवी यांनी लिहिलेली अन्य पुस्तके

ग्यानबाची भटकंती
ग्यानबाचे पर्यावरण
झेप (काव्यसंग्रह – सहभाग)
हम (हिंदी काव्यसंग्रह – सहभाग)
Ready Referencer to Incometax Act and Cases
(English - jointly with Adv. M. K. Gore)
आहे माझे ठाणे सुंदर, तरीही...! (फक्त इंटरनेट आवृत्ती)

## प्रा. अच्युत ओक यांनी लिहिलेली अन्य पुस्तके

1. Mathematical Techniques; Oak, Dharmadhikari and Zarapkar; Himalaya Publications, Mumbai
2. Statistical Techniques; Oak, Dharmadhikari and Zarapkar; Himalaya Publications, Mumbai
3. Operations Research for Management; Oak, Dharmadhikari and Zarapkar; Himalaya Publications, Mumbai
4. खेळांचा वाद (Theory of Games) अ. द. ओक, अप्रकाशित, महाराष्ट्र विद्यापीठ महामंडळ, नागपूर.

# प्रस्तावना

प्राचार्य अच्युत ओक यांनी मला 'आमची जागतिक मुसाफिरी' ह्या पुस्तकाची प्रस्तावना तुम्ही लिहिणार का असे विचारताच मी सहमती दर्शविली, याला तीन कारणे आहेत. एक म्हणजे प्रा. अच्युत ओक यांच्यासारख्या उच्चशिक्षित आणि आदरणीय व्यक्तीकडून आलेली विनंती, दुसरे म्हणजे दुसरे लेखक श्री. पुनम सिंगवी यांच्या कामाची, जवळून पाहणी करण्याचा, ठाण्याला कार्यरत असताना आलेला योग व त्यांच्या कार्यातून त्यांच्याशी झालेली ओळख; आणि तिसरे व अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे मुसाफिरीशी माझं असलेलं अतूट नातं.

राज्याचे निसर्गपर्यटन धोरण तयार करताना मी खारीचा वाटा उचलला होता. E.F. Schumacher यांच्या 'Small is Beautiful' या पुस्तकातील सिद्धान्ताचा आधार हे धोरण तयार करताना घेण्यात आला होता. त्यामध्ये मुख्यत्वे तीन गोष्टी विचारात घेण्यात आल्या होत्या.

१) निसर्गाचा ऱ्हास न होऊ देता किंबहुना निसर्गामध्ये सुधारणा होईल एवढ्या प्रमाणातच नैसर्गिक स्थळांचा आनंद घ्यायचा.

२) स्थानिक लोकांना निसर्गपर्यटनामुळे रोजगाराच्या संधी प्राप्त करून द्यायच्या.

३) आलेला पर्यटक, निसर्गसंवर्धनाच्या दूताचे काम करण्यास प्रेरित होईल अशा प्रकारे त्याला माहिती देण्याची व्यवस्था करायची.

या पुस्तकातील लेख वाचताना निसर्गपर्यटन धोरणाशी सुसंगत असलेली कितीतरी उदाहरणे आपल्याला मिळतात. याचे अनुकरण आपल्या देशातही हळूहळू होत आहे. त्याचप्रमाणे स्थानिक परिस्थितीनुसार त्यात आवश्यक बदल घडवून काही नवीन कल्पनाही अमलात येत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे.

प्राचार्य ओक व श्री. सिंगवी यांच्या लेखांमध्ये नियमित प्रवासवर्णनापेक्षा एक वेगळी हाताळणी प्रकर्षाने जाणवते. हे लेख वाचताना आपण नीरस असं Travel Guide वाचत नाही असं वाचकांच्या लक्षात येईल. मात्र आवश्यक तिथे महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे हे विशेष. सर्वसामान्य पर्यटकाला जे सहजपणे दिसणार नाही

किंवा ज्या बाबी त्याचं लक्ष वेधून घेणार नाहीत त्याबाबत विस्तृत लिखाण करण्यात आलं आहे.

ही लेखमाला फक्त ४-५ देशांतील मुसाफिरीनंतर वाचकांसमोर सहज आणता आली असती, कारण दोन्ही लेखकांकडे तेवढे अनुभव नक्कीच आहेत. मात्र अनेक स्थळांची वर्णने यामध्ये आपल्याला आढळतात. अगदी केनियातील वन्यजीववैभवाच्या वर्णनापासून अमेरिकेतील वनांमध्ये होणारी आकर्षक पानगळ, लंडनमधील शेरलॉक होम्स म्युझियमपासून नॉर्वे-स्वीडन-फिनलंड या स्कँडेनेव्हियन राष्ट्रांमधील समुद्रातील क्रूझमधला अनुभव एवढ्या विविध विषयांची हाताळणी लेखकांनी मनोरंजक पद्धतीने केली असून त्यामधून काय बोध घेता येईल याची वेळोवेळी जाणीव करून दिली आहे.

पर्यटकांना काय दाखवावे हा प्रत्येक पर्यटनस्थळाच्या व्यवस्थापकाला भेडसावणारा प्रश्न असतो. ज्या ठिकाणी परदेशी पर्यटक येतात तिथे येणारा पर्यटक नेहमी त्याच्या स्वतःच्या देशात असणाऱ्या गोष्टींशी संबंध जोडत असतो. त्यामुळे स्थानिक व्यवस्थापकाला सर्वसाधारण वाटणाऱ्या बाबी विदेशी पर्यटकाला मात्र असामान्य अथवा interesting वाटू शकतात. याचा अनुभव साधारण २० वर्षांपूर्वी नागपूरहून निघून मेळघाट व्याघ्रप्रकल्पाला भेट देण्यास आलेल्या US Fish and Wildlife Service च्या चमूसोबत जाताना मला आला. नागपूर ते मेळघाट हे सुमारे ३०० किलोमीटर्सचे अंतर कापताना या चमूशी काय बोलावे याबाबत मी विचारात होतो. मेळघाट व्याघ्रप्रकल्प बघायला आलेल्या व्यक्तींना तुरळक झाडी असलेल्या रस्त्याच्या सभोवताल काय विशेष दाखवावे हा प्रश्नच होता. मात्र नागपूर शहर पार करताच आपल्याला सर्वसाधारण वाटणाऱ्या गोष्टींबाबत या विदेशी पाहुण्यांकडून प्रश्नांचा जो भडिमार सुरू झाला आणि कॅमेऱ्यामधून जे फोटो काढणे सुरू झाले ते अमरावती येईपर्यंत सतत सुरू होते! तीन ते चार पितळेचे हंडे तोल सावरत डोक्यावरून घेऊन जाणाऱ्या स्त्रिया हा परदेशी पाहुण्यांच्या दृष्टीने कुतूहलाचा व अत्यंत वेगळा असा अनुभव होता. त्यामधून interpretation म्हणजे काय याचे नेमके धडे मला मिळत गेले जे पुढील सेवाकालावधीत मी बऱ्याच ठिकाणी अमलात आणले.

असेच काहीसे अनुभव प्राचार्य ओक व श्री. सिंगवी यांचे लेख वाचताना आपल्याला येतील. दोघांनीही विविध देशांमध्ये फिरत असताना त्यांना आलेले अनुभव व त्यांनी नोंदविलेल्या गोष्टी वाचकांसमोर अत्यंत सरळ भाषेत व मनोरंजनामधून ज्ञान या प्रकारे आणल्या आहेत.

अजून कितीतरी अनुभव त्यांच्या गाठीशी असतील याची खातरी त्यांच्या लिखाणावरून पटते. यापुढेही असेच लेखांचे संच आपल्या हाती येतील ही सदिच्छा व्यक्त करत आहे.

धन्यवाद!

नितीन काकोडकर<br>
आय. एफ. एस.<br>
मुख्य वनसंरक्षक<br>
महाराष्ट्र राज्य

# या पुस्तकातील शुद्धलेखन

१) खात्री (✗); खातरी (✓)

खातरी हा शब्द जोडाक्षरविरहित आहेत. होते असे की, बोलण्याच्या सहज ओघात आणि सहज वेगात हा शब्द जोडाक्षरयुक्त असल्याप्रमाणे ऐकायला येतो आणि म्हणून अज्ञानाने जोडाक्षरयुक्त लिहिण्याची प्रथा पडली. वस्तुस्थिती अशी आहे की, ह्या शब्दाव्यतिरिक्त आणखी शेकडो शब्द असे जोडाक्षरयुक्तच ऐकायला येतात, परंतु ते मात्र तसे लिहिण्याची प्रथा पडली नाही. 'खातरी' शब्दाशी निगडित अशी काही उदाहरणे देतो –

कोपरी, खापरी, घाबरी, चावरी, जबरी, तगरी, दुसरी, धावरी, नगरी, बाजरी, बोचरी, भाकरी, भोसरी, मोगरी, लाजरी, सासरी, हसरी इत्यादी.

'खातरी' शब्दाशी निगडित नसलेली इतर उदाहरणे बरीच आहेत, परंतु ती देण्याची आवश्यकता आता वाटत नाही.

२) औद्योगीकरण (✗); औद्योगिकीकरण (✓)

'औद्योगिकीकरण' हा शब्द '+ई+करण' अशा प्रत्ययाने झाला आहे. ह्या प्रकाराला 'गतिसमास' म्हणतात. असा समास होण्यासाठी मुळात एखादे नाम किंवा एखादे विशेषण अस्तित्वात असावे लागते. उदाहरणार्थ 'शहर' ह्या नामापासून 'शहरीकरण' असे नाम होते, तर 'नूतन' ह्या विशेषणापासून 'नूतनीकरण' असे नाम होते. त्याप्रमाणे 'उद्योग' ह्या नामापासून 'उद्योगीकरण' (उद्योगांची निर्मिती) असे नाम होते, तर 'औद्योगिक' ह्या विशेषणापासून 'औद्योगिकीकरण' (उद्योगजन्य परिस्थितीची निर्मिती) असे नाम होते. परंतु आपल्याकडे नुसता 'औद्योग' असा शब्द नाम किंवा विशेषण म्हणून उपलब्धच नाही. त्यामुळे 'औद्योगीकरण' असे रूप होऊ शकत नाही.

३) रितीने आणि रीतीने – दोन्ही बरोबर

'रीत' हा शब्द मराठी. ह्याचे सामान्यरूप 'फीत'प्रमाणे होते. जसे 'फितीने', तसे 'रितीने'. 'रीति' हा संस्कृत ऱ्हस्वान्त शब्द आपण नियमानुसार मराठीत 'रीती' असा दीर्घान्त लिहितो. ह्याचे सामान्यरूप 'रीतीने' असे होते. त्यामुळे 'रितीने' (मराठी) आणि 'रीतीने' (संस्कृत) ही दोन्ही रूपे बरोबर आहेत. परंतु मराठीत लिहिताना शक्य तिथे उपलब्ध मराठी शब्द वापरावा ह्या धोरणानुसार ह्या पुस्तकात 'रितीने' हे रूप असावे.

– अरुण फडके
संपादक, मराठी लेखन-कोश

# १. कॅलिफोर्नियातील निसर्गरम्य 'योसेमिटे पार्क'

**आधुनिकीकरणाच्या नावाखाली मानवाने निसर्गावरच हल्ला चढवला. मात्र अशा परिस्थितीतही अमेरिकेतील जॉन मूरसारख्या पर्यावरणवाद्यांनी अमेरिकेच्या योसेमिटे खोऱ्याच्या सौंदर्याच्या जतनासाठी व संवर्धनासाठी आंदोलन करून योसेमिटे राष्ट्रीय उद्यान विकसित केले.**

'कॅलिफोर्निया' हे अमेरिकेतील एक अत्यंत सुंदर, समृद्ध आणि प्रगत राज्य मानले जाते. आपल्याकडे वेगवेगळ्या काळांत वेगवेगळ्या कारणांसाठी कॅलिफोर्निया सतत चर्चेत राहिले आहे. माझ्या शालेय आणि महाविद्यालयीन काळात, म्हणजे १९५० ते १९७० या काळात आम्हांला कॅलिफोर्नियाचा परिचय 'अमेरिकेतील कोकण' असा करून दिला जात असे. किंबहुना 'कोकण' म्हणजे निसर्गसौंदर्याची खाण ! आंबा, काजू, फणस, कोकम इत्यादी फळांचे आगरच ! एका बाजूने फेसाळणारा समुद्र आणि दुसऱ्या बाजूला सह्याद्रीची पर्वतरांग, गच्च झाडोरा, उन्हाळ्यात लुप्त होणारे पावसाळी धबधबे असे सौंदर्याने ओतप्रोत असलेले कोकण म्हणजेच कॅलिफोर्निया, असे त्या वेळी आम्हांला सांगितले जायचे; आणि अमेरिकेत जाऊन आलेला कोकणातील प्रत्येक उद्योजक आणि शेतकरी (हे सगळे अगदी मोजकेच असत!) कोकणचे रूपांतर कॅलिफोर्नियात करण्याचे स्वप्न बघत असत. मात्र आजवर त्यांचे हे स्वप्न पूर्ण होऊ शकलेले नाही.

त्यानंतरच्या काळात जवळजवळ सबंध भारतातून दारूबंदीचे उच्चाटन झाल्यानंतर कॅलिफोर्नियातील द्राक्षबागा आणि त्यांपासून तयार होणाऱ्या 'कॅलिफोर्निअन वाइन'ने त्या राज्याची ओळख येथे कायम ठेवली. त्याच राज्यातील हॉलीवूड आणि डिस्नेलॅण्डने करमणुकीच्या क्षेत्रांतही अमेरिकेत कॅलिफोर्नियाला अग्रस्थानी ठेवले आहे आणि आता 'सिलिकॉन व्हॅली'! अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यालाच 'सिलिकॉन व्हॅली' ही उपाधी मिळालेली आहे. आजचे युग हे संगणक आणि माहिती-तंत्रज्ञानाचे युग

आहे. त्यावर सिलिकॉन व्हॅलीची सत्ता आहे. भारतातील सर्व राज्यांमध्ये आपापल्या राज्यांत 'सिलिकॉन व्हॅली' निर्माण करण्याची स्पर्धा लागलेली आहे. सुशिक्षित युवा पिढीच्या मनात आज 'हॉलिवूड'पेक्षा 'सिलिकॉन व्हॅली'चा ध्यास अधिक आहे.

असे हे कॅलिफोर्निया राज्य अमेरिकेतील सर्वांत अधिक लोकसंख्या असलेले, सर्वाधिक संपत्तीचे उत्पादन करणारे, सर्वाधिक मोटारी असलेले, सर्वाधिक खर्चिक जीवनपद्धती असलेले आणि शेती-उत्पादनातही आघाडीच्या काही राज्यांमध्ये असलेले राज्य आहे.

असे राज्य वनसंपत्ती आणि राष्ट्रीय उद्यानांच्या बाबतीतदेखील कसे मागे राहील? याच राज्यात सर्वांत प्रथम राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित झालेले आणि आजमितीसही अग्रगण्य असलेले अमेरिकेचे एक राष्ट्रीय उद्यान आहे - 'योसेमिटे राष्ट्रीय उद्यान'! अमेरिकेत वसलेले भारतीय वंशाचे लोक गमतीने त्याचा उल्लेख 'यशोमती पार्क' असाच करतात.

नेवाडा पर्वतराईतील हे उद्यान मध्य कॅलिफोर्नियातील पूर्व सीमेलगत सुमारे एक हजार एकशे सत्तर चौ. मैलांवर पसरलेले आहे. वाढते औद्योगिकीकरण आणि वेगवेगळ्या विकासयोजना यांमुळे नैसर्गिक वनसंपत्तीवर जगातील सर्वच राष्ट्रांकडून विध्वंसाचे आघात होत असतात. तसेच आघात अमेरिकेतदेखील होत आलेले आहेत. मात्र यांमुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीचीदेखील दखल अलीकडच्या काळात अमेरिकेतच प्रथम घेतली गेली. इ.स. १८६४मध्ये तेथील एक पर्यावरणवादी 'जॉन मूर' यांच्या पुढाकाराने योसेमिटे खोऱ्यातील वन आणि त्याचे अद्वितीय सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी एक चळवळ सुरू झाली. अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनी त्याची दखल घेतली. इ.स. १८९० मध्ये याविषयीचा कायदा करण्यात आला. त्यानंतर अमेरिकेतील पहिले राष्ट्रीय उद्यान म्हणून योसेमिटेचा विकास करण्याची एक विस्तृत योजना तयार करण्यात आली व पुढील काळात ती राबविली गेली. त्यामुळेच आज योसेमिटे हे अमेरिकेतील प्रमुख राष्ट्रीय उद्यानाच्या स्थानावर येऊन पोहोचले आहे. त्या वेळी जॉन मूरने योसेमिटेचे वर्णन करताना उद्गार काढले होते - "A Landscape... that after all my wanderings, still appears as the most beautiful & I have ever beheld." समुद्रसपाटीपासून

सुमारे सहा ते नऊ हजार फूट उंचीवर पसरलेल्या या राष्ट्रीय उद्यानात काय नाही! आपल्याकडील हिमालयातील बर्फाच्छादित शिखरांप्रमाणे येथील सर्व परिसर हिवाळ्यात संपूर्णपणे बर्फाळलेला असतो. उत्तरेकडून वाहत येणाऱ्या हिमनद्या पूर्णपणे गोठतात. एरवी मात्र येथे सर्व बाजूंनी कायमस्वरूपी धबधब्यांची रेलचेल असते. केंद्रभागी असलेला योसेमिटे धबधबा तीन टप्प्यांत विभागला गेला असून त्याची एकूण उंची दोन हजार चारशे पंचवीस फूट आहे. तो उत्तर अमेरिकेतील सर्वांत उंच धबधबा असून सबंध जगात त्याचा पाचवा क्रमांक लागतो.

'ब्रायडल व्हेल' धबधबा (Bridel Veil) सहाशे वीस फूट उंचीवरून कोसळताना व प्रवाहाच्या दोन्ही बाजूंनी वाऱ्याच्या झंझावातामुळे फेसाळताना पाश्चात्त्य वधूने परिधान केलेल्या वेषभूषेसारखा दिसतो, तर उन्हाळ्यात नेवाडा धबधब्याच्या पायथ्याशी इंद्रधनूचा सातत्याने नाच सुरू असतो. निसर्गप्रेमींना आकर्षून घेणारे रिबन फॉल, इलिलोट फॉल यांसारखे इतर अनेक धबधबे येथे आहेत.

उंचच उंच वाढत जाणारे आणि हजारांहून अधिक वर्षं आयुष्य असलेले हिमपर्णी सिकोवा वृक्ष हे येथील खास आकर्षण ! मारी पोसा क्षेत्रात प्रामुख्याने असलेले हे वृक्ष जगातील सर्वाधिक आयुष्य लाभलेले जिवंत घटक (Longest Living Things In The World) मानले जातात. पाच-पाच जणांनी साखळी करूनही आमच्या एकत्रित कवेत न सामावू शकणारे अनेक वृक्ष आम्ही येथे पाहिले. पाइन आणि ॲप्रिकॉट हे येथील आणखी प्रमुख मोठे वृक्ष विपुल प्रमाणात दिसून येतात. हिवाळ्यात बर्फवृष्टी आणि वादळामुळे अनेक प्रचंड वृक्ष येथील जंगलांत जागोजागी पडलेले दिसून येतात. मात्र त्यांना तेथून हटवून लिलावात विकले जात नाही किंवा लाकूडचोरांच्या हवालीही केले जात नाही. निसर्गतः पडलेल्या अशा वृक्षांचे नैसर्गिकरीत्या विघटन होऊ देण्यानेच निसर्गाचे संवर्धन होते, या सुज्ञ जाणिवेमुळे ते तशा अवस्थेत वर्षानुवर्षे पडून असतात. तेव्हा तेथे अनेक प्रकारचे कीटक वस्ती करून राहतात. त्या कीटकांना खाणारे पक्षी आणि इतर वन्य प्राणीदेखील त्यामुळे तेथे येत राहतात. त्यामुळे जमिनीवर विसावणारा, उन्मळून पडलेला असा एकेक वृक्ष म्हणजे निसर्गातील अनेक घटकांचे वास्तव्य असलेली

वसाहतच होऊन जातो! जंगलातून फेरफटका मारत असताना इतर अनेक ठिकाणीदेखील असेच दृश्य दृष्टीस पडते.

धबधबे आले, म्हणजे ते पाणी पुढे वाहत नेणारे अनेक ओढे आले. तसेच त्या ओढ्यांचे पाणी खोलगट ठिकाणी साठून तयार झालेले अथवा बांध घालून तयार केलेले तलाव आले. मर्सिड रिव्हर आणि मिरर लेक ही येथील उल्लेखनीय आकर्षण केंद्रे आहेत. मर्सिड नदीत तयार झालेली 'हॅपी आइल्स' ही जुळी बेटे आणि त्यांच्या परिसरातील पक्षी प्रवाशांना खूपच आनंद देऊन जातात. आत्यंतिक व्यथित मनाने आलेली व्यक्ती हॅपी आइल्सला भेट दिल्यानंतर आनंदित झाल्याशिवाय परत जाऊच शकत नाही, अशी येथील आख्यायिका आहे. या परिसरात १९९६ साली झालेल्या हिमवादळात दरड कोसळीमुळे सुमारे ऐंशी हजार खडक तासाला एकशेवीस मैलांच्या वेगाने खाली येऊन कोसळल्याच्या माहितीची येथे नोंद करण्यात आली आहे. अशा रितीने कोसळून पडलेले प्रचंड दगड, धोंडे व खडकदेखील तिथेच डोंगराच्या कडेने जागच्याजागी सुरक्षितरीत्या अडवून ठेवलेले आहेत!

येथील 'अल कपितान' नावाचा प्रचंड खडक ७५६९ फूट उंचीवरून सरळसोट आपल्यासमोर उभा ठाकतो तेव्हा बोट तोंडात गेल्याशिवाय राहत नाही. हा खडक 'रॉक ऑफ जिब्राल्टर'पेक्षा मोठा आणि मजबूत असल्याचे सांगण्यात येते. हाफ डोय सेन्टिनेल रॉक यांसारखे येथील इतर प्रचंड सुळके हिमनद्यांनी पोखरलेले दिसतात. बर्फ नसताना नाना तऱ्हेच्या वनस्पती आणि अरण्यफुले आपले लक्ष वेधून घेतात. हिवाळ्यात मात्र सगळीकडील बर्फाचा प्रचंड थर पार्कमध्ये शुकशुकाट करून टाकतो.

माउंटन लायन आणि महाकाय आकाराचे अस्वल हे येथील प्रमुख वन्य प्राणी आहेत. हिवाळ्यात जंगलातील गुहेत आश्रयाला राहिलेली अस्वले बर्फ वितळू लागून प्रवाशांची वर्दळ सुरू झाल्याबरोबर अन्नासाठी मानवी वस्त्यांकडे फिरकू लागतात. अन्नाचा सुगावा लागल्याबरोबर अस्वले रात्री त्याचा फडशा पाडतातच. म्हणून उघड्यावर कोठेही, तसेच रात्री बंद गाड्यांमध्येदेखील खाद्यपदार्थ ठेवण्यावर सक्त बंदी असते आणि ती कटाक्षाने राबविली जाते. तरीदेखील काही हलगर्जी प्रवासी निघतातच ! अशा वेळी अस्वल बंद गाड्यांवर हल्ले करून, गाड्यांची मोडतोड करत त्या खाद्यपदार्थांचा फडशा पाडतात. इ.स. २००० या वर्षात झालेल्या अशा

सहाशे चोपन्न हल्ल्यांमध्ये ३०६ मोटारगाड्यांचे आणि सुमारे १,२६,००० डॉलर्स एवढ्या किमतीच्या संपत्तीचे नुकसान झाले! त्यामुळेच येथे रस्त्यांच्या कडेने ठेवलेल्या कचरापेट्यादेखील मजबूत लोखंडाच्या आणि बंदिस्त स्वरूपाच्या (पोस्टाच्या पेट्यांसारख्या) असतात. कुत्र्यासारख्या पाळीव प्राण्यांना मोकळ्या जागेवर अथवा बंदिस्त गाड्यांमध्ये उघड्यावर ठेवले, तर सिंह त्यांना उचलणारच! सशाएवढ्या आकाराच्या धिटुकल्या खारी येथे मुक्त विहार करत असतात. येणाऱ्या प्रवाशांना त्यांच्यापुढे लाह्या आणि इतर खाद्यपदार्थ टाकण्याचा मोह होत असतो. मात्र तसे करण्यावर सक्त बंदी असते. असे केल्यास या प्राण्यांच्या खाद्यसवयी बदलून त्यामुळे सबंध निसर्गचक्रावर विपरीत परिणाम घडताना आढळून येतो असे उद्यानरक्षकांनी सांगितले. 'ॲसमेल डॅम' हा अमेरिकेतील एक आघाडीचा प्रकाशचित्रकार आहे. त्याने आपल्या व्यावसायिक जीवनाची पन्नास वर्षे योसेमिटे पार्कचे प्रकाशचित्रण करण्यात घालविली असून येथे त्याच्या प्रकाशचित्रांची सुरेखशी गॅलरी आहे.

येथे येणाऱ्या प्रवाशांना निसर्गाशी सुसंवाद साधता यावा, यासाठी प्रचंड सुविधा उपलब्ध करून दिलेल्या असतात. जंगलातून हिंडण्यासाठी सुरक्षित पायवाटा तयार करून त्यांना नकाशावर स्थान देण्यात आले आहे. ठिकठिकाणी त्यांचे स्थान आणि दिशा दाखविणाऱ्या दर्शिका लावलेल्या आहेत. पर्यटनस्थळांवर लहान मुलांना आणि अपंगांनादेखील नेता यावे, याकरिता बाबागाड्यांसाठी वेगळे मार्ग केलेले आहेत आणि अशा मार्गांवरून इतरांना चालण्यास पूर्ण मज्जाव असतो. सायकलने जाण्यासाठीदेखील वेगळ्या वाटा आहेत. सायकल्स बरोबर न आणणाऱ्यांसाठी त्या उद्यानात सायकल्स भाड्याने मिळण्याची सोय असते. येणाऱ्या प्रवाशांच्या निवासासाठी वेगवेगळ्या सुखसोयी असलेली विश्रामगृहे, वसतिगृहे आणि प्रचंड मोठी, पण सुरक्षित तंबू-मैदाने (Camping Grounds) आहेत. प्रवाशांना सर्व प्रकारची माहिती आणि मार्गदर्शन मिळावे, यासाठी उद्यानाच्या वेगवेगळ्या विभागांत माहितीकेंद्रे, निसर्गपरिचय केंद्रे आहेत. अशी केंद्रे उभारताना निसर्गाशी विसंगत असे कुठलेही बांधकाम केलेले अथवा भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या नावाच्या पाट्या लागलेल्या दिसल्या नाहीत ! अशा सर्व केंद्रांमधून उद्यानाचे व्यवस्थापन, संवर्धन, तेथील उपाहारगृह चालविणे

इत्यादी कामांसाठी स्वेच्छेने काम करू इच्छिणाऱ्या प्रवाशांची मदत घेतली जाते. एवढेच नव्हे, तर वेळोवेळी आवश्यक असलेल्या अशा सेवांसाठी वर्तमानपत्रे, माहितीपत्रके, दूरचित्रवाणी इत्यादी संपर्कमाध्यमांद्वारे जाहिरात केली जाऊन त्यासाठी सर्वसामान्य निसर्गप्रेमींची मदत घेतली जाते. त्यासाठी त्यांना मोबदलादेखील दिला जातो. ज्याला जे काम करता येईल, ते त्याने निष्ठेने करण्यासाठी त्याला भरपूर संधी दिली जाते. **निसर्गाचे रक्षण आणि संवर्धन लोकांच्या सहभागाशिवाय होणे शक्य नाही, हे येथील शासनाने पुरेपूर जाणलेले आहे. त्यासाठी निसर्गाला लोकांपासून दूर ठेवून चालणार नाही, तर लोकांसमोर निसर्ग अधिकाधिक चांगल्या रितीने आणणे आवश्यक आहे, हेही शासन जाणते. त्यामुळे योसेमिटे पार्क आणि अमेरिकेच्या एकंदर सर्वच वनव्यवस्थापनात हे होत असते; आणि मला वाटते, हेच येथील वनव्यवस्थापनाचे वैशिष्ट्य आणि यशाचे गमक आहे.**

वास्तविक, निसर्गाच्या कुशीत वसलेले प्रत्येक ठिकाण सुंदरच असते. अशा प्रत्येक ठिकाणाचे आपापले वैशिष्ट्य असते. त्यांची एकमेकांशी तुलना होऊ शकत नाही. नायगारा धबधबा कितीही सुंदर असला, तरी योसेमिटे पार्कमधील प्रत्येक धबधब्याचे वेगळे वैशिष्ट्य आहे. आपल्याकडे तर पावसाळ्यात वरंधा, माळशेज इत्यादी घाटांमधून एकाच वेळी अशा अनेक धबधब्यांचे मनोहारी दर्शन होत असते. योसेमिटे पार्कच्याच उंचीवर असलेली हिमालयातील अनेक खोरी मला स्वतःला योसेमिटेपेक्षा अधिक लोभस वाटली आहेत. मात्र योसेमिटे पार्क आणि अमेरिकन वनव्यवस्थापन पद्धती खचीतच अनुकरणीय आहेत.

योसेमिटे पार्कची अधिक माहिती खालील संकेतस्थळांवर उपलब्ध होऊ शकते :-

www.americannationalpark.com

www.yosemite.org

www.yosemitepark.com

विवेक, १६-०१-२००१

-- -- --

# २. पश्चिमेकडील 'झाडाझडती' (पानगळ)

इंग्लंड, अमेरिका आदी पश्चिमी राष्ट्रांच्या अतिशीत विभागात होणारी रंगीबेरंगी पानगळ केव्हातरी प्रत्यक्षात पाहावी आणि अनुभवावी, असे बरीच वर्षे मनात होते. 'या वर्षी हा अनुभव घ्यायलाच हवा' असे मनोमनी प्रत्यक्ष ठरवून टाकले होते. त्यामुळे कोणाच्या सोयी–गैरसोयीची काळजी न करता इंग्लंड–अमेरिका–स्थित कन्यांना आम्ही येणार असल्याचे सांगून तारखादेखील कळवून टाकल्या होत्या! त्यांनीदेखील आनंदाने त्याचा स्वीकार करीत आमच्या या 'झाडाझडतीच्या' प्रवासात छान साथ दिली.

सोमवार, दि. २० सप्टेंबर, २०१० रोजी लंडनमध्ये पाऊल ठेवल्यापासून इंग्लंड–स्कॉटलंड आणि अमेरिकेच्या विविध राज्यांतून आजतागायत चाललेल्या प्रवासात आम्हांला या बहुरंगी होलिकोत्सवाचा आनंद मनसोक्त लुटायला मिळतो आहे. इंग्लंडमध्ये आमच्याबरोबरच सृष्टीतही या इंद्रधनू रंगांचे आगमन झाले होते. वृक्षांच्या पर्णिका आपले मूळ रंग बदलून विविध रंगांच्या दुनियेत प्रवेश करू लागल्या की, थंडी लवकरच (म्हणजे महिन्याभरात) बर्फवृष्टी करत आपले दार ठोठावू लागेल, असे समजावे! परिसरातील मेपल, ओक, सिकोवा, ब्लॅकगम, ब्लॅकबेरी, सायप्रस आदी सर्वच छोट्यामोठ्या वृक्षांच्या रंगांत अगदी आपल्याकडे सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी उमेदवारांचा पक्षबदल प्रकार सुरू असतो, तसाच हा रंगबदल सुरू असतो!

अमेरिकेच्या तुलनेत इंग्लंडमधील लंडनसारख्या मोठ्या शहरांपासून राष्ट्रीय महामार्ग ते खेड्यापाड्यांतून जाणारे सर्वच रस्ते खूप अरुंद आहेत. इथे त्यांची तुलना आपल्या रस्त्यांशी होऊ शकते. मात्र ते रस्ते आपल्याकडील रस्त्यांसारखे खड्ड्यांचे दागिने धारण करण्यात धन्यता मानत नाहीत! उलट त्यांच्या या अरुंदपणामुळे ही रंगीबेरंगी दुनिया सारखी आपल्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असल्यासारखे वाटते! त्यामुळे शक्य असेल तिथे गाडी थांबवीत तिचे रूप डोळ्यांत साठवून ठेवावे, तिला कवेत घ्यावे, तिचा

हात हातात घेत भरपूर चालत राहावे असा मोह सारखा होत राहतो. मात्र ठरावीक ठिकाणे सोडली, तर अगदी रस्त्यांच्या कडेलादेखील गाडी थांबविण्यावरील निर्बंध, पुढच्या मुक्कामी लवकर पोहोचण्याचा लकडा आदी गोष्टींमुळे मनाची ऊर्मी मनातच दाबून ठेवायला लागते! इंग्लंडमधील लेक डिस्ट्रक्ट हा डोंगराळ प्रदेश अनेक तलाव धारण करून आहे. त्यांच्या कडेकडेने वेडीवाकडी वळणे घेत अरुंद रस्त्यांवरून जाताना तलावातील नितळ पाण्यात पडणारे विविधरंगी वृक्षांचे प्रतिबिंब मूळ वृक्षांपेक्षा देखील अधिक मोहक वाटत राहते!

स्कॉटलन्ड हे राजकीयदृष्ट्या युनायटेड किंगडममधील एक स्वायत्त राष्ट्र होय! याच्यावर निसर्गाची भारीच माया आहे. अजूनदेखील स्कॉटलन्ड हा मेंढपाळ आणि मद्यनिर्मिती करणाऱ्यांचा देश आहे, असे म्हणता येईल. दूरवरच्या भूप्रदेशात शेतजमिनीऐवजी शेकडो एकर जमिनीवर गवताळ कुरण असल्याचे रस्त्याने जाताना दिसून येते. त्यावर शेळ्या, मेंढ्या, गायी आदींचे कळपच्या कळप चरत असताना दिसून येतात. इथे वृक्षांच्या पानांबरोबरच हे गवताचे पट्टेदेखील आपले रंग बदलताना दिसून येतात. रस्त्यालगत, डोंगर उतारावरील, तसेच पठारावरील गवतातून विविधरंगी रानफुले मधूनमधून डोकावत आपले लक्ष वेधून घेत असतात.

अमेरिकेतील महामार्गावरून वेगाने प्रवास करताना असे वाटते की, रंगांची ही दुनिया आपल्याला लांबूनच आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र शिकागोसारख्या मोठ्या शहरांच्या जवळपासदेखील जागोजागी 'राखीव' ठेवलेल्या वनप्रदेशांचे पट्टे, बागा आणि निवासी वस्त्यांमधील रस्त्यांच्या कडेने असलेले अनेक छोटेमोठे वृक्ष आपल्या हातातील ताटांमध्ये हळद, कुंकू, गुलाल, अबीर आदी घेत सुहास्य वदनाने आणि प्रसन्न मुद्रेने आपले स्वागत करायला उत्सुक असावेत असे वाटायला लागते. मी त्यांचा मनसोक्त पाहुणचार घेत जवळपासचे रस्ते आणि 'फॉरेस्ट रिझर्व्ह'मधून भिरभिरत राहतो. साठविता येईल, तसे ते डोळ्यांमध्ये साठवून ठेवतो. पकडता येईल, तेवढे कॅमेऱ्यामध्ये बंदिस्त करून ठेवतो. वृक्षांचे प्रकार, ठिकठिकाणचे हवामान आदींप्रमाणे सृष्टीचा हा रंगोत्सव सुरू झाल्यापासून साधारणतः महिनाभर चालू असतो. त्यानंतर 'फॉल बाप्पा, पुढच्या वर्षी लवकर या' म्हणून त्याचा निरोप घ्यायचा असतो. हिरवा-निळा-जांभळा-लाल-तांबूस-

पिवळा असा प्रवास करत या पर्णिका निष्प्राण होत कधी मूळ वृक्षांपासून अलग होतात आणि रस्त्यावर निर्माल्य होऊन पडायला लागतात, ते त्यांचे त्यांना आणि त्यांना धारण करणाऱ्या वृक्षालादेखील कळत नसावे! माझ्यादेखील परतीच्या प्रवासाची तारीख दिसादिसाने जवळ येत होती.

माणसाने सुख किती उपभोगावे, प्रवास किती करावा, जीवन किती जगावे यालादेखील काही मर्यादा असतेच, नाही का ?

सृष्टीमध्ये हा रंगबदल का आणि कसा होतो, त्याचा कालावधी किती असतो, प्रत्येक वृक्ष किती रंग बदलतो, त्याची सुरुवात आणि शेवट कोणत्या रंगाने होतात आणि शेवटी पानगळ का आणि कशी होते असे अनेक प्रश्न या मोहमयी दुनियेचा अनुभव घेतल्यानंतर माझ्या मनात येत राहतात. खरे म्हणजे सर्वसाधारणपणे सर्वांनाच जीवनाच्या वेगवेगळ्या वळणांवर हे प्रश्न पडत असतात. सृष्टीच्या बाबतीत त्यांचे उत्तर वनस्पतिशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आदी शास्त्रांमध्ये दडलेले असते, तर माणसाच्या जीवनाच्या बाबतीत त्याचा संबंध अध्यात्म, मनोविज्ञान आदींशी जोडला जातो. आपण या सर्वांची सांगड घालत आपला प्रवास करत राहायचा असतो.

वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र अथवा अध्यात्म आदी कधी माझ्या अभ्यासाचे विषय नव्हते. मात्र ते माझ्या आनंदाचे विषय नक्कीच आहेत! त्यामुळे मला केव्हाही असे प्रश्न पडले आणि कुतूहल अनावर झाले, तर मी संगणकमित्राकडे बैठकीसाठी जातो. घोड्याला टाच मारावी, तशी हातातील उंदराच्या पाठीवर टिचकी मारतो आणि गुगलच्या दुनियेत प्रवेश करतो! 'Chemistry Of All Fall Colors' असा साधा संदेश पाठविला तरी माझ्यावर माहितीच्या तुषारांचा वर्षाव होत राहतो. आवश्यक तेवढी माहिती मिळाली की पुन्हा हातातील उंदरावर टिचकी मारत गुगलच्या अजब दुनियेतून बाहेर पडतो !

सृष्टीतील रंगोत्सव ते गुगलच्या अजब दुनियेतला फेरफटका यांतून मी केव्हा घोरायला लागतो तेदेखील माझे मलाच कळत नाही !

सन्मित्र, १७-१२-२०१०

-- -- --

# ३. निसर्गरक्षण, शिक्षण आणि संशोधनात अग्रणी असलेली ‘शिकागो बोटॅनिकल गार्डन’

‘शिकागो’ हे अमेरिकेच्या औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रातील एक प्रमुख शहर होय. ठाणे-मुंबईप्रमाणेच या शहराचा बाह्य पसारा दिवसेंदिवस वाढतच असतो. त्यामुळे शहरालगत असलेली शेतजमीन लांबलांब पळताना दिसते. त्याच्या उलट शहरीकरणाची त्राटिका शिकारीच्या शोधात सारखी तिचा पाठलाग करताना आढळून येते.

मात्र असे असले, तरीदेखील या शहराने विस्तार पावत असतानाच ‘आपल्या परिसरातील निसर्गाचे रक्षण कसे करावे’ याचादेखील परिपाठ घालून दिलेला आहे. त्यामुळेच सातत्याने विस्तारित जाणाऱ्या या नागरी वस्तीतच आपल्याला जागोजागी आरक्षित वने (Forest Reserve), गवताळ कुरणे (Prairy Lands) आणि पाणथळ जागा (WetLands) यांचेदेखील अस्तित्व ठळकपणे जाणवत असते. खेळण्यासाठी मोकळी मैदानेदेखील तेवढ्याच मोठ्या प्रमाणात राखून ठेवलेली दिसतात आणि त्यावर मोठ्या संख्येने लहान-थोर खेळतानादेखील दिसतात. त्यामुळे सतत विस्तारीत जाणाऱ्या या शहराच्या बाह्य परिसरात आपल्याला कोठेही बकालपणाचे अथवा गलिच्छपणाचे साम्राज्य दिसत नाही. सगळीकडे हिंडताना अगदी प्रसन्न वाटते आणि एखाद्या विस्तीर्ण उद्यानातून फिरत असल्यासारखे वाटत राहते.

अशा या शिकागो शहरातील ३८५ एकर एवढ्या विस्तृत जागेवर वसलेल्या ‘शिकागो बोटॅनिकल गार्डन’चे खास कौतुक करायला हवे. जागतिक दर्जाच्या या बागेत चोवीस प्रकारच्या वेगवेगळ्या बागांचा आणि निसर्गठेव्यांचा अंतर्भाव आहे. निसर्गरक्षण, शिक्षण आणि संशोधनाचे कार्य सातत्याने करीत असलेल्या या बागेचे जनकत्व १८९० साली स्थापन झालेल्या ‘शिकागो हॉर्टिकल्चरल सोसायटी’ या संस्थेकडे जाते. कार्यकर्त्यांचे कर्तृत्व आणि क्षमता यांवर अवलंबून असलेल्या इतर कुठल्याही संस्थेप्रमाणेच या संस्थेच्या जीवनातदेखील अनेक चढउतार येत गेले.

१९६३ साली शासनाकडून मिळालेल्या ३०० एकर वनजमिनीवर शिकागो बोटॅनिकल गार्डनचा विकास करण्याचे ठरविल्यानंतर मात्र या संस्थेकडून आणि बोटॅनिकल गार्डनकडून निसर्गरक्षण, शिक्षण आणि संशोधन कार्यास प्रचंड चालना मिळाली.

सुरुवातीपासूनच नामांकित स्थापत्यशास्त्रज्ञांनी तयार केलेल्या आराखड्याप्रमाणे आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजवर बागेची वाढ होत राहिली आहे. ३८५ एकर विस्तारित जमिनीवरील या बागेत १०० एकरांवर दाट जंगल आहे, तर ८१ एकर जमिनीवर जलाशय आणि पाण्याचे नैसर्गिक प्रवाह आहेत. जपान, चीन आदी वेगवेगळ्या देशांतील बागांची ढब असलेल्या २४ बागा आणि ४ नैसर्गिक सुरक्षित निसर्गठेवे आहेत. ६ मैल लांब पाण्याचा किनारा आणि ९ बेटे व १५ गवताळ कुरणे आहेत. अशा या परिसरात ८,९७९ प्रकारच्या २४,००,००० वनस्पती व वृक्ष आणि २५५ प्रकारचे पक्षी विपुल संख्येत आहेत. ५०,००० सदस्य असलेल्या या बागेला वर्षभरात किमान ९,००,००० प्रवासी भेट द्यायला येतात. ३५,००० विद्यार्थी त्यांच्या २,००० शिक्षकांसमवेत वेगवेगळ्या कार्यक्रमांतर्गत येथे निसर्गशिक्षण घेतात, तर २४० कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी किमान १,००० स्वयंसेवक वर्षभरातून केव्हा ना केव्हा येत असतात.

बागेत फेरफटका मारण्यासाठी विविध पायवाटांबरोबरच मर्यादित प्रमाणात वाहनांसाठीचे रस्ते आणि 'वन्डरलॅन्ड एक्सप्रेस' नावाची बहुचाकी बसही ठरलेल्या वेळापत्रकानुसार सतत फेऱ्या मारत असते. ज्येष्ठ नागरिकांना बागेत सगळीकडे फिरता यावे, म्हणून खास सोय केलेली दिसते. सुंदर, बैठ्या इमारतीत कार्यालय, विस्तीर्ण वाचनालय, विविध प्रकारच्या प्रयोगशाळा आणि संशोधनकक्षांची रेलचेल आहे. भेट द्यायला येणाऱ्या प्रवाशांसाठी रेस्टॉरन्ट्स आहेत. शिवाय सोबत आणलेले खाद्यपदार्थ खाता यावेत, म्हणून जागोजागी विश्रामकक्षदेखील आहेत.

विविध जलाशयांच्या परिसरांत वेगवेगळ्या प्रकारच्या पाणपक्ष्यांचे थवे जलक्रीडा करताना दृष्टीस पडतात. या एकाच ठिकाणी जपानी, चिनी, इटालिअन आदी वेगवेगळ्या धाटणीच्या बागा पाहायला मिळत असल्यामुळे त्यांतील फरक आणि बारकावे समजायला सोपे जातात. येणारे शाळकरी विद्यार्थी केवळ सहलीसाठी येत नाहीत. प्राथमिक शाळांमधील चिमुरड्यांना

इथे मुक्तपणे हिंडताना, चित्र काढताना अथवा तल्लीन होऊन ते रंगवताना पाहणे, हा एक आनंद असतो. अनेक वयस्क माणसे आपापल्या जोडीदाराला गाडीतून हिंडवताना पाहिल्यावर त्यांचे निस्सीम कौतुक केल्याशिवाय राहवत नाही. बी-बियाण्यांपासून तर वेगवेगळ्या प्रकारची कलमे करून वृक्ष लावण्याचे काम येथे सातत्याने चालू असते. तसेच येथे त्याचे शिक्षणदेखील मिळते. प्रत्येक प्रकारच्या वनस्पतींची इथे व्यवस्थित नोंद ठेवलेली असते. तसेच जमिनीवर आणि कुंड्यांमध्ये लावलेल्या सर्व वनस्पती व वृक्षांची सातत्याने देखभाल केली जाते.

अमेरिकेत चोरून आणलेली रोपे, बी-बियाणे आदी जप्त करून तेथील गृहखात्यामार्फत ती 'प्लॅन्ट रेस्क्यू सेन्टर्स'कडे पाठविली जातात. तिथे त्यांच्यावर संशोधन करून त्यांची देखभाल केली जाते. सबंध अमेरिकेत मान्यताप्राप्त अशी ६१ केंद्रे आहेत, शिकागो बोटॅनिकल गार्डन हे त्यांतील प्रमुख केंद्र समजले जाते. अमेरिकेत एखाद्या माणसाने अवैधरीत्या शिरकाव करून राहणे कदाचित सोपे असेल, मात्र एखादी वनस्पती अथवा वन्य प्राणी अथवा पक्ष्याचा त्या पद्धतीने शिरकाव होणे खरोखरच अवघड वाटते.

आपल्याकडे भारतातदेखील मुंबई येथील बी.एन.एच.एस. तसेच डेहराडून, चंदीगढ, बेंगळुरु आदी ठिकाणी अशा बऱ्याच बागा आणि संशोधन केंद्रे अस्तित्वात असून चांगले काम करताहेत. मात्र त्यांपैकी एकही मला स्वतःला शिकागो बोटॅनिकल गार्डनच्या तोडीची वाटली नाही. आपल्याकडे प्रत्येक प्रांतात अशी किमान एकेक सर्वसमावेशक बाग असणे आवश्यक आहे. त्यातूनच पुढील पिढ्यांवर आपल्याला निसर्गरक्षणाचे संस्कार अधिकाधिक चांगल्या प्रकारे करता येऊ शकतील.

सन्मित्र, ०२-०१-२०११

-- -- --

# ४. रॉक रॉक रॉकी ॲन्ड सॅन्ड सॅन्ड सॅन्डी

भारतातून अमेरिकेला जाणारे प्रवासी अमेरिकेत सहसा कधी रेल्वेने प्रवास करत नाहीत. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे अमेरिका हा उत्तर-दक्षिण-पूर्व-पश्चिम असा प्रचंड पसरलेला देश आहे. त्यामुळे दूरदूरच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी इथे प्रचंड वेळ लागतो. इथे येऊन वेगवेगळ्या व्यवसायांत गुंतलेली आपली तरुण पिढी त्यामुळेच बहुशः विमान आणि खाजगी मोटारीने फिरणे अधिक पसंत करते. त्यामुळे ते स्वतःच रेल्वेच्या या प्रवासाविषयी बरेच अनभिज्ञ असतात. अमेरिकेतील आपल्या प्रवासासाठी आपणदेखील त्यांच्यावरच बरेचसे अवलंबून राहत असल्यामुळे आपणही त्या वाटेने कधी जात नाही.

मात्र अमेरिकेतील मध्यपूर्व विभागात असलेल्या शिकागो शहरापासून निघून थेट पश्चिमेकडील कॅलिफोर्निया राज्यातील सॅन फ्रान्सिस्को शहरापर्यंत जाणाऱ्या कॅलिफोर्निया झेफिर रेल्वेने प्रवास करणे हा एक अवर्णनीय अनुभव असतो. तब्बल सहा राज्यांतून आणि किमान सात राष्ट्रीय उद्यानांच्या परिसरांतून जाणारा २४३८ मैल (सुमारे ३९०० किमी.) लांबीचा हा मार्ग येथील नितांतसुंदर मार्गांपैकी एक प्रमुख मार्ग म्हणून ओळखला जातो. एका प्रमुख औद्योगिक शहरापासून सुरू होत दुसऱ्या प्रमुख औद्योगिक शहरापर्यंत जाणारा हा मार्ग अमेरिकेतील औद्योगिक वसाहती, प्रचंड डोंगर, त्यांची बर्फाच्छादित शिखरे, महाकाय खडक असलेले कडे, सुंदर वने, खोलवर असलेल्या दऱ्या, त्यांतून कधी खळाळत तर कधी धीरगंभीर गतीने वाहणाऱ्या (उगमापासून समर्पण भूमीपर्यंत) कोलोराडोसारख्या नद्या, वेगवेगळ्या खनिजांनी समृद्ध असलेली भूमी, खाणप्रदेश, ओक-मेपल-पाइन आदी वृक्षांनी खचाखच भरलेली वनसंपत्ती, नेवाडासारखी महाकाय वाळवंटे, त्यात मधूनच कुठेतरी दिसणाऱ्या ओयॉसिससारख्या चिमुकल्या वस्त्या, टुमदार घरे, मैलोन्‌मैल निर्वृक्ष असलेल्या रेताड जमिनी, हिरवीकंच आणि प्रचंड पसरलेली शेते, घोड्यांचे तबेले, गवताळ कुरणे आणि प्रवासाच्या

शेवटी पॅसिफिकसारख्या महासागराच्या उपसमुद्रावर असलेली मॅर्टिनेझसारखी सुंदर बंदरे या सगळ्यांचे आपल्याला सुंदर दर्शन घडवितो. मी भारतातून हिंडताना एकाच वेळी बर्फाच्छादित हिमालयाच्या कुशीतील उत्तराखंड, काश्मीर आदी राज्यांपासून कन्याकुमारीच्या सागरापर्यंत आणि कोलकात्यापासून निघत मुंबईपर्यंतचा संपूर्ण प्रदेश पिंजून काढत आहे, असे मला या सबंध प्रवासात जाणवत होते. हिमालय, विंध्याद्री, सह्याद्रीबरोबरच गंगेचे समृद्ध खोरे ते राजस्थानातील जेसलमेर येथील वाळूच्या टेकड्या आणि त्या सर्वांमध्ये असलेल्या अनेक सुंदर स्थळांची अनुभूती या एकाच प्रवासात होत होती. त्यातच आमचा हा प्रवास या वेळी अमेरिकेतील अवर्णनीय अशा 'फॉल' म्हणजेच बहुसंख्य वृक्षांच्या पानगळीच्या काळात होत होता. या काळात केवळ वृक्षांची पानेच आपले रंग क्षणोक्षणी बदलत मृत्तिकासमर्पित होतात असे नव्हे, तर खुरटी झुडपे आणि गवतदेखील आपले रंग दाखवू लागतात! आपल्या रंगीबेरंगी वस्त्रालंकारांचे प्रदर्शन करण्याची जणू एक स्पर्धाच निसर्गातील या वेगवेगळ्या घटकांमध्ये सुरू असते.

पहिल्या दिवशी दुपारी दोन वाजता शिकागोपासूनच सुरू होणारा कॅलिफोर्निया झेफिरचा हा प्रवास तब्बल तिसऱ्या दिवशी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास कॅलिफोर्निया राज्यातील सॅनफ्रान्सिस्को परिसरातील एमरी विल या स्टेशनवर संपतो. त्यांतील दुसऱ्या दिवसाचा प्रवास सकाळी सात वाजता कोलोराडो राज्यातील डेन्वर या सुंदर शहरापासून ते संध्याकाळी सुमारे सहा वाजेपर्यंत ग्रीन रिव्हरपर्यंत दिवसाउजेडी होतो आणि तो सर्व प्रवास अमेरिकेच्या जगप्रसिद्ध रॉकी पर्वताच्या आणि ग्रॅन्ड कॅनानच्या परिसरातून होतो. नावाप्रमाणे रॉकी असला, तरी या पर्वत परिसरातून जाताना – मी आधी वर्णन केल्याप्रमाणे – निसर्गातील सर्वच घटकांचे आपल्याला अद्भुत दर्शन घडते; विश्वकर्म्याच्या प्रतिभेचा सुंदर आविष्कार घडतो. दिवसभर आमच्यासकट सर्व सहप्रवाशांचे डोळे खिडकीच्या बाहेर दुतर्फा दिसणारे हे विविधरंगी आणि मनोहारी दृश्य साठवून ठेवण्याचा प्रयत्न करत होते. कॅमेऱ्यांची 'क्लिकक्लिक' सारखी चालू होती. आपल्याला होणारा आनंद मुले–बाळे, आई–वडील, नवरा–बायको, आप्त–मित्र आदी सर्वांपर्यंत मोबाइलवरून पोहोचवीत राहण्याचे सर्व प्रवाशांचे प्रयत्न चालू असतात. आपापल्या भाषेतील ''आह! ओहो! क्या बात है!''ची स्पर्धा चालू असते.

मी संगीत-नृत्यांचा आस्वादक असलो, तरी त्याच्या कृतीपासून मात्र दोन पावले लांबच असतो. मात्र २४ ऑक्टोबर, २०१०रोजी रॉकी पर्वताच्या परिसरातून आणि पुढे नेवाडाच्या वाळवंटातून होणाऱ्या या सबंध प्रवासात माझे मन आपोआप गाऊ लागले - 'रॉक रॉक रॉकी अ‍ॅन्ड सॅन्ड सॅन्ड सॅन्डी!' बसल्याजागी पावले ठेका धरू लागतात. हाताची बोटे टिचक्या मारू लागतात. अंधार पडल्यावर डोळे ताणूनताणूनदेखील बाहेरचे दृश्य दिसेनासे झाले की, डोळे आपोआपच बंद होऊ लागतात. एका स्वप्नवत् सृष्टीतून दुसऱ्या स्वप्नसृष्टीत प्रवेश होऊ लागतो! दिवसभरात पाहिलेले एकेक दृश्य आठवीत सर्वांग पुन्हा थिरकू लागते - 'रॉक रॉक रॉकी अ‍ॅन्ड सॅन्ड सॅन्ड सॅन्डी!'

मला कळायला लागल्यापासून आणि विवाहानंतर आमच्या उभयतांच्या आजवरच्या आयुष्यातील हा खचीतच सर्वाधिक आनंदाचा वाढदिवस होता!

सन्मित्र, १२-१२-२०१०

-- -- --

# ५. पाश्चात्त्य सण ‘हालोवीन’
## (HALLOWEEN)

पाश्चात्त्य देशांमध्ये, विशेषतः कोणे एके काळी इंग्रज साम्राज्य जिथे-जिथे पोहोचले होते, त्या इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आदी राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय सुटी पाळून दरवर्षी दि. ३१ ऑक्टोबरला रात्री सांगता होणाऱ्या या सणाचे पडघम पंधरा दिवस आधीपासूनच वाजू लागतात. अनेक व्यापारी संस्था, करमणुकींची ठिकाणे, कारखाने, खाद्यगृहे, तसेच खासगी बंगले, गृहसंकुले इ.च्या बाहेर आपल्याकडे गणेशोत्सव अथवा नवरात्रींत केली जाते, तशा प्रकारची आरास केली जाते. त्यासाठी थर्माकोल, दगडगोटे, फळभाज्या, वेगवेगळ्या प्रकारचे तृण, कुंड्यांमधून लावलेली रोपे, फुलझाडे आदींचा मोठ्या कलात्मक रितीने उपयोग केला जातो. त्यात सर्वच ठिकाणी ‘पम्पकिन’ (चक्रीभोपळा) या फळाला फारच महत्त्व असते. ते कदाचित त्याच्या प्रचंड अजागलतनू आकारामुळे असेल ! पण अशा प्रत्येक सजावटीत त्याचे अस्तित्व असतेच असते. अशा सजावटीत खास करून भूत, राक्षस, चेटकिणी आदींवर आधारित प्रसंगांचे चित्रण केले जाते. त्यामुळे अशा घटकांपासून आपल्या घराचे आणि परिसराचे रक्षण होते, असा एक समज जनमानसामध्ये अस्तित्व धरून आहे. अनेक ठिकाणी त्याला अनुरूप आणि मनात धडकी भरवील, असे संगीत वाजविले जाते, तसेच दिव्यांची रोषणाई केली जाते. अशी सर्व चितारणा करण्यात मुले अर्थातच आघाडीवर असतात. या उत्सवाची सांगता दि. ३१ ऑक्टोबरच्या रात्री मुलांकडूनच होत असते.

विशेषतः शालेय विद्यार्थी त्या दिवशी अंधार पडायला लागल्यापासून चित्रविचित्र पोषाख (त्यांत काळ्या रंगाचा अधिकाधिक उपयोग) आणि मुखवटे धारण करत, बऱ्याचदा आपापले चेहरे झाकत, आपापल्या परिसरात घरोघरी, तसेच दुकानांतून जातात. कोठे अथवा कोणाकडे जावे, या विषयीदेखील काही संकेत असतात. ज्या घरांमधील दिवे चालू असतील अथवा दुकाने उघडी असतील, तेथे जाऊन तेथील बेल वाजवायची. यजमान

बाहेर आल्यानंतर त्यांना ‘ट्रिक ऑर ट्रीट’ म्हणायचे. म्हणजेच ‘आम्हांला काहीतरी खाऊ द्या अथवा आम्ही तुमची फजिती अथवा नुकसान करू!’ अशी प्रेमळ धमकी द्यायची! यजमानांनीदेखील त्या दिवशी त्यांच्यासाठी मुद्दाम करून ठेवलेले पदार्थ, चॉकलेट, कॅन्डी आदी त्यांच्या झोळीत टाकायचे. त्यांना वेळ असेल, तर त्या मुलांना त्यांनी काही विनोद अथवा गोष्टी सांगण्याची विनंती करायची. उभयपक्षी ती मान्य केली जाते. अशा मुलांबरोबर बऱ्याचदा त्यांचे पालकदेखील – मुख्यतः कोठे काही अनवस्था प्रसंग ओढवू नये म्हणून – जातात. अशा मुलांना त्यांच्या पालकांकडून शक्यतोवर आपला परिसर सोडून फार लांबवर जाण्याची परवानगी दिली जात नाही. अनेक ठिकाणी मुले अशा प्रसंगांमधून लोकांकडून काही खाऊ न मागता एखादे विशिष्ट समाजकार्य अथवा सामाजिक प्रकल्पासाठी पैसे मागत निधी उभारण्याचे चांगले कामदेखील करताना दिसतात.

मुलांसाठी यातील महत्त्वाचा आणि सर्वाधिक आनंदाचा भाग या उत्सवाच्या शेवटीच असतो! ‘ट्रिक ऑर ट्रीट’मधून मिळालेला खाऊ घोळक्यातील सर्व बालगोपाळ एकत्र बसून सम-प्रमाणात वाटून घेतात. त्यानंतर आपापल्या आवडीच्या पदार्थांची एकमेकांमध्ये देवाणघेवाण होते. असे करताना त्यांनी आपापसांत भांडू नये, म्हणून काही पालकांच्या हजेरीतच ही देवाणघेवाण होते. त्यानंतरचे काही दिवस मात्र घराघरांतील वातावरण काही ठिकाणी त्रस्त, तर काही ठिकाणी गमतीचे असते. आपल्या आवडीचा भरपूर खाऊ घरात खायला असल्यामुळे मुले नेहमीचे जेवण घेत नाहीत की डब्यातून शाळेत दुसरे काही नेत नाहीत. त्यामुळे घराघरांतील मातांना हा खाऊ मुलांच्या लक्षात येणार नाही अशा पद्धतीने लपवून ठेवत अधिकाधिक दिवस पुरविण्याची इच्छा असते. त्यावरून मुलांची आदळआपट, आरडाओरडा, शोधाशोध आणि डॅडीकडे तक्रार करणे आदी गमतीशीर प्रकार ओघाने येतातच!

खाद्यपदार्थ, चॉकलेट, कॅन्डी, बेकरी पदार्थ आणि मिठाया तयार करणाऱ्या व्यक्ती आणि व्यापारी संस्था अर्थातच या उत्सवाचा उपयोग आपली बाजारपेठ वाढविण्यासाठी, तसेच नफा करून घेण्यासाठी कुशलतेने करून घेतात. त्यामुळे ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच दुकानदार अशा वस्तूंचा साठा आणि आपल्या दुकानातील त्यांची मांडणी

आकर्षकरीत्या आणि लक्षणीय अशा रोषणाईने करू लागतात. अर्थातच त्यांत हॉटेल्स, रेस्टॉरन्ट्स, सहलीची ठिकाणे आघाडीवर असतात. मात्र अनेक शाळा, सेवाभावी सामाजिक संस्था आदी या उत्सवाचा उपयोग मुलांसाठी चित्रकला, निबंध, वक्तृत्व, सजावट आदी स्पर्धांचे आयोजन करत त्यांतून मुलांचे, तसेच समाजाचे चांगले प्रबोधन करण्यासाठी करताना दिसतात. त्यासाठी प्रदूषणरूपी राक्षसाचा नाश, जैविक विविधतेचे रक्षण, वृक्षलागवड व संवर्धनाचे महत्त्व आदी विषयांची अलीकडे खास निवड होताना दिसते. या उत्सवाचा इतिहास पाहिला, तर त्याची सुरुवात साधारणतः इ.स. १९०० नंतरच झालेली दिसून येते. तसेच त्याचे मूळ स्कॉटलन्ड व आयर्लन्डमधून आधी इंग्लंडमध्ये सर्वदूर आणि नंतर इंग्रजीचे प्रभुत्व असलेल्या इतर पाश्चात्त्य राष्ट्रांमध्ये पसरलेले दिसते. आशिया खंडात जपानशिवाय इतरत्र त्याचा फारसा शिरकाव झालेला नाही. मात्र व्हॅलेन्टाईन डे, फ्रेन्डशिप डे आदी वेगवेगळ्या 'डेज'प्रमाणे आपल्याकडे देखील 'हालोवीन'चादेखील शिरकाव भविष्यात होणार नाही, असे सांगता येणार नाही. तसेच आपल्याकडील गणेशोत्सव, नवरात्री, गोकुळाष्टमी आदी सामाजिक उत्सवांप्रमाणेच तिकडील राजकारण्यांचा त्यांत शिरकाव होऊन त्याचे स्वरूप विकृत होणार नाही याची खातरी देता येणार नाही!

सन्मित्र, १६-०१-२०११

-- -- --

# ६. वृक्षसंस्कृतीचे धडे देणारे 'मॉर्टन आर्बोरेटम'

शिकागो शहराची आकाशरेषा (Sky-line) जगातील उत्तमोत्तम शहरांच्या आकाशरेषांपैकी एक समजली जाते. मात्र या शहराच्या आकाशरेषेपेक्षादेखील त्याच्या बाह्य परिसरातील 'जमीनरेषा' (Landscape) मला अधिक भावली. इथे सुंदर-सुंदर बागा, निसर्गकेंद्रे, राखीव वने, मैदाने, साहसक्रीडा केंद्रे, जलाशय आदींची नुसती रेलचेल आहे. तिथे नुसता फेरफटका मारला, तरी त्या ठिकाणांबरोबरच सळसळती तरुणाई, कुतूहल आणि निर्मितिक्षमतेची अनुभूती देणारी बालके, उतारवयात एकमेकांना साथ आणि आधार देत उरलेसुरले दिवस आनंदात उपभोगण्यासाठी हिंडणारी जोडपी आणि समूह आपल्याला प्रसन्न करतात. निसर्गानंद देणाऱ्या अनेक केंद्रांमध्ये शिकागो बोटॅनिकल गार्डन, मॉर्टन आर्बोरेटम, रायरसन वुड्स अॅण्ड वेलकम सेन्टर, इन्डिपेन्डन्स ग्रोव्ह अॅन्ड विजिटर्स सेन्टर्स आदी ठिकाणांचा खास उल्लेख करायला हवा. या प्रत्येक ठिकाणाचे आपापले वेगळे वैशिष्ट्य असले, तरी निसर्गरक्षण, शिक्षण आणि संशोधनकार्य ही त्रिसूत्री मात्र समान असतेच असते! यांपैकी शिकागो बोटॅनिकल गार्डनचा परिचय मी याआधीच्या लेखातच करून दिलेला आहे. जवळपास त्याच त्रिसूत्रीवर भर देत, त्याच्याच तोडीस-तोड, परंतु तरीदेखील आपले वैशिष्ट्य आणि स्वतंत्र अस्तित्व टिकवीत मॉर्टन आर्बोरेटम लोकांना आनंद देण्याचे कार्य करत असते. शिकागो मेट्रोपोलिटन विभागाच्या उत्तरेस 'वालपरेझो मोरेन'वर हे आर्बोरेटम विकसित करण्यात आले आहे.

हिमनदीच्या प्रवाहातून वाहत आलेले दगडधोंडे, गोटे, चुनखडी, गाळ, कचरा आदींनी तयार झालेल्या माळरानाच्या सुमारे १७०० एकर जमिनीवर उभे राहिलेले हे एक उत्तम जंगल आणि संशोधन केंद्र आहे. निसर्गाचा परिचय करून देणाऱ्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित गोष्टींपैकी काही तिथे नाही असे नाहीच!

‘आर्बोरेटम’ या इंग्रजी शब्दाचा अर्थ ‘वृक्षालय’ आहे. १९२२साली स्थापन झालेल्या या वृक्षालयात वेगवेगळ्या धाटणीच्या अनेक बागा, वनस्पती, पक्षी, फुलपाखरे आणि जलाशय आहेत. ‘ड्यूपेज’ या नदीचा पूर्वेकडील एक प्रवाह या वृक्षालयाच्या मधूनच जातो. त्यामुळे त्यात अनेक बेटे तयार झाली असून त्यांत बोटिंगची उत्तम सोय आहे. नदीच्या काठाकाठाने तयार केलेल्या पायवाटेने फिरताना जलप्रवाहालगतच्या सृष्टीचा छान आनंद मिळतो. विविधरंगी आणि नानाविध प्रकारच्या फुलांचे ताटवे इथे वर्षभर बहरलेले दिसून येतात. खास मुलांसाठी तयार केलेले निरनिराळे नैसर्गिक आणि वैज्ञानिक चमत्कार आणि कोडे उलगडून दाखविणारे ‘रहस्यालय’ (Maze Garden) हे या वृक्षालयाचे खास वैशिष्ट्य होय. येथील अनेक वृक्षांना वेगवेगळ्या प्रकारचे सुंदर-सुंदर आकार दिल्यामुळे त्यांच्या सौंदर्यात भरच पडलेली दिसून येते. वनस्पतीशास्त्रावरील अनेक दुर्मीळ ग्रंथ इथे जतन करून ठेवलेले असून येथील पुस्तकसंपन्न वाचनालय सर्वांना विनामूल्य उपलब्ध असते. वनस्पती आणि जैविक सृष्टीचे संशोधन, जतन आणि वृद्धी करणारे हे आर्बोरेटम एक जागतिक दर्जाचे वृक्षालय मानले जाते.

आम्ही इथे भेट दिली, तेव्हा इथे पानगळीच्या आधीचा रंगोत्सव चालू होता. त्यामुळे येथील जंगलातील रंगांचे वर्णन काय करावे! ओक, मेपल आदी वृक्षांच्या पर्णिका या काळात रोजच्यारोज रंग बदलत असतात. त्यामुळे आपण जर पुन्हा दुसऱ्या दिवशी इथे भेट द्यायला आलो, तर ‘आपण काल भेट दिलेला परिसर हाच काय?’ असा प्रश्न पडल्यास आश्चर्य वाटायला नको.

पाश्चात्त्य देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जाणारा ‘हालोवीन’ महोत्सव जवळच आलेला होता. त्यामुळे इथे मुलांसाठी खास हालोवीनवर आधारित, पण निसर्गरक्षणाचे आणि वृक्षवृद्धीचे महत्त्व आपल्या कलाकृती आणि पोस्टर्सच्या द्वारे पटवून देण्याचे संदेश तयार करण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. दर वर्षी ३१ ऑक्टोबर रोजी संपणाऱ्या आठवड्यात हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. अनेक लोक आपापल्या घराबाहेर, सार्वजनिक व सहलींच्या ठिकाणी भुताखेताच्या संकल्पनांवर आधारित चित्रविचित्र प्रकारच्या, मनात धडकी भरेल अशा प्रसंगांची आरास

करत असतात. त्याची चितारणा करणारे बुजगावण्यासारखे चित्रांकित फलक, पम्पकिन (चक्रीभोपळा) आणि इतर फळभाज्या, लाकडी फळ्या, दगड-गोटे आदींचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी या सर्व साधनांची आशयपूर्ण मांडणी केलेली होती. छोट्याछोट्या, पण आशयपूर्ण शीर्षकांनी निसर्गरक्षणाचे महत्त्व समजावून सांगणारे त्यांतील संदेश विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा प्रत्यय आणून देणारे होते.

मोठे वृक्ष, क्षुप, झुडपे, वेली, गवतांचे तसेच माडांचे प्रकार, वनस्पती, कुंपणवेली आदींची वेगवेगळ्या प्रकारे वर्गवारी करत त्यांचे उपयोग व महत्त्व समजावून सांगणाऱ्या सुंदर-सुंदर आणि वेगवेगळ्या बागा हे या वृक्षालयाचे आणखी एक वैशिष्ट्य होय. ह्या वैशिष्ट्याकरता त्यांच्या वाढीसाठी आवश्यक असलेले वातावरण त्या-त्या परिसरात कृत्रिमरीत्या निर्माण केले जाते. वृक्षालयास भेट देण्यास येणाऱ्या प्रवाशांना योग्य असे मार्गदर्शन सर्वत्र आणि अतिशय सौजन्यपूर्णतने केले जाते, हे मुद्दाम नमूद करावयास हवे. निसर्गात रममाण होणाऱ्या, तसेच नवनवीन काही शिकत राहण्याची कास धरणाऱ्या आणि सर्व वयोगटांतील लोकांसाठी शिकागो परिसरातील मॉर्टन आर्बोरिटम, शिकागो बोटॅनिकल गार्डन आदी ठिकाणी केली जाणारी मार्गदर्शने खिळवून ठेवतात.

या परिसरात भारतातून येऊन इथे स्थायिक होणाऱ्या तरुण मंडळींची संख्या अलीकडे लक्षणीयरीत्या वाढली आहे, वाढतच आहे. त्यांच्याकडे एकाहून अधिक वेळा येत राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्यादेखील त्याच प्रमाणात वाढत आहे. अशा ठिकाणांना भेटी देत आपला वेळ घालवायला, नवनवीन काही शिकायला, स्वयंसेवक म्हणून काम करायला आणि भारतात पुन्हा आल्यानंतर त्यांतील काही चांगल्या गोष्टींची अंमलबजावणी करायला त्यांना भरपूर वाव आहे.

सन्मित्र, ०९-०१-२०११

-- -- --

# ७. जपान : ऐश्वर्याच्या शिखरावर स्थिरावलेली एक औद्योगिक संस्कृती

जपानची राजधानी टोकियो येथे दिनांक २० ते २२ ऑक्टोबर १९८२ या काळात भरलेल्या 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन प्रॉडक्टिव्हिटी अ‍ॅण्ड क्वॉलिटी इम्प्रूव्हमेन्ट : स्टडी ऑफ अ‍ॅक्च्युअल केसेसच्या' निमित्ताने जपानला जाण्याचा योग आला होता. त्याचबरोबर ओसाका येथील 'आंतरराष्ट्रीय मशीन टूल' प्रदर्शनासही भेट देता आली. जपानमधील काही छोटेमोठे कारखाने बघावयास मिळाले. अनेक लोकांना भेटता आले, चर्चा करावयास मिळाली.

सर्वांतून असे जाणवले की, जपान ही ऐश्वर्याच्या शिखरावर स्थिरावलेली एक औद्योगिक संस्कृती आहे. तेथील बारा दिवसांच्या वास्तव्यात या संस्कृतीचे घडलेले दर्शन केवळ विलोभनीय होते.

'जपानमध्ये ऐश्वर्य आहे' असे मी म्हणण्याचे कारण म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा भागविण्याची क्षमता सर्वसाधारणतः प्रत्येक कुटुंबातून निर्माण झाल्याचे दिसून आले. एवढेच नव्हे, तर टी.व्ही., फ्रीज, एअर कंडिशनर, कार इत्यादी आपल्याकडे चैनीच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या वस्तूही तिकडे दैनंदिन गरजांत आल्या असून प्रत्येक तिसऱ्या कुटुंबाकडे मोटार असल्याचे आम्हांला सांगण्यात आले. छोट्याछोट्या गावांतूनदेखील इलेक्ट्रिकल वस्तू आणि उपकरणांनी भरभरून ओसंडणारी दुकानेही याचीच प्रचीती देत होती.

हे ऐश्वर्य स्थिरावले आहे, रुजले आहे असे मी म्हणतो, कारण जपानमध्ये बेकारीचे प्रमाण ४% पेक्षाही कमी आहे. आणि बेकारीच्या तेवढ्या टक्केवारीनेदेखील जपानी सरकार, उद्योजक, विचारवंत आणि सर्वसाधारण जनता बेचैन झाल्याचे प्रत्यही जाणवत होते. तसेच जपानी उद्योग आता आपला माल नव्हे, तर तंत्र निर्यात करण्यास उत्सुक आहेत. खरेतर हे उद्योगव्यवस्था स्थिरावल्याचेच लक्षण आहे.

जपानची उद्योगव्यवस्था ही केवळ औद्योगिक वाढ नव्हे, तर तो एका मनोहारी संस्कृतीचा विकास आहे. कारण हे ऐश्वर्य भूगर्भातून मिळणारे खनिज

तेल निर्यात करून, चोरट्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन देऊन, नुसताच आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपली हत्यारे खपविण्यासाठी आंतरराष्ट्रीय लढाया लढवून, साम्यवादी बडगा दाखवून किंवा धर्माच्या नावानेही मिळालेले नाही.

खरे पाहता, त्यांच्यातील अंगभूत उद्यमशीलतेमुळेच हे सर्व साध्य होऊ शकले आहे. आपल्या राष्ट्रीय चारित्र्याला अनुसरून या राष्ट्रांनी वस्तू व तंत्रात सतत सुधारणा घडवून आणण्याची कास धरलेली दिसते. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने काम करायचे असते या जाणिवेतून; तसेच राष्ट्र स्वयंपूर्ण बनवायचे असेल, प्रगतिपथावर न्यायचे असेल, तर प्रत्येक व्यक्तीने, प्रत्येक कुटुंबाने स्वत:ला राष्ट्राचा घटक मानून त्याप्रमाणे वाटचाल करायला हवी या धारणेतून हा मनोहारी विकास साधलेला दिसतो.

**सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, मुलाला भूक लागल्यानंतर ते आईकडे ज्या भाषेत अन्नाची मागणी करते, त्याच भाषेत त्याला जाण आल्यानंतर ज्ञानही मिळायला हवे, याचे महत्त्व जपानने जाणले आहे. त्यामुळे या मुलांचे घरातील आणि शाळेतील संस्कार यांत कधी भिन्नता येत नाही.**

उद्योग जगतातील 'झिरो डिफेक्ट', 'ग्रुप डिस्कशन' यांसारख्या संज्ञा व त्या संज्ञांच्या उपयोजनातून सुधारणा घडवून आणण्याचे तंत्र जपानने प्रथम जगाला दिले. आता जगात सगळीकडेच व्यवस्थापनशास्त्र आणि त्याच्याशी संबंधित विषयांवर पुस्तके लिहिली जाऊन चर्चा होत असली, तरी त्याचे प्रात्यक्षिक मात्र मला जपानी कारखान्यांतून बघावयास मिळाले. जपानी उद्योगाचे अग्रणी परिषदेत जे बोलले, त्याचे स्वरूप केवळ औपचारिक अथवा पुस्तकी नव्हते, तर त्यास कृतीचीही जोड असल्याचे माझ्या अनुभवास आले.

कारखान्याच्या आवारात प्रवेश केल्यानंतर कामगारांप्रमाणेच मालक, अधिकारीवर्ग आणि भेट द्यायला येणाऱ्या पाहुण्यांनीदेखील गणवेषाचा गाऊन घालून हिंडण्याचा दंडक कामगार-मालक यांतील अंतर कमी करणारा वाटला.

कामगारांचे छोटेछोटे गट करून, त्यांना आपण उत्पादित केलेल्या वस्तू, तंत्र, साधने यांवर चर्चा करायला वाव देऊन त्यांत सुधारणा करण्यास उत्तेजन

दिल्यामुळे सतत सुधारणा करण्यास दिशा मिळते व मदत होते. तसेच आपला व्यवसाय व हत्यारांवरील कामगारांचे प्रेम वाढून ते जाळपोळ अथवा मोडतोड करण्यास उद्युक्त होत नाहीत.

तिथे हत्यारांची आदळआपट नव्हती, कामाच्या वेळात हातावर तंबाखू चोळणे नव्हते, कारखान्याच्या आवारात अथवा रस्त्यावर पचापच थुंकणे नव्हते की सिगरेटची थोटके फेकणे नव्हते. तिथे यंत्राचा चुकार आवाज नव्हता किंवा अवजारांची किरकिरही नव्हती. तिथे अपवाद फक्त त्या संस्कृतीशी विसंगत वर्तन करणाऱ्या आमच्यासारख्या प्रवाशांचा होता. **प्रत्येक कारखान्यातून फिरणे, हे एखाद्या सुंदर उपवनातून फेरफटका मारण्याइतके आल्हाददायक होते.**

आम्ही बघितलेल्या आर. सी. सी. पाइप्सच्या कारखान्याविषयीच बोलायचे झाले, तर तंत्र आणि गुणवत्ता यांच्या बाबतीत आम्ही त्यांच्या जवळपासही पोहोचू शकत नाही असे मी म्हणेन आणि यात आपला अपमान होतो आहे, असे आपण कोणी कृपया वाटून घेऊ नये. आम्ही कारखान्याच्या आवारात प्रवेश केल्यापासूनच मला ह्या वेगळ्या संस्कृतीचा प्रत्यय येण्यास सुरुवात झाली होती. ही संस्कृती 'आधी वेळ ठरवून ती बरोबर पाळणे' वगैरे गोष्टींच्या पलीकडे गेली आहे.

कारखान्यात बव्हंशी यांत्रिक पद्धतीने काम करून घेण्यावर कटाक्ष जास्त दिसला. कच्चा माल काँक्रिट मिक्सरमध्ये ओतण्यापासून ते माल ट्रकमध्ये भरेतोवरचे सर्व काम यांत्रिक पद्धतीने करण्यात येत होते. त्यांचे प्रत्येक साधन आणि काम करण्याची पद्धत जर आमची साधने आणि पद्धती यांपेक्षा उजवी नसती, तरच नवल वाटले असते. पण साध्यासाध्या गोष्टीच्या सुधारणेकडे असलेला त्यांचा कटाक्ष सहज जाणवत होता.

त्यांतील प्रत्येक कामगार मला आपली हत्यारे आणि उपकरणे यांवर प्रेम करताना दिसून आला. काँक्रिट साचले आहे किंवा वाया जाते आहे अथवा हत्यारे इतस्ततः पसरली आहेत असे दृश्य कुठेही दिसले नाही. कारखान्यातून फिरणे हा एक आनंद होता.

**जपानी संस्कृतीचे हे दर्शन जपानी कारखान्यांतूनच झाले असे नाही, तर तेथील प्रत्येक गोष्ट ग्राहकाचा संतोष, सुविधा नजरेसमोर ठेवून केलेली दिसून आली.**

एक साधे उदाहरण देतो. आपण बाजारात जातो. कापड घेतो, अन्य काही वस्तू घेतो. आपण घेतलेल्या वस्तू अलीकडे शक्य तिथे कागदी अथवा प्लॅस्टिकच्या पिशव्यांतून द्यायची पद्धत इतर देशांप्रमाणेच आपल्याकडेदेखील दिसून येते, पण बऱ्याच वेळा अशा खरेदीची बोचकी बांधून ती आपल्या हातात दिली जातात. अशा वेळी ती बोचकी काखेत अडकवणे अथवा हातातून मिरवणे अनेकदा अत्यंत गैरसोयीचे होते. अशी बोचकी धरण्यासाठी जपानी दुकानदार आपल्याला प्लॅस्टिकच्या कड्या देतात. बोचक्यातल्या दोरीत ही कडी अडकवल्यावर त्याचे रूपांतर एका पिशवीत होते. ही बाब साधीच असली, तरी गिऱ्हाइकाची सुविधा नजरेसमोर ठेवून रुजवलेली ही पद्धत संस्कृतिनिदर्शक ठरते.

स्टेशनवर, हॉटेलमध्ये दैनंदिन गरजेच्या वस्तू विकण्यासाठी नाणी टाकून आवश्यक त्या वस्तू मिळण्याची सोय केलेली असते.

रोज लागणाऱ्या कच्च्या मालाचा अचूक अंदाज, अत्यंत प्रभावी विक्रीव्यवस्था आणि पुरवठ्यातील नियमितपणा यांमुळे होंडा मोटर्ससारखे अनेक कारखाने आज 'नो स्टॉक'च्या तत्त्वावर चाललेले बघून तोंडात बोट गेल्याशिवाय राहत नाही.

**आम्ही जे बघितले, ते केवळ एक विकसित तंत्र नव्हते किंवा त्याला केवळ औद्योगिक वाढीचे अथवा सुधारणेचे नाव देऊन त्याची बोळवण करावी असेही नव्हते. ती एक विकसित औद्योगिक संस्कृती होती आणि सुजाण कारखानदार, जबाबदार कामगार, प्रभावी व सुधारित हत्यारे-अवजारे, अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षित कार्यपद्धती आणि कामाचा सुयोग्य मोबदला हे त्या औद्योगिक संस्कृतीचे विविध पैलू होते आणि या सर्वांचे मनोहारी मिश्रण जपानी कारखान्यांतून बघावयास मिळाले.**

याचा अर्थ जपानमध्ये संप होत नाहीत का? होतात, पण त्यात आततायीपणा नसतो. उद्योगाबाहेरील लोकांचा कामगारांवर जाणवण्याइतपत प्रभाव नसतो. मोडतोड, जाळपोळ, मारझोड होण्याइतपत संप विकोपाला जात नसल्याची माहिती मिळाली. जे कारखान्यांतून बघितले, त्याचाच प्रत्यय रस्त्यांवर, स्टेशन्सवर, दुकानांत, हॉटेलांत सगळीकडे आला. प्रत्येक गोष्ट ग्राहकाची अंतिम सोय आणि संतोष लक्षात घेऊन केलेली होती.

टोकियोतील उपनगरी गाड्यांना मुंबईसारखीच गर्दी होती, पण गोंधळ मात्र अजिबात नव्हता. गाडी प्लॅटफॉर्मला आल्यावर डब्याचे दार कुठे येणार, याची तिथे खूण असते. प्रवाशांनी त्या जागेवर दोनदोनच्या रांगांनी उभे राहायचे असते. गाडी थांबल्यावर यांत्रिक पद्धतीने आपोआप दार उघडल्यानंतर रांगेनेच, एकमेकांवर न ओरडता, धक्काबुक्की न करता आत शिरायचे असते. दारात कोणी लोंबकळू नये म्हणून प्रवाशांना आत ढकलण्यासाठी गर्दीच्या वेळी प्लॅटफॉर्मवर महाविद्यालयातील दाणगट पोरांना कामाला लावलेले असते.

मात्र एका बाबतीत जपान खूपच मागासलेला दिसला! राष्ट्रोन्नतीसाठी स्थिर सरकारची आवश्यकता असते, याची जाणीव तेथील राजकारण्यांना झालेली दिसली नाही! गेल्या दहा वर्षांत तेथे पाच पंतप्रधान होऊन गेले आहेत! भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झालेल्या मंत्री आणि महामंत्र्यांची हकालपट्टी करून आकाशवाणी, दूरचित्रवाणीसारख्या माध्यमांतून त्यांचे धिंडवडे काढले जातात. हे सर्व पाहता, याचा भावी पिढ्यांवर काय परिणाम होईल, याचा विचार होत नसावा, हेच खरे!

असा हा जपान आर्थिक उन्नतीच्या शिखरावर स्थिरावलेला आहे. त्याला अमेरिका, जर्मनी अथवा औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा तत्सम पाश्चिमात्य राष्ट्रांमुळे आपल्या स्थानापासून ढळण्याची भीती वाटत नाही, तसेच चीन-रशियासारख्या साम्यवादी शेजाऱ्यांचीही भीती वाटत नाही. मात्र कोणाची रास्त भीती वाटत असलीच, तर ती दक्षिण कोरिया आणि तैवानसारख्या राष्ट्रवादाने प्रेरित झालेल्या आणि आपल्याच मार्गाने औद्योगिक वाटचाल करणाऱ्या चिमुकल्या राष्ट्रांची वाटत असेल.

कोरिया आपल्या बरोबर दोन वर्षे आधी म्हणजे १५ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र झाला. त्यानंतर यादवी युद्धात फाळणी होऊन दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया असे दोन भाग झाले. उत्तर कोरियाने साम्यवाद स्वीकारला, दक्षिणेने आपले जुने जपानी राज्यकर्ते, त्यांची तंत्रे, त्यांच्या पद्धती आणि त्यांची संस्कृती यांचा अवलंब करून त्याच शिडीवर चढून चढाओढीत भाग घेतला. जपानसारख्याच भुयारी गाड्या, तसेच फ्लायओव्हर्स, तीच मंगोलवंशीय माणसे, तोच राष्ट्रवाद, तीच कामसू वृत्ती,

तीच शिस्त, सुधारणेची कास धरणारी, ऐश्वर्याचा मार्ग दाखविणारी तीच संस्कृती त्यांनीही अंगिकारलेली दिसते.

आम्ही तैवानमध्ये थांबलो नाही, पण पावसाचे पाणी वाहून जाऊ नये म्हणून ठिकठिकाणी बांध-धरणे बांधून, पाणी अडवून ठेवून, जलाशय निर्माण करून ठेवल्याचे तैवानवरून विमान जाताना दिसत होते. साठवून ठेवलेल्या याच पाण्याचे रूपांतर धनधान्याच्या विपुलतेत होते. औद्योगिक भरभराटीत काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात असेच स्तुत्य प्रयत्न करण्यात आले होते, पण त्या धरणांमुळे जमिनीत पाण्यापेक्षा पैसाच अधिक मुरल्याचे जाणकार सांगतात.

'ॲग्रिकल्चरल मशीनरी न्यूज' व 'फार्मिंग मेकॅनायझेशन' या नियतकालिकांचे तरुण संपादक व शिन नारिश कंपनी लिमिटेडचे अध्यक्ष श्री. योशिसुके किशडा यांच्या मते जपानी माणूस आता सुखावला आहे. त्यामुळेच थोडा आळसावला आहे. थोडा बेफिकीरही झाला आहे. ऐश्वर्याबरोबर हे येणे अपरिहार्यही आहे.

त्यामुळेच दक्षिण कोरिया आणि तैवान यांनी सुरू केलेल्या या चढाओढीत आता जपान शिखरावरील आपले स्थान टिकवून ठेवतो, की अशी अनेक समांतर शिखरे निर्माण होतात हे बघणे उद्‌बोधक ठरेल. माझ्या मते, येत्या पंधरा वर्षांत याचा निकाल लागावा. आंतरराष्ट्रीय युद्धाला तोंड द्यावे लागले नाही, तर जपानचे स्थैर्य व अनुभव आणि कोरिया-तैवानची जिद्द यांतील रस्सीखेच संपूर्ण औद्योगिक विश्वाला ढवळून काढील, यात शंका नाही.

जपान, कोरिया व तैवान येथेच तयार झालेले रंगीत दूरचित्रवाणी संच भारत सरकारच्या सौजन्याने येथील उद्योजकांनी व व्यापाऱ्यांनी आयात केल्यानंतर त्या संचांवरच ही रोमहर्षक चढाओढ प्रत्यक्ष बघणे येथील कामगार आणि मध्यमवर्गीय समाज यांच्यासाठी अतिशय रंजक ठरेल यात शंका नाही. अर्थात सरकारी प्रवक्ते व सिनेसृष्टी यांनी इतर कार्यक्रमांसाठी दूरचित्रवाणी मोकळी ठेवली, तरच हे शक्य होऊ शकेल. आपण त्यातच धन्यता मानावी का?

-- -- --

# ८. लंडनमधील अजब म्युझियम 'शेरलॉक होम्स'

इंग्रजीतील 'म्युझियम'ला आपण मराठीत 'वस्तुसंग्रहालय' म्हणतो. हिंदीत त्याला 'अजायबघर' म्हणतात. लंडनमधील 'शेरलॉक होम्स म्युझियम' हे केवळ 'अजायबघर' न राहता अनेक कारणांमुळे 'अजब' आहे असेच म्हणायला हवे.

खरे म्हणजे इंग्लंडची राजधानी लंडन आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर याला जगात वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांच्या दृष्टीने तीर्थक्षेत्राइतके महत्त्व मिळाले आहे. मात्र त्याचा संबंध कुठल्याही धर्माशी अथवा पंथाशी नसून प्रत्येकाचे कार्यक्षेत्र आणि आवडनिवड यांच्याशी आहे.

साहित्यविश्वात वावरणाऱ्या लोकांच्या मनात विख्यात नाटककार, कवी आणि साहित्याच्या विविध क्षेत्रांत लीलया वावरलेल्या शेक्सपियरविषयी नितांत आदर आणि प्रेम असते. त्यामुळेच आयुष्यात एकदा तरी लंडन परिसरातील त्याची जन्मभूमी आणि तिथे असलेल्या त्याच्या स्मारकाचे दर्शन घ्यावे अशी त्यांची कामना असते.

शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांतील अभ्यासकांना येथील ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांच्या प्रांगणातून फिरण्याची तीव्र इच्छा असते.

खगोलशास्त्राच्या अभ्यासकांना ग्रीनविच ऑब्झर्व्हेटरीस भेट देण्याची सुप्त इच्छा असते. क्रिकेटवेड्या रसिकांच्या मनात 'लॉर्डस' येथे आणि टेनिसच्या क्रीडाप्रेमींना 'विंबल्डन' येथील मैदानात आपल्याला खेळायला नाही मिळाले तरी चालेल, परंतु त्या मैदानांचे एकदा तरी प्रत्यक्षात दर्शन घ्यावे असे तीव्रतेने वाटत असते.

वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासकांना येथील पूर्वाश्रमीची 'रॉयल बोटॅनिकल गार्डन' आणि आज रोजी 'क्यू' (KEW) गार्डन' असे नाम धारण करणाऱ्या बागेत फेरफटका मारण्याची जबरदस्त ऊर्मी असते.

प्रेक्षणीय स्थळांना भेट देऊ इच्छिणाऱ्या प्रवाशांना येथील 'मादाम तुसा म्युझियम'ला भेट दिल्याशिवाय आपला प्रवास संपन्न झाला असे वाटतच नाही.

आपल्या येथील कुठल्याही प्रवासी कंपनीच्या कार्यक्रमात स्थान मिळू न शकलेले, गर्दीच्या रस्त्यावर वसलेले छोटेसे 'शेरलॉक होम्स म्युझियम' मात्र या सगळ्यांपेक्षा आगळेवेगळे आहे. आणि म्हणूनच रहस्यकथा वाचायची आणि त्यावर आधारित चित्रपट बघण्याची हौस असणाऱ्या जगभरातील लक्षावधी रसिकांना आपण आपल्या आयुष्यात एकदा तरी लंडनला जाऊन हे म्युझियम बघावे अशी प्रखर आंतरिक इच्छा असते.

सर ऑर्थर कॉनन डॉयल हे इंग्रजीतील एक प्रख्यात रहस्यकथालेखक होत. शेरलॉक होम्स हा त्याच्या कथांमधील काल्पनिक डिटेक्टिव्ह. डॉ. वाटसन शेरलॉक होम्सचा काल्पनिक 'लेखकू मित्र'. या बऱ्याचशा कथा आपल्याला डॉ. वाटसन संवादाच्या रूपात सांगत असतो. शेरलॉक होम्सचे वैशिष्ट्य असे की, तो केवळ विशुद्ध तर्कशास्त्र, विलक्षण निरीक्षण, रसायनशास्त्र, जागतिक इतिहास, भूगोल आणि प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचा अभ्यास याच्या आधारावर सर्वसामान्य माणूस आणि पोलिसांनादेखील अवघड वाटणाऱ्या केसेसचा गुंता सोडवीत गुन्हेगारांना पकडण्यास मदत करतो. डॉ. वाटसन अतिशय सोपपत्तिक भाषेत ते आपल्यासमोर मांडतो. सुरुवातीला विलक्षण अवघड वाटणाऱ्या केसेस या सर्व गोष्टींमधील आपल्याला ठाऊक असलेल्या घटकांच्या आधारे उलगडत जातात. तेव्हा 'आपल्या हे आधी कसे लक्षात आले नाही?' असा प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो. मग आपला कसा 'पोपट' झाला यासाठी आपणच आपल्याशी हसत राहतो!

या कथांमधील शेरलॉक होम्स आणि त्याचा मित्र '२२१ बी, बेकर स्ट्रीट, लंडन' या काल्पनिक पत्त्यावर पेइंग गेस्ट म्हणून राहत असत. त्याच पत्त्यावर पीडित लोक त्याला भेटायला येत आणि पत्रव्यवहारदेखील करत. त्यामुळे वाचकांच्या मनात हा पत्ता कायमचा कोरला जातो. त्यामुळे जगभरातून लंडनला येणारे लाखो लोक या पत्त्याचा शोध घेत बेकर स्ट्रीट धुंडाळून काढत. लंडनच्या पोस्ट ऑफिसात रोजची शेकडो पत्र त्या नावाने आणि पत्त्यावर आजही येत राहतात. असे म्हटले जाते की, इंग्लंडमधील सर्वाधिक

लोकांना ठाऊक असलेला पत्ता म्हणजे त्यांच्या पंतप्रधानांचे कार्यालय आणि निवासस्थान असलेले '१० डाउनिंग स्ट्रीट'. मात्र जगभरातील सर्वाधिक लोकांना ठाऊक असलेला पत्ता म्हणजे '२२१ बी, बेकर स्ट्रीट' हाच होय.

तसे हे म्युझियम फार जुने नव्हेच! अगदी अलीकडे म्हणजे १९९० साली 'शेरलॉक होम्स इंटरनॅशनल सोसायटी'ने त्याची स्थापाना केली. होम्सवर आधारित अनेक कथांमधील काल्पनिक प्रसंगांची त्यात उभारणी केलेली आहे. होम्सचा पेहेराव, तो वापरत असलेल्या वस्तू, त्याची प्रयोगशाळा आदींचे चित्रण त्यातून होते. त्याचबरोबर होम्स आणि डॉ. वाटसनच्या पेहेरावातील जिवंत पात्रे तिथे तुमच्याशी बोलायला आणि फोटो काढायला तत्पर हजर असतात. होम्सच्या या कथा तुमच्या लक्षात असल्या तर त्या चित्रणातील जिवंतपणा बघून तुम्ही मोहरून जाता. त्या काळातील इंग्लंडमधील 'व्हिक्टोरियन' जीवनशैलीचे खूप सुंदर आणि बोलके चित्र तुमच्यासमोर या म्युझियममधील मांडणीतून लक्षात येते. थोडे अधिक पैसे खर्च करायची तयारी असली तर त्या वेळी प्रचलित असलेल्या 'हॅन्सन' अथवा 'व्हिक्टोरिया' या घोड्याच्या बग्गीतून तुम्ही जवळच्या रस्त्यावरून एक फेरफटका मारू शकता.

पण वाचकहो, शेरलॉकचे स्मारक या म्युझियमपुरतेच मर्यादित नव्हे बरे का! लंडनच्या उपनगरीय रेल्वेमार्गावर चक्क त्याच्या नावाने एक स्टेशनच आहे! या स्टेशनावर अंतर्बाह्य शेरलॉकच्या कथांमधील प्रसंगांचे चित्रण तुम्हांला केलेले दिसते! याच स्टेशनवर उतरून तुम्ही पायी त्याच्या म्युझियमला आणि जवळच असलेल्या मादाम तुसा म्युझियमलादेखील जाऊ शकता.

एखाद्या लोकप्रिय लेखकापेक्षा त्याच्या कथांमधील नायकाचे एवढे जगप्रसिद्ध सुंदर आणि बोलके स्मारक उभारले जाण्याचे जगामधील हे एकमेव उदाहरण असावे.

माझ्या लंडन प्रवासात या सर्व ठिकाणांना भेट देऊन मला त्यांची निवांत पाहणी करता आली हे मी माझे भाग्य समजतो.

-- -- --

# ९. ईन-मीन-तीन वॉक इन चीन

'हरियाली' या संस्थेच्या माध्यमातून आमचे पर्यावरणविषयक रचनात्मक कार्य चालू असते. 'इंटरनॅशनल कन्सोर्टियम फॉर सोशल डेव्हलपमेन्ट' (आय.सी.एस.डी) या संस्थेने जुलै २००७ मध्ये हाँगकाँग येथे एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. हरियालीच्या कार्यावर आधारित एक शोधनिबंध मी आणि हरियालीतील एक कार्यकर्त्या प्रा. डॉ. सौ. नीलिमा कुलकर्णी या दोघांनी मिळून पाठविला होता. त्याचे सादरीकरण करण्यासाठी परिषदेचे निमंत्रण आलेले होते.

आधी ब्रिटिश साम्राज्याचा हिस्सा असलेले हाँगकाँग हे एक आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे सुंदर असे व्यापारी शहर एव्हाना चीनमध्ये समाविष्ट झालेले होते. त्यामुळे या परिषदेला जोडूनच चीनमध्ये सुमारे एक आठवडा प्रवास करून येण्याचे आम्ही ठरविले. चिनी धर्तीवरील 'ईन-मीन-तीन' अशी टोपण नावे धारण करत सहलेखिका डॉ. नीलिमा कुलकर्णी, सौ. पुष्पलता सिंगवी आणि मी स्वतः असे आम्ही तिघेच आमच्या या अनोख्या मुसाफिरीत होतो.

चीनमधील आमच्या या छोटेखानी दौऱ्याचे आयोजन आमचे आम्हीच केले होते. मात्र त्यासाठी आधी बरेच संशोधन, मेलामेली आणि चीनमधील प्रमुख समजल्या जाणाऱ्या प्रवासी कंपन्यांबरोबर घासाघीस केली होती. यांत थोडा अधिक वेळ आणि श्रम कारणी लागत असले, तरी पैशांची बरीच बचत आणि प्रवास खूप आरामाचा होऊ शकतो. त्यातच एक प्रकारचे 'थ्रिल'देखील असते. ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडताना वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव येतात. त्यामुळे विपरीत परिस्थितीत कसे वागावे आणि त्यातून मार्ग कसा काढावा हेदेखील कळते. माणसाचा आत्मविश्वास वाढतो. अलीकडे वेगवेगळ्या संकेतस्थळांवर यांविषयीची भरपूर माहिती उपलब्ध असते. त्यामुळे एका बाजूला ते काम खूप सोपे होते, तर दुसऱ्या बाजूला मनाचा खूप गोंधळही उडू शकतो. म्हणूनच अशा प्रक्रियेचा अनुभव घेत राहायला हवा! या सर्व संकेतस्थळांमधून भ्रमंती करत, तसेच वेगवेगळ्या लेखकांनी

लिहिलेली प्रवासवर्णनपर पुस्तके वाचल्यावर आपल्या असे लक्षात येते की, या सर्व प्रवासी कार्यक्रमांमध्ये 'बीजिंग-बुझेन-हॉन्गझू आणि शांघाय' या ठिकाणांचा समावेश असतोच असतो!

बीजिंगमधील प्रमुख प्रवासी आकर्षणांमध्ये गतकाळातील चिनी बादशाहांचे शतकानुशतके वास्तव्य असलेली शाही भूमी, त्यावरील राजवाडा, प्रार्थनास्थळ, दिवसाच्या चोवीस तासांतील वेगवेगळ्या वेळी वेळ व्यतीत करण्याची या सम्राटांची स्थळे, त्यांची थडगी (टोम्ब्ज) आणि त्यासभोवतालच्या सुंदर आणि स्वच्छ बागा, बुद्धिस्ट देवळे आदींची गणना आजही होते. 'तोचतोपणा' येत राहणाऱ्या या ठिकाणांना भेटी देण्यात किमान दोन दिवस घालवावेच लागतात!

'सेक्रेड सिटी' या नावाने ओळखण्यात येणाऱ्या या शाही भूमीवरील सफरीची सुरुवात साम्यवादी दडपशाहीमुळे जगभर प्रसिद्धीस आलेल्या 'टिनामेन स्क्वेअर' व तेथील बुद्धाच्या देवळापासून होते. जगातील सगळ्यांत मोठे 'स्क्वेअर' आणि शाही भूमीचे प्रवेशद्वार म्हणून या ठिकाणाचा गौरवपूर्ण उल्लेख होतो. मात्र साम्यवादी राजवटीच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना एक आठवडाभर इथे रणगाड्यांखाली चिरडण्यात येऊन लाखो लोकांना यमसदनी पाठविण्यात आले याचा उल्लेख मार्गदर्शिकेकडून जाणीवपूर्वक टाळला जातो. तुम्ही त्याविषयी काही प्रश्न विचारलेच तर तिकडे साफ दुर्लक्ष केले जाऊन तो विषय पुन्हा 'शाही भूमी'च्या दिशेने वळवला जातो. तुम्हांला असलेल्या माहितीच्या आधारे तुम्ही पुन्हा खोदूनखोदून काही प्रश्न विचारलेच, तर ''तुम्हांला हे कसे ठाऊक ?'' असा प्रतिप्रश्न विचारत ती, ''आम्हांला त्यातले काही ठाऊक नाही, मी त्या वेळी फार लहान होते'', असे प्रत्युत्तर देते! ''शेकडो वर्षांपूर्वी या भूमीवर राहणारे बादशहा प्रातर्विधीपासून रात्री निजेपर्यंत आपला वेळ कुठे आणि कसा घालवीत, हे तुला कसे ठाऊक ? त्या वेळी तू किती वर्षांची होतीस ?'' असे विचारले, तर ती आपल्याला तो प्रश्न समजलाच नसल्याचा पुन्हा आव आणत आणि साम्यवादी राजवटीतील अगदी अलीकडचा इतिहास विसरायला लावत अगदी दूरवरच्या काळातील सम्राटांच्या विलासी आणि चैनी राजवटीचे गुणगान गायला लागते!

आपल्याकडील साम्यवादी मंडळींची गाडी कुठल्याही प्रश्नावरून रूळ बदलत जशी एकसारखी तथाकथित 'निधर्मीपणाकडे' वळत राहते, तशी तिची गाडी फक्त 'शाही भूमी' आणि वेगवेगळ्या मुद्रांमध्ये असलेली बुद्धाची देवळे यांच्या दिशेनेच जात राहायची!

शाही भूमी आणि ह्या देवळांचा परिसर मात्र खूप सुंदर आणि स्वच्छ ठेवलेला दिसून आला. आपल्या देशातील अनेक राजवाडे आणि देवळे त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रेक्षणीय असूनदेखील त्यांच्या परिसरातील अस्वच्छता आणि त्यांच्या देखभालीची अपूर्ण आणि गलथान अवस्था यांमुळे जगभरातील प्रवाशांना ती आकर्षून घेऊ शकत नाहीत, हे प्रकर्षाने जाणवले. भेट द्यायला येणाऱ्या लोकांची गर्दी इथे आणि भारतात सारखीच असते! मात्र येथील शिस्तीचा, कायद्याच्या कडक अंमलबजावणीचा भारतात असलेला अभाव चटकन नजरेत भरतो. त्या-त्या काळात प्रचलित असलेले वास्तुशास्त्रविषयक नियम, समजुती, श्रद्धा, इत्यादींच्या आधारावर शाही भूमीतील प्रत्येक वास्तूची रचना, रंगांची निवड वगैरे केली गेल्याची माहिती मार्गदर्शिकेकडून आणि तेथील इंग्रजी भाषेत लिहिलेल्या फलकांवरून मिळते. प्रवासी म्हणून गेल्यानंतर सगळे फलक वाचणे अथवा मिळालेल्या सर्व माहितीची नोंद ठेवणे अवघड असते. अशा वेळी आपल्याला महत्त्वाची वाटत असलेली माहिती आणि आपल्याला रस असलेल्या विषयासंदर्भातील तेथील नोंद आपल्या 'हार्ड डिस्क'वर साठवणे हा उत्तम मार्ग होय!

या शाही भूमीवरील वृक्षसंपदा आणि हिरवळ वाखाणण्यासारखी आहे. ते एक सुंदर उपवनच आहे म्हणा ना! तेथील गर्दी आणि आवाजालादेखील न जुमानता पक्ष्यांचे सुंदर आवाज आणि 'सिकोडा' या कीटकाचे गुणगुणणे कानावर पडतच होते. तेथील विक्रेत्यांच्या हातातील छत्र्या, तरुणांच्या अंगावरील कपडे(!), सफरचंद आणि पीचसारख्या फळांचे ठेले, विक्रीसाठी ठेवलेल्या अनेकानेक वस्तू, इत्यादी गोष्टींच्या आक्रमक रंगांवर मात करत तेथील फुलांच्या ताटव्यातील आकर्षक रंग आणि तजेला आमचे लक्ष वेधून घेत होतेच! सायप्रस, सिकोवा, चिनार, देवदार, पाईन आदी उदंड आयुष्य असणारे, उंच वाढणारे, सुंदर दिसणारे, पक्ष्यांना आसरा देणारे, वेगवेगळ्या प्रकारच्या हवामानांत वाढणारे भरपूर वृक्ष या परिसरात लावलेले आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे सफरचंद आणि पीच यांच्या इथे

बागा आहेत. सफरचंद, पीच आदी फळांची विक्री करणारे ठेले आणि फिरते विक्रेते त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या विभागातून प्रवाशांना आपल्याकडे आकर्षून घेण्याचे प्रयत्न करत होते. शाही भूमीवरील प्रत्येक वास्तूच्या आत, बाहेर, वर सगळीकडे वेगवेगळ्या आकारांच्या आणि रंगांच्या ड्रॅगनचे अस्तित्व जाणवत होते.

वास्तविक, चिनी संस्कृतीत सगळ्याच क्षेत्रांत 'ड्रॅगन' या संकल्पनेचे प्रचंड प्रस्थ आहे; परंतु या संस्कृतीत ड्रॅगनला निश्चित आकार नसतो. पाश्चात्त्य संस्कृतीत ड्रॅगन हा प्राणी क्रौर्याचे प्रतीक समजला जातो. चिनी संस्कृतीत मात्र त्याला सुख, समृद्धी आणि भाग्याचे प्रतीक मानले जाते! स्वर्गातून पृथ्वीवर उतरलेला तो एक दैवी प्राणी असून चिनी राजघराण्यांच्या लोकांना त्याचे वंशज समजले जाते. ड्रॅगनला त्यांच्या राजमुद्रेतदेखील स्थान देण्यात आले आहे. चिनी संस्कृतीत या ड्रॅगनला नऊ वेगवेगळ्या आकारांत साकारण्यात येते. प्रत्येक प्रकारच्या ड्रॅगनचे गुणधर्म, निशाणी आणि चिन्ह वेगळे असते. एवढेच नव्हे, तर त्याला कुठल्या माध्यमात कोरले अथवा चितारले आहे अथवा कुठल्या रंगात रंगविले आहे, यांवरून तो कशाचे प्रतीक आहे, ते ठरविले जाते. उदाहरणार्थ, लाकडात कोरलेला ड्रॅगन निर्मिती, कल्पनाचातुर्य आणि चौकस बुद्धीचे प्रतीक समजला जातो; तर धातूचा ड्रॅगन शक्ती, ताकद आणि कठोरतेचे प्रतीक समजला जातो. चिनी संस्कृतीतील धारणेनुसार पावसापासून पाणी, सूर्यापासून उष्णता, समुद्रापासून वारा आणि वसुंधरेपासून मृदा मिळविण्याचे काम ड्रॅगनच करतो. त्यामुळे देवळांच्या चौथऱ्याखाली, चौथऱ्यावर, मूर्तींच्या पायाशी, शिरावर, देवळाच्या भिंतींवर आणि शिखरावर सगळीकडेच ड्रॅगन कोरलेले! वेगवेगळ्या संकटांपासून रक्षण करण्यासाठी; सुख, समाधान आणि समृद्धी मिळविण्यासाठी; भाग्य उजळण्यासाठी आदी सर्वच कामनांसाठी ड्रॅगनची आळवणी केली जाते. त्याला उडता येते, जमिनीवर चालता येते, पाण्यात पोहता येते असा पारंपरिक समज आहे. कधी पंख लावून, कधी शिंगे लेवून, कधी माशाच्या रूपात, तर कधी सरपटणाऱ्या प्राण्याच्या रूपात अशा वेगवेगळ्या रूपांत त्याला पेश केले जाते. तरुण-तरुणींच्या शरीराच्या कोणत्या भागावर आणि अवयवावर त्याला चितारले जात नाही, असे नाहीच!

सर्व देवळांमध्ये बुद्धाच्या वेगवेगळ्या मुद्रा धारण करणाऱ्या, वेगवेगळ्या आकारांच्या सुंदरसुंदर मूर्ती दिसून येतात. नवस करायला येणारे भाविक या सर्वच देवळांच्या परिसरातील वृक्षांच्या फांद्यांना ठिकठिकाणी वेगवेगळ्या रंगांच्या कापडाच्या फिती बांधून ठेवतात. सर्वच देवळांतील बुद्ध नवसाला पावत असला, तरी बीजिंगमधील 'टेम्पल ऑफ हेवन', हान्गझूमधील 'लिन्गेन टेम्पल', 'जेड बुद्ध टेम्पल' आदी देवळांमधील बुद्धाला 'अधिक सामर्थ्यशाली' समजले जाते. आपल्याकडे नाही आपल्या घरच्या देव्हाऱ्यातील गजाननापेक्षा प्रभादेवीच्या सिद्धिविनायक मंदिरातील गणपतीला अधिक 'जागृत' समजले जाते! म्हणून तर अमिताभ बच्चनपासून संजय दत्तपर्यंत सर्व भाविक आणि श्रद्धाळू आपल्या लवाजम्यासकट तिथे दर्शनाला जातात आणि सर्व प्रसिद्धिमाध्यमे तासन्तास अन् दिवसेंदिवस त्यांचे कौतुक करत असतात!

चीनमधील राजवट साम्यवादी असली म्हणून काय झाले? सामान्य प्रजा तर श्रद्धाळू, भाविक आणि शाही ऐश्वर्याचे कौतुक करणारी आहे. त्यांच्यावर कुठे भारतातील साम्यवादी नेत्यांचे संस्कार झाले आहेत?

चीनवर लिहीत असताना जगातील सात आश्चर्यांपैकी एक मानल्या जाणाऱ्या चिनी भिंतीवर लिहिण्याचा मोह होणार नाही, हे कसे शक्य आहे? आजवर अनेक लेखकांनी या भिंतीवर खूप काही लिहून ठेवले असले, तरी प्रत्येकाला त्यात खूप काही वेगळे दिसत असते आणि ते नोंदवलेही जाते.

चीनवर उत्तर दिशेकडून वारंवार तातार आणि मंगोलियन टोळ्यांकडून होणाऱ्या हल्ल्यांपासून आपल्या साम्राज्याचे रक्षण व्हावे म्हणून चिनी सम्राटांनी एक अजब प्रकल्प हाती घेतला. चीनच्या उत्तर-पूर्व दिशेला प्रचंड डोंगररांगांच्या शिखरांवरून त्या वेळी लोकांना वर चढून येणे अशक्य होईल अशी भिंत बांधायचे ठरवले. आपल्याकडील किल्ल्यांवर असलेल्या तटबंदीप्रमाणेच ती भिंत बांधली आहे. त्यावर चीनच्या बाजूने वर चढण्यासाठी पायऱ्यांची तर कुठे पायवाटांची तरतूद जागोजागी केलेली दिसते. अनेक ठिकाणी सरळसोट सुळके आल्यामुळे ती भिंत दिसत नाही. त्यामुळे ती भिंत खूपच लांबलचक दिसत असली, तरीही ती भिंत एकसलग नाही. भिंतीच्या वरच्या भागाची रुंदी सर्व ठिकाणी सारखी नसली, तरी काही

ठिकाणी ती चक्क वीस ते तीस फुटांपर्यंतदेखील आढळते. त्यावरून दारूगोळा, युद्धसामग्री आदी नेता यावी म्हणून एवढी रुंदी ठेवली असावी. तुकड्या-तुकड्यांत असलेल्या या भिंतीची लांबी अदमासे ८८५२ किलोमीटर आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

ही भिंत (तटबंदी) चीनमधील वेगवेगळ्या राजवटींमध्ये साधारणतः इसवीसन पूर्व ४७६ ते इसवीसन १६४४ ह्या काळात बांधली गेली असावी. आज या तटबंदीपैकी साधारणतः १/३ लांबीचा भाग बऱ्यापैकी असलेला दिसून येतो. दुसरा १/३ भाग पूर्णतः अदृश्य झालेला तर उर्वरित १/३ विखुरलेल्या दगड-विटांच्या स्वरूपात दिसतो. एकूण काय तर आपल्याकडील किल्ल्यांचे पडके बुरूज आणि अवशेष, भग्न झालेली देवळे यांसारखीच या भिंतीची दशा झाली आहे असे दिसते. परिसरातील लोकांकडून पडक्या भिंतीच्या दगड-विटांची चोरीदेखील होत असते.

मात्र बीजिंगच्या परिसरात असलेल्या भिंतीची चार-पाच वेगवेगळ्या विभागांमध्ये अतिशय सुरेखरीत्या देखभाल करण्याचे चातुर्य आजच्या चिनी शासनाने आणि राज्यकर्त्यांनी दाखविले आहे. त्यामुळेच आज या भिंतीचा उपयोग सीमांच्या रक्षणासाठी नव्हे, तर प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी खूपच चांगल्या रितीने केला जात आहे. या भिंतीच्या एका तरी विभागाला भेट दिल्याशिवाय तुमची चीनभेट पूर्ण होऊच शकत नाही. आज ही चिनी भिंत चीनच्या अस्मितेचे प्रतीक झाली आहे. वेगवेगळ्या विभागांतून जाणाऱ्या या भिंतीची त्या-त्या परिसरानुसार वेगवेगळी वैशिष्ट्ये आहेत. कुठे तिचा परिसर अतिशय देखणा आणि निसर्गरम्य, तर कुठे तिच्यावर पोहोचण्याची वाट अतिशय अवघड आणि धोकादायक आहे, तर काही भाग हवामानाच्या दृष्टीने अकल्पित आणि अनिश्चित असा मानला जातो. त्यामुळे तुमची भेट वेळापत्रकानुसारच होईल असे नाही.

बीजिंगच्या परिसरातील वडलिंग, सिमताई, मुटियान्यू, जिनशॅनलिंग आदी सात-आठ ठिकाणांपैकी एकाची निवड करून तेथील प्रवासी कंपन्या तुमच्या भेटीची सोय तुमच्या वेळापत्रकानुसार किंवा सोयीनुसार नक्की करतात. आपल्यासारख्या प्रवाशांनी यांच्यापैकी कुठल्याही ठिकाणी शनिवार-रविवार आणि चीनमधील इतर सुट्यांचे दिवस वगळूनच जाण्याचे नियोजन करावे.

अन्यथा आपला जास्तीत जास्त वेळ वाहतुकीच्या प्रचंड कोंडीतच जाण्याची शक्यता असते.

एकूण काय तर ड्रॅगॉन आणि चिनी भिंत ही चीनची खास वैशिष्ट्ये आहेत आणि चिनी लोकांच्या अस्मितेची प्रतीके आहेत असे खातरीपूर्वक म्हणता येते.

चीनमधील ही प्रेक्षणीय स्थळे बघताना मनात सतत विचार यायचा तो हा की, आपल्याकडे याच्यापेक्षाही खूप अधिक सुंदर निसर्ग, जैवविविधता, ऐतिहासिक आणि प्रेक्षणीय स्थळे असे सगळे असून जगभरातील अधिकाधिक प्रवाशांना आपण आकर्षित का करू शकत नाही?

-- -- --

# १०. अज्ञातवासात जगणारी भारतातील 'पाचूची बेटे' : लक्षद्वीप-मिनीकॉय

आम्ही लक्षद्वीपला सामुद्री प्रवासास जाणार आहोत हे सांगितलेल्या दहा लोकांपैकी किमान सात लोकांकडून विचारले जाणारे प्रश्न पुढीलप्रमाणे असत-

लक्षद्वीपला जाण्यासाठी व्हिसा कुठे काढायला लागतो?

तुम्ही फक्त लक्षद्वीपलाच जाणार, की युरोपातील इतरही काही देशांना भेटी देणार आहात?

म्हणजे अंदमान-निकोबारला जाणार आहात ना?

कोणाबरोबर जाणार आहात?

वाचकहो, हे प्रश्न विचारणाऱ्यांमध्ये सर्व वयोगटांतील, सुशिक्षित तसेच ऊठसूट आपल्या जागतिक प्रवासाविषयी बढाया मारणाऱ्या लोकांचादेखील मोठ्या प्रमाणावर भरणा असायचा!

स्वातंत्र्य मिळून पासष्टाहून अधिक वर्षे झाल्यानंतरही आपल्या देशाच्या भूगोलाविषयी सुशिक्षित लोकांमध्येही एवढे अज्ञान असेल यावर विश्वास ठेवणे आम्हांला अवघड जात असे.

'लक्षद्वीप-मिनीकॉय' ही बेटे भारतीय संघराज्याचाच एक भाग असून तिथे जायला इतर कुठल्याही देशाचा व्हिसा घ्यावा लागत नाही. अंदमान-निकोबार ही बेटे भारताच्या पूर्व किनाऱ्याकडील बंगालच्या उपसागरात आहेत. मात्र लक्षद्वीप-मिनिकॉय बेटांचा समूह वसविला आहे. त्यांच्या बरोबर विरुद्ध दिशेला भारताच्या पश्चिम किनाऱ्याकडील सिंधुसागरात (अरबी समुद्र) वसलेला आहे. 'लक्षद्वीप' या नावावरून लक्षात येते त्याप्रमाणे, कोणे एके काळी एक लाखाच्या आसपास असलेल्या या बेटांपैकी सुमारे छत्तीस बेटे आज अक्षरशः पाण्यावर तरंगताना दिसतात! सर्वसाधारणपणे दाटीवाटीने आकाशाच्या दिशेने झेपावणाऱ्या नारळाच्या हिरव्याकंच वृक्षांनी भरगच्च भरलेली ही बेटे अक्षरशः समुद्रसपाटीलगत असल्यामुळे फेसाळलेल्या लाटा आणि उन्हाळ्याच्या या दिवसांत

सुखवणाऱ्या वाऱ्याबरोबर ही बेटेच्या बेटे समुद्रात चक्क हेलकावे घेताहेत असा सुखद भास आपल्याला सतत होत असतो! भूपृष्ठावरील हिरवाकंच निसर्ग, किनाऱ्यावरील पांढरी शुभ्र रेती आणि किनाऱ्यालगत पारदर्शकता धारण करणारे समुद्राचे निळेशार पाणी आपल्याला या बेटांवर खिळवून ठेवते! ऐन दुपारी होणारा मनस्वी उकाडा सोडला तर आपल्या शारीरिक आणि मानसिक प्रवृत्ती आपोआप प्रफुल्लित होतात.

येथील हवामान पश्चिम किनाऱ्यालगत असलेले कोकण-गोवा-कर्नाटक-केरळाप्रमाणेच असले तरीदेखील तेथील वृक्षराईमधील विविधता येथे नजरेस नाही पडली. नारळी प्रचंड प्रमाणात असली तरी सुपारी मात्र नाही. काजू-कोकमदेखील तुरळकच. केळी मात्र होताना दिसली. रूढार्थाने अभिप्रेत असलेल्या वन्य प्राण्यांमधील विविधता कमी दिसली. आश्चर्य म्हणजे या बेटांवर साप आणि कुत्री अजिबात नाहीत, अशी माहिती मिळाली आणि तशी वस्तुस्थिती असल्याचे नजरेला जाणवलेही. पक्ष्यांमध्ये साहजिकच सागरी पक्ष्यांचा भरणा अधिक. मनुष्यवस्ती नसलेल्या एका बेटावर पक्षिजीवन समृद्ध असल्याची माहिती मिळाली.

या छत्तीस बेटांपैकी केवळ सात ते आठ बेटांवरच प्रवाशांना जायला परवानगी असते आणि ती सर्व छोट्याछोट्या प्रवासी सागरी नौकांनी जोडलेली आहेत. वेगळ्या संघराज्याचा दर्जा असलेल्या या बेटांची राजधानी केवराट्टी हे बेट असून तिथे केरळातील कोचीन-एर्नाकुलम येथून विमानाने अथवा बोटीने जाता येते.

या सर्व बेटांवरील प्रवासी वाहतुकीचे नियमन या संघराज्यानेच प्रस्थापित केलेल्या स्पोर्टस् या यंत्रणेद्वारे होते. त्यामुळे तिथे जाण्यासाठी त्या यंत्रणेने प्रस्तुत केलेला एक 'प्रवासी अर्ज' भरून द्यावा लागतो. त्यासाठी विशेष असे काही कष्ट करावे लागत नाहीत. हे सर्व करण्यासाठी वेगवेगळ्या प्रवासी कंपन्या आपल्याला साहाय्य करू शकतात आणि त्यांची माहिती आपल्याला इंटरनेटवर केवळ 'लक्षद्वीप' एवढ्या एका शब्दानेदेखील मिळू शकते.

'स्पोर्टस्'तर्फे सागरी मार्गाने या बेटांची सफर करण्यासाठी ३, ४, ५, ७ दिवस अशा वेगवेगळ्या कालावधीसाठींची 'पॅकेजेस' उपलब्ध आहेत. कोचीनहून पाच दिवसांचे असे पॅकेज सर्व खर्चासहित बोटीवरील प्रथमवर्गाने

प्रवास करण्यासाठी साधारणपणे वीस हजारांपर्यंत मात्र सहज उपलब्ध होते. आपल्या ठिकाणाहून कोचीनपर्यंत आणि परतीचा प्रवास आणि जाता-येता कोचीनला एकेक रात्र थांबण्याचा खर्च वेगळा धरायला हवा. आपण या दौऱ्याचे नियोजन आपल्या केरळच्या सहलीबरोबरदेखील करू शकता.

आपल्याला फारच घाई असली तर कोचीनहून विमान अथवा हेलिकॉप्टरने केवराट्टी या एकाच बेटाला उडती भेट द्या; समुद्रकिनाऱ्यावर सागरी खेळांचा थरार अनुभवा आणि उडत परत या!

मात्र आपल्याला खरंच इथला निसर्ग, सागरी प्रवास, सामुद्री सृष्टी, जलक्रीडा आणि सागरी खेळ यांचा पुरेपूर थरार अनुभवायचा असेल (सर्व वयोगटांसाठी बरे का!) तर मात्र आपण 'केवराट्टी' अथवा अन्य जहाजाने किमान तीन ते पाच दिवसांचे पॅकेजच घ्यायला हवे!

एकाच वेळी सुमारे सातशे प्रवाशांची सोय असलेले 'केवराट्टी' जहाज म्हणजे इटुकल्या लक्षद्वीपाच्या प्रवासातील तुमचे पिटुकले घरकुलच होय! तुमच्या दैनंदिन गरजा सुखेनैव भागवू शकणारे ते एक छोटेसे गावच असते. अल्पावधीतच अनेक मित्र जोडले जाऊ शकतात. पक्ष्याप्रमाणे पाण्यावरून तरंगत जाणाऱ्या या चौमजली जहाजाच्या डेकवरून चौफेर निळेशार पाणी आणि रात्री आकाशातील चमचम ताऱ्यांची विलोभनीय रोषणाई न्याहाळत राहणे हा एक अवर्णनीय आनंद तर असतोच; पण तो आपल्याला अंतर्मुखदेखील व्हायला लावतो. गायकांनी गात राहावे, चित्रकाराने चित्र काढत राहावे, कवींनी काव्य करत राहावे, लेखकांनी आपले विचार शब्दांकित करत राहावे आणि साधकांनी चिंतन करत राहावे; असा हा 'डेकानुभव' असतो!

पहिल्या दिवशी दिवस-रात्र जहाजाने प्रवास आणि दुसऱ्या दिवसापासून दिवसभर ठरलेल्या बेटावरील रिझॉर्टमध्ये वास्तव्य, जलक्रीडा, भोजन आणि संध्याकाळी पुन्हा जहाजावर भोजन, आराम आणि रात्री सागरी प्रवास असा हा सुनियोजित कार्यक्रम असतो.

निळ्याशार पाण्यातील समुद्रस्नान, 'ग्लास बॉटम बोटीतून' समुद्रतळावरील सृष्टीचे निरीक्षण, पाण्याखाली डुबकी घेत रंगीबेरंगी, नाजूक प्रवाळांचे निरीक्षण (snorkeling), तसेच आकाशातून समुद्राकडे झेपावत जाणे (scoobadiving) इत्यादी गोष्टींचा जलक्रीडेमध्ये समावेश होतो. यातील

स्कूबा डायव्हिंगला फक्त सुमारे तीनशे रुपये वेगळे भरायला लागतात. अन्य प्रकारांचा आनंद लुटण्यासाठी वेगळे शुल्क भरावे लागत नाही.

किनाऱ्यालगत अथवा इतरत्र कुठेही प्लॅस्टिक अथवा घाणीचे साम्राज्य नाही, हे बघून खूप आनंद होतो. इथे मुळी प्लॅस्टिकच्या वापरावर बंदीच आहे. त्याचबरोबर 'बंगाराम' बेटाशिवाय इतरत्र सर्वदूर मद्यपानबंदी आहे. आज भारतात मद्यपीविरहित आणि प्लॅस्टिकविरहित समुद्रकिनारे बघायला मिळणे म्हणजे केवढी दुर्मीळ गोष्ट झालेली आहे! या बाबतीत अंदमान बेटांचा समूह मात्र खूपच निराशा करतो. लक्षद्वीपपेक्षा अधिक जैवविविधता असलेला अंदमान बेटसमूह फार वेगाने प्लॅस्टिकच्या विळख्याने आवळला जात आहे. त्याचबरोबर अंदमान-निकोबारमध्ये बांगलादेश, ब्रह्मदेश, श्रीलंका आदी आपल्या शेजारी राष्ट्रांमधून येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षणीय दिसते. लक्षद्वीपमध्ये मात्र तसे नाही. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने या दोन्हीही बेटसमूहांचे महत्त्व प्रचंडच आहे. दोन्हीही बेटसमूहांमध्ये आपल्या नाविकदळाची सुसज्ज केंद्रे आहेत.

ब्रिटिशांच्या काळात त्यांनी अंदमान-निकोबारचा उपयोग राजकीय तसेच जन्मठेप झालेल्या इतर कैद्यांना तुरुंगात ठेवण्यासाठी केला. त्याचबरोबर त्या बेटावरील वृक्षांची मोठ्या प्रमाणावर तोड करून ती वनसंपत्ती इंग्लंडकडे निर्यात केली. या दोन्हीही गोष्टींपासून लक्षद्वीप समूहातील बेटे मुक्त राहिली.

मर्यादित प्रमाणात लोकसंख्या असलेल्या लोकांचे व्यवसाय प्रामुख्याने मासेमारी, नारळाच्या बागांची देखभाल, नारळ वाढवून खोबरे काढणे, त्याचबरोबर खोबरा पावडर आणि त्यांचे विविध खाद्यपदार्थ तसेच तेल काढून ते विकणे हा होय. बाजारपेठ अर्थातच कोचीनमार्गे सर्व भारतभर आणि काही प्रमाणात परदेशी निर्यात होय. मनुष्यवस्ती असलेल्या प्रत्येक बेटाची वेगळी पंचायत असते आणि त्या-त्या बेटाचा कारभार त्यांच्या माध्यमातूनच चालतो. फेब्रुवारी २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात आम्ही तेथे गेलो, तेव्हा तिथेही एप्रिल २०१४ मध्ये होणाऱ्या केंद्रीय निवडणुकीचे पडघम वाजायला लागले होते!

या बेटसमूहातील मिनीकॉय बेटावर असलेल्या सातमजली आणि सुमारे १२५ वर्षांहून अधिक जुन्या असलेल्या द्वीपगृहाचा प्रेक्षणीय स्थळांमध्ये उल्लेख केला जातो. त्यावरून मिनीकॉय आणि सभोवताली दिसणाऱ्या इतर

छोट्याछोट्या हिरव्यागार बेटांचे दृश्य डोळ्यांत साठवून ठेवण्यासारखे असते.

येथील प्रवासी वाहतुकीचे नियमन 'स्पोर्ट्स' या यंत्रणेमार्फत होत असले, तरी त्यांत व्यावसायिकता आणि आधुनिकता आणण्यास भरपूर वाव आहे.

तुम्ही कोचीनमध्ये बोटीवर चढताना तुम्हांला एक 'लाईफ जॅकेट' देण्यात येते. ते तुम्ही बोटीवरून चढता-उतरताना तसेच किनाऱ्यावरील पाण्यात खेळताना आदी सर्वकाळ तुमच्याबरोबर ठेवायला लागते. कोचीनला परत आल्यानंतर बरोबर घ्यायचा कितीही मोह झाला तरी ते बंदरावर त्यांच्या हवाली करावेच लागते!

शेवटी एक अनाहूत पण मोलाचा सल्ला! चकोरांनी शक्यतोवर हा प्रवास शुक्ल पक्षातील चांदण्या रात्री करावा! ग्रह-ताऱ्यांचे निरीक्षण करण्याचा छंद असणाऱ्यांनी कृष्ण पक्षाची निवड करावी. आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपली सोय, संगत आणि प्रकृतिमान बघून केव्हा जायचे ते ठरवावे. मात्र आपले हातपाय हालताहेत तोवर भारतीय संघराज्याच्या या भागाला भेट द्यावीच द्यावी!

-- -- --

# ११. यासार विद्यापीठ आंतरराष्ट्रीय परिषद आणि तुर्कस्तान २००७

आजकाल इंटरनेटच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय परिषदांची माहिती सहज उपलब्ध होते. किंबहुना कोणत्याही विषयांच्या परिषदांची (कॉन्फरन्सेसची) यादीच तयार मिळते. त्या यादीत मुख्य विषय, त्या विषयातील उपविभाग, शोधनिबंधाचा सारांश (ॲब्स्ट्रॅक्ट) पाठवण्याची तारीख, पूर्ण निबंध पाठवण्याची तारीख, शोधनिबंध मान्य/अमान्य होण्याची तारीख व परिषदेची अन्य माहिती सहज उपलब्ध होते.

यासार विद्यापीठाने (इझमीर, तुर्कस्तान) 'व्यवस्थापन आणि अर्थशास्त्र' या विषयाची आंतरराष्ट्रीय परिषद दिनांक १४ जून ते १७ जून २००७ या काळात आयोजित केली होती. जानेवारी २००७पर्यंत सारांश पाठवायचा होता. हा सारांश एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात स्वीकारला गेल्याचे कळले. मग संपूर्ण शोधनिबंध ठरावीक साच्यात बसवून पाठवून दिला. माझा विषय अर्थशास्त्रातील 'Loanable Fund Theory'वर आधारित होता.

तुर्कस्तानमधील इझमीर शहराच्या जवळ (वस्ती सुमारे ३५ लाख), ('चेसमे' नावाचे) समुद्रकिनाऱ्यालगत छोटे गाव आहे. तेथील 'अल्टमुनस बायोथर्मल ॲन्ड थेलासो सेन्टर' या पंचतारांकित हॉटेलमध्ये परिषद आयोजित केली होती. यासार विद्यापीठ इझमिरला आहे. ६० निरनिराळ्या देशांतून सुमारे ५०० शास्त्रज्ञ, अभ्यासक, विद्यार्थी आले होते. माझ्या शोधनिबंधाचे वाचन आणि चर्चा दिनांक १५ जून २००७ रोजी दुपारी ४.३० वाजता झाले. पॉवर पॉइन्ट प्रेझेन्टेशनमुळे वाचन आणि चर्चा सुलभ झाली. चारही दिवस वातावरण शैक्षणिक आणि अभ्यासू होते. तेथील व्यवस्थापन आणि वातावरण यांबद्दल यासार विद्यापीठाचे अभिनंदन करायला हवे; परंतु या लेखाचा मुख्य उद्देश तुर्कस्तानची प्रगती, झालेला बदल, पर्यटन आणि आर्थिक स्थिरता असा ठरवला आहे. वास्तविक तीन-चार वर्षांपूर्वी तुर्कस्तानमधील फक्त इस्तंबूल शहर नीट बघितले होते.

आता २००७मध्ये इतर भागही बघितला आणि तुर्कस्तानचा युरोपकडील ओढा, युरोपियन युनियनमध्ये सामील होण्यासाठीचा प्रयत्न पाहून आश्चर्य वाटले.

इस्तंबूल शहर आणि विमानतळ प्रेक्षणीय आहेत. इस्तंबूलमध्येही गावभाग आहेच. जवळजवळ चिकटून असलेल्या इमारती, छोटे अरुंद रस्ते आणि बाजाराचा अस्वच्छ भाग ही जुन्या शहराची वैशिष्ट्ये आहेतच; पण विमानतळ, विमानतळापासून मुख्य गावापर्यंतचा रस्ता, समुद्रकिनारी असलेल्या छोट्या-मोठ्या बोटी, समुद्रकाठावरील मासेमारी, आशिया आणि युरोप यांचे निराळेपण दाखवणारा मोठा पूल या सर्व गोष्टी प्रेक्षणीय आहेत. तीन-चार वर्षांपूर्वी तेथील लीरा या चलनाचा भाव फारच अस्थिर होता. सरकारी कागदपत्रांप्रमाणे महागाईचा दर २०% असला, तरी वास्तवात तो ७०% पर्यंत होता. लीराची रोजची किंमत (युरो-डॉलरसाठी) फारच डळमळीत होती. आज तेथे महागाईचा दर ७-८% आहे. साक्षरता ८७% आणि तुर्कस्तानचे आयुर्मान ६८.५ वर्षे आहे. आज इकॉनॉमिक ग्रोथ रेट सरासरी ७५% आहे; आणि हा फारच मोठा बदल आहे.

इस्तंबूल शहर एक कोटीपेक्षा जास्त वस्तीचे आहे, तर इझमीर शहर सुमारे ३५ लाख लोकवस्तीचे आहे. स्वच्छ व मोठे रस्ते, वाहतूकनियंत्रक दिवे, सहापदरी रस्त्यांच्या अनेक रचना, रस्त्याच्या दोन्ही बाजूला आणि मध्ये राखलेल्या बागा, मोठ्या रंगीत इमारती अशा सर्व सुविधांची सुनियोजित रचना इझमिर शहरात दिसून येते. रस्ता निर्मनुष्य आणि वाहने नसली, तरी वाहतुकीचे, विशेषत: वाहतूक दिव्यांचे नियम कटाक्षाने पाळले जातात. यासार विद्यापीठाचे आवार आणि शैक्षणिक सुविधा पाहून आश्चर्य वाटले. विद्यापीठाच्या आवारात मुले आणि मुली मोकळेपणाने फिरत होते. पडदा/गोषा वगैरे दिसले नाहीत, पण मुली डोक्यावरून-तोंडावरून स्कार्फ बांधतात. रस्त्यावर इंग्रजी संभाषण आढळत नाही. दुकानातसुद्धा इंग्रजी भाषेपेक्षा खाणाखुणांनी व्यवहार होऊ शकतो. व्यवहारात डॉलर-पौंडापेक्षा 'युरो' पसंत करतात.

इस्तंबूल, इझमीरनंतर कॉन्फरन्सच्या छोट्या 'चेसले' गावात हिंडलो. पाच दिवस तेथील हॉटेलमध्येदेखील राहिलो. दुकानांतून स्वच्छता दिसत होती. इंग्रजी भाषा मात्र अभावानेच दिसत होती. चांगल्या टॅक्सी, टॅक्सी स्टँड्स,

मीटरप्रमाणे भाडे व वाहतूक दिव्यांना योग्य मान या लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी दिसत होत्या. पुण्यातील वाहनचालकांना याचे नावीन्यच वाटेल. रस्त्यावर टपऱ्या नव्हत्या, पण छोट्या गल्ल्यांमधील दुकानदार त्यांचा माल रस्त्यावर लावत होते. थोडीफार खरेदी या गावातच करता आली. विशेष म्हणजे रस्ते, फूटपाथ खणलेले दिसले नाहीत. हातात कुदळ, तोंडात विडी घेऊन खड्ड्याच्या बाजूला बसलेले कामगार दिसले नाहीत.

यानंतर 'इफॅसुस' आणि 'अर्टीमीसचे' मंदिर यांना भेट दिली. इफॅसुस शहराला आणि मंदिराला इ.स.पूर्व १००० पासूनचा इतिहास आहे. या शहराने बऱ्याच परदेशी आक्रमणांना तोंड दिलेले आहे. इ.स.पूर्व ३०० मध्ये अलेक्झांडर हा पराक्रमी राजा येथे राज्य करत होता. हा इफॅसुसचा सुवर्णकाळ समजला जातो. या शहराच्या जवळच जगातल्या आश्चर्यांपैकी एक असलेले 'अर्टीमीसचे' मंदिर आहे. मुळात २२०'×४२५' एवढ्या प्रचंड आकाराचे आणि १२७ उभे स्तंभ असलेले हे मंदिर आज पूर्ण रूपात अस्तित्वात नाही. त्या ठिकाणी १२७ स्तंभांपैकी फक्त एकच स्तंभ शिल्लक आहे, परंतु हे मंदिर अस्तित्वात असल्याचे इ.स. पूर्वीचे इतर अनेक पुरावे उपलब्ध आहेत. इ.स.पूर्व १००० वर्षांपूर्वीचे शहर. स्टेडियम, ग्रंथालय, कारंजी, सार्वजनिक शौचालय, पार्लमेंट भरण्याची जागा इत्यादींचे अवशेष अजूनही या शहरात शिल्लक आहेत. पुरुष-स्त्रियांचे उंच उभे पुतळे आहेत, पण कोणाचीही डोकी-चेहरा उरलेला नाही. त्या काळी पुतळ्याचे मुंडके व चेहरा वेगळा तयार करून एकसंध धडावर बसवत. भूकंपाने डोकी आपोआपच खाली पडत व धड शिल्लक राही. माणसांच्या द्वेषामुळे बरीच मुंडकी मुद्दाम उडवली गेली, हेही सत्य आहे.

इफॅसिसजवळ एका (गालिचाच्या) उत्पादन केंद्राला भेट दिली. भारतात अशी केंद्रे खूप आहेत. त्यामुळे महत्त्व वाटले नाही; परंतु येथील गालिचाची किंमत मात्र एक स्क्वेअर फुटाला सहजपणे २००-५०० डॉलर सांगत होते.

ख्रिश्चन धर्मातील व्हर्जिन मेरी ज्या ठिकाणी राहिली आणि जिथे तिचा मृत्यू झाला असे समजले जाते, त्या इफॅसिसजवळच्या एका डोंगराला भेट दिली. तेथील पाणी प्यायल्याने पुण्य मिळते आणि तेथील झाडाला कापडाच्या चिंध्या बांधून मनातील इच्छा पूर्ण होते, असे समजणारे भाविक खूप होते.

मी राहत होतो, ते चेसलेचे हॉटेल उत्कृष्टच होते. प्रशस्त खोल्या, उत्तम आहार, समोर स्वच्छ समुद्र, छोट्या-मोठ्या खासगी बोटी, शुद्ध हवा यांमुळे वास्तव्य चांगले झाले.

परदेशी पाहुण्यांनी देशात येऊन राहावे व पर्यटनस्थळांना भेटी द्याव्यात, यासाठी तुर्कस्तानने खूपच श्रम घेतलेले दिसतात. उत्तम रस्ते, परिपूर्ण विमानतळ, स्वच्छ पर्यटनस्थळे, सर्व ठिकाणी पाण्याची आणि स्वच्छ शौचालयांची सोय या गोष्टी विशेष नमूद करायला हव्यात. येथे चांगल्या टूरिस्ट बस उपलब्ध असून प्रवासात बसमध्ये खाण्यास बंदी आहे. कागद-कचरा रस्त्यावर टाकण्याचा विचारसुद्धा मनात येत नाही, असे वातावरण तयार झालेले आहे.

तुर्कस्तानसारख्या छोट्या देशाने इतक्या कमी कालावधीत एवढा बदल घडवून आणला आहे, तर भारताला ते का जमू नये? अजून थोड्या वर्षांत भारत सर्वांत जास्त तरुणांनी भरलेला देश असेल. मात्र सार्वजनिक स्वच्छतेच्या सुविधा चांगल्या पद्धतीने कशा वापराव्यात, ह्याचे शिक्षण या तरुणांना योग्य रितीने दिले गेले पाहिजे. गेल्या ६० वर्षांत भारतातील आग्रा, फत्तेपूर सिक्री, म्हैसूर, कन्याकुमारी, वाराणसी इत्यादी नावाजलेल्या पर्यटन. स्थळी स्वच्छ रस्ते, उत्तम स्वच्छतागृहे, सार्वजनिक जागा वगैरे सुविधांचा विचारच केला गेलेला नाही. भारतातील पर्यटक परत जाताना येथील घाणीने आणि दुर्गंधीने भरलेली 'स्वच्छतागृहे' लक्षात ठेवतो. पर्यटक आकर्षित होण्यापेक्षा अस्वच्छतेने ग्रासलेले असतात.

आपण सगळ्यांनी याचा विचार करायला हवा.

नुकतीच 'पंढरीची वारी' पुण्याहून सासवडला गेली. जवळजवळ पाच लाख वारकऱ्यांनी हडपसर-फुरसुंगीमार्गे पुणे ते सासवड प्रवास केला. एक मोठे शहरच्या शहर स्थलांतरित झाले. 'हरियाली, ठाणे' संस्थेतर्फे दुसऱ्या दिवशी मारुती गाडीने सकाळी ९पर्यंत मी सासवडला पोहोचलो. लक्षात घ्या, पुणे ते सासवड रस्ता संपूर्ण स्वच्छ होता. वाटेत पिशव्या, कागद, प्लॅस्टिक, बाटल्या असा कचरा कोठेही दिसला नाही. यंत्रणा योग्य असेल तर भारतातही असे होऊ शकते!

-- -- --

# १२. केनिया : पर्यटन आणि पर्यावरण

महाविद्यालयात असताना जॉन गुंथूरचे 'इनसाइड आफ्रिका' वाचले होते. त्यानंतर ३०-३५ वर्षांनी डेव्हिड लॅम्बचे 'द आफ्रिकन्स' वाचले. पहिल्या पुस्तकात केनियाचा मागासलेपणा, पण वन्य जीवनाचे उत्तम वर्णन, तर दुसऱ्या पुस्तकात केनियाच्या सुधारलेपणाचे वर्णन आहे.

केनियातील वन्य प्राणी, पक्षी, जंगले, गवताळ प्रदेश आणि मागासलेल्या जमाती यांबद्दल मला पहिल्यापासून खूप आकर्षण होते आणि इतर देश पाहिल्यावरही केनियाचे आकर्षण कमी झाले नव्हते. त्यामुळे आठ-दहा दिवस केनिया सफारी केल्यावर माझ्या विचारांची दिशाच बदलून गेली. मुख्यत: केनियाने सबंध पृथ्वीवरील वन्य प्राणी, पक्षी आणि मानवी जीवन यांच्यावर केलेले उपकार जाणवले.

केनियाची राजधानी नैरोबी इतर देशांतील प्रगत शहरे - उदाहरणार्थ, मुंबई, लंडन, टोरांटो यांच्यासारखीच आहे. नैरोबीच्या बाहेर पडलात की, शहरीकरण लगेचच संपते. मात्र याचा अर्थ 'जंगल सुरू होते' असा नाही. शहराबाहेर सलग कित्येक किलोमीटर सपाट जमीन पसरलेली आहे. झाडे तुरळक आणि डोंगर जवळजवळ नाहीत. फक्त दोनपदरी रस्ते आहेत. सलग २०-३० किमी.मध्ये गावे नाहीत. दुकाने नाहीत. वस्त्या-झोपडपट्ट्या नाहीत. विशेष म्हणजे रस्त्याच्या दोन्हीही बाजूला शेतेही नाहीत. नैरोबीहून टांझानियातील किलीमांजारो शिखर दिसेपर्यंत डोंगरही नाहीत. नैराबी ते दक्षिणेला अंबोसली नॅशनल पार्क हे जवळजवळ २७० किमी. अंतर आहे, पण ज्यांना गावेही म्हणता येणार नाही, अशा केवळ दोन-चार वस्त्याच वाटेत लागल्या असतील. हेच वर्णन नैरोबी ते पूर्वेला मसाईमारा (२७० किमी.), नैरोबी ते उत्तरेला नाकुरू लेक (१८० किमी.), नैरोबी ते उत्तरेला साम्बारू नॅशनल पार्क रिझर्व (३३० किमी.) या चौफेर रस्त्यांना लागू होईल. या रस्त्यांचे खास वर्णन म्हणजे दोन्हीही बाजूला शेते नाहीत, झाडेही नाहीत. अगदी तुरळक वस्त्या, बैठी घरे आणि थोडीफार दुकाने

आहेत. मधूनमधून केवळ एखादे झाड किंवा झुडूप दृष्टीस पडते. बाकी बारीकबारीक गवत किंवा लाल-काळी सपाट जमीन आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याने एखाद्या उतारावर जमीन कापून काढल्यासारखी दिसते. मोठी पर्वतराजी किंवा डोंगर नसल्याने आकाश खूप अंतरापर्यंत पसरलेले दिसते आणि सोबतीला ढगात रंगांची उधळण असतेच.

अंबोसली, मसाईमारा येथील 'सोपा लॉज', अबेरदेरचे 'दि आर्क लॉज', 'नैबाशा सोपा लॉज' इत्यादी सर्व हॉटेल्स छान आहेत. खोल्या सर्व सोयींनी युक्त, स्वच्छ आणि आजूबाजूच्या निसर्गाला शोभतील अशा आहेत. ही सर्व हॉटेल्स बैठी आहेत. येथील स्वागत पेये, न्याहारी, जेवण, अन्य पदार्थ चविष्ट होते. जेवणात अनेक निरनिराळे पदार्थ उत्तम पद्धतीने सजवलेले होते. शाकाहारी व मांसाहारी असे दोन्ही प्रकारचे अन्नपदार्थ होते. सफरचंद, मोसंबी, संत्री, दूध, चहा, कॉफी वगैरे भरपूर प्रमाणात उपलब्ध होते. दुपारच्या गेम ड्राईव्हकरता बंद डब्यातील जेवण पाण्याच्या बाटलीसह असे. रात्री मसाईमारा जमातीचा नृत्यप्रकार पाहायला मिळे. भर शहरापासून इतक्या दूर असूनसुद्धा फारच चांगली हॉटेल्स होती. प्रत्यक्ष प्राणी-पक्षी पाहण्यासाठी 'गेम ड्राईव्हसुद्धा' एखादा तास ड्रायव्हिंग अंतरावर आहे. खोल्यांमध्ये पंखे नाहीत. अर्थात आवश्यकताही भासली नाही. जनरेटरची वीज सकाळी आणि संध्याकाळी दोन-दोन तासच होती. सेवकवर्गही चांगला होता.

एकदा मुख्य रस्ता सोडला की, उरलेले रस्ते केवळ मातीचे आहेत. येथील सफारी गाड्या नऊ-तेरा आसनांच्या आहेत. पर्यटकांच्या वरील टप म्हणजेच 'पॉप अप् रूफ' दोन-तीन फूट वरती जातो. त्यामुळे आतील सर्व पर्यटकांना बाहेरील प्राणी, पक्षी, निसर्ग कोणताही अडथळा न येता पाहता येतात. या गाड्या वायरलेसने आणि जीपीएसने जोडलेल्या असतात. प्रत्यक्ष नॅशनल पार्क्समध्ये त्या रडारवर असतात. त्यामुळे ड्रायव्हर नियम पाळतात. फक्त ठरलेल्या वाटेवरूनच नेतात. पर्यटकांच्या आग्रहाखातरसुद्धा वाट सोडत नाहीत आणि प्राण्यांच्या जवळ नेत नाहीत. कित्येक वेळा प्राणीच जवळ येतात. आमच्याच गाडीजवळ प्रथम सिंह आणि नंतर चित्ता हे प्राणी हाताच्या अंतरावर उभे होते. सिंह, सिंहीण, चित्ता यांचा शोध घ्यायला लागतो; पण कोणत्याही गाडीला त्यांचे दर्शन झाले की, ती गाडी ही बातमी

इतर गाड्यांना कळवते. मग या प्राण्यांच्या भोवती १५-२० गाड्यांचा घोळका जमतो. सर्व पर्यटक आवाज न करता प्राणी आणि त्यांच्या हालचाली पाहत राहतात आणि कॅमेऱ्यात टिपत राहतात. ड्रायव्हर लोक एकमेकांच्या सहकार्याने पर्यटकांना प्राणी दाखवतात.

सिंह, चित्ते, हरणे, कोल्हे, लांडगे इत्यादी प्राणी जंगलात राहतात, हे काही फारसे खरे नाही. या प्राण्यांना गवताळ प्रदेश लागतो. गवताळ प्रदेशामुळे येथील वन्य प्राण्यांचे जीवनचक्र चालू आहे. केनियाच्या गवताळ प्रदेशात आणि जंगलात वाघ नाहीत. येथे हत्ती, ऱ्हायनो, सिंह, चित्ता आणि गवे (वाईल्ड बफेलो) असे मोठे समजले जाणारे पाच प्राणी आढळतात. याशिवाय झेब्रा, जिराफ, हायना, हरणे, कोल्हे, वाईल्ड बीस्ट, माकडे, वानरे, हिप्पो इत्यादी सर्व प्राणी आणि निरनिराळे पक्षीही मोठ्या प्रमाणावर आहेत. एखाद्या वेळी सिंहिणी किंवा चित्ते शिकार करताना प्रत्यक्ष पाहायला मिळतात. जंगल सफारी करण्याचा तुमचा कालावधी योग्य असेल, तर हजारो प्राण्यांचे स्थलांतर पाहायला मिळते. फ्लेमिंगोंचे लाल-पांढरे थवे प्रेक्षणीय आहेत. त्यांचे आवाज श्रवणीय आणि त्यांच्या हालचाली मनमोहक वाटतात. रात्री 'दि आर्क' हॉटेलच्या काचेच्या गॅलरीत बसले की, जमिनीतील क्षारांसाठी आणि पाण्यासाठी आलेले असंख्य प्राणी दिसतात. एकाच जातीच्या प्राण्यांच्या झुंडीच्या झुंडी येतात आणि खाणेपिणे झाले की निघून जातात. प्राण्यांवर फोकस करणारे मोठेमोठे दिवे लावलेले असल्याने त्यांच्या सर्व हालचाली व्यवस्थित पाहता येतात. नैवाशाला माझ्या पहिल्या मजल्यावरील खोलीच्या व्हरांड्यात दोन जिराफांनी मान घालून पाहणी सुरू केली होती. मी फोटो घेण्यासाठी कॅमेरा शोधला, तेवढ्यात जिराफांची जोडी निघून गेली.

एकाच वेळी आणि एकाच दृष्टिक्षेपात शेकड्यांनी हत्ती, हरणे, सांबरे, तरस, वाइल्ड बीस्ट पाहणे आणि त्यांचा मुक्त संचार पाहणे म्हणजे मोठी मेजवानीच होती! काही हॉटेल्समध्ये सकाळ-संध्याकाळ एस्कॉर्टशिवाय खोलीच्या बाहेर पडायला मनाई होती.

नॅशनल पार्कमध्ये 'ऑब्झरवेशन हिल' आहे. या टेकडीवरून डोंगर, झाडे अथवा अन्य कोणताही अडथळा न येता सर्व दिशांचा कित्येक चौरस किमी.चा प्रदेश पाहता येतो. या प्रदेशात झाडे नाहीत. फक्त झुडपे,

पाणथळ जागा आणि गवतच आहे. टेकडीवर उभे राहिल्यावर सर्व बाजूला दृष्टी पोहोचेपर्यंत शेकड्यांनी हत्ती, पाणघोडे, ऱ्हायनो, वाईल्ड बीस्ट इत्यादी प्राणी दिसतात. भारतातील कुरुक्षेत्रातही एवढा मोठा प्रदेश नाही. पर्यटकांनी या ('पाहणी) टेकडी'चा अनुभव जरूर घ्यावा. केनियातील हॉटेल्स, वन्य प्राणी, स्वच्छ आकाश, कित्येकशे चौरस कि.मी.चा सपाट भूप्रदेश, गवताळ प्रदेशात बागडणारी हरणे, सांबर, कोल्हे हे एकदातरी बघायलाच हवे.

आता शेवटचा मुद्दा पण तो मी प्रथमच नमूद केलेला आहे. केनियातील शासनाने, तेथील जनतेने जगातील इतर देशांवर आणि देशवासियांवर प्रचंड उपकार केलेले आहेत. शेकडो चौरस कि.मी. जमिनीवर कोणतेही पीक वर्षातून एकदासुद्धा न घेता ती जमीन केवळ वन्य आणि अन्य प्राणी-पक्ष्यांसाठी राखून ठेवलेली आहे. मानवाच्या वसाहती, रस्ते, रेल्वे, कारखाने, खाणी न काढता केवळ पर्यावरणाचा आणि पर्यटनाचा विचार करून या जमिनीला हातही लावलेला नाही. सध्याच्या यंत्रयुगात, जागतिकीकरणाच्या रेट्यात या अफाट जमिनीत पीक नाही, सिमेंटचे कारखाने नाहीत, खाणी नाहीत, पेट्रोल-डिझेलकरता जमिनीखाली किंवा जमिनीवर खोदाई नाही, हा मोठाच त्याग आहे आणि प्राण्यांच्या नैसर्गिक जीवनाला धक्का लागू नये, एवढाच या व्यापक त्यागामागचा उद्देश आहे.

नैरोबी, मोंबासा ही शहरे सोडली, तर इतरत्र गरिबी आणि अज्ञान पसरलेले आहे. आज केनियाने मनात आणले, तर त्यांच्या अफाट पसरलेल्या जमिनीचा औद्योगिक वापर करण्यासाठी जगातले मोठे उद्योगपती वाट पाहत आहेत, परंतु तसे झाले, तर केनियाची जमीन वरून आणि खालून मोठ्या प्रमाणात पोखरली जाण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील देशांत तेलामुळे आलेली समृद्धी आणि श्रीमंती केनियाच्या डोळ्यासमोर आहे. अशा पद्धतीने केनियालाही श्रीमंत व्हायला वेळ लागणार नाही आणि जगातील धनदांडगे लांडगे केनियाचे वाळवंट करायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. मात्र अद्यापतरी केनिया ह्या लोभाला बळी पडलेला नाही. डब्लू. डब्लू. एफ.च्या आय. एल. आर. आय. सर्व्हेप्रमाणे (इ.स. १९८९-२००३) केनियातील जिराफ, हॉग्ज, वाईल्ड बीस्ट, इम्पला कमी झाले आहेत. तसेच तेथील

जंगलाचे क्षेत्रफळ १८२१ चौ.किमी.वरून (इ.स. १९६१) १५१० चौ.किमी. (इ.स. १९८४) कमी झाले आहे.

त्यामुळे जगातील सर्व देशांनी केनियाला धान्य, शिक्षण, कापड इत्यादी प्रकारची मदत करणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. यामुळे केनियातील गवताळ प्रदेश, जंगले आणि प्राणी-पक्षी जीवन अबाधित राहील. गरीब केनियाला गरीब ठेवणे योग्य होणार नाही. अन्यथा पुढच्या पिढ्यांना हे सर्व प्राणी-पक्षी चित्रांत किंवा भुसा-पेंढा भरलेल्या प्राण्यांच्या रूपात काचेच्या कपाटात पाहावे लागतील.

-- -- --

# १३. दर्यावर्दी ख्रिस्तोफर कोलंबस त्याच्या अस्थी, वंश, रंग आणि डीएनए

काही वर्षांपूर्वी पुण्यात आणि महाराष्ट्रात अन्य ठिकाणी संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या आळंदीमधील समाधीबद्दल वाद निर्माण झाला होता. जाणकार अभ्यासूंनी 'समाधीच्या ठिकाणी छोटा कॅमेरा सोडून त्या जागेचे सर्वेक्षण करावे' असा विषय चर्चेत आणला होता. वारकरी आणि अन्य नागरिकांनी कडवा विरोध करून या सर्वेक्षणाच्या विचाराला पूर्णविराम दिला. 'सध्या (इ.स. २०१२) पॅलेस्टिनी नेता यासिर अराफत याच्यावर विषप्रयोग झाला होता काय?' यासाठी त्याची दफनभूमी खणून अस्थींवरील 'डीएनए तपासणी' चर्चेत आहे.

मी नुकताच (ऑक्टोबर २०१२) स्पेनला भेट देऊन आलो. सेविला शहरातील अप्रतिम कॅथीड्रल पाहिल्यानंतर आणि त्याचा इतिहास वाचल्यावर उत्सुकता वाटली. कोलंबसच्या अस्थींचे प्रचंड शिल्प पाहून तर माझ्यातील पर्यटक आणि अभ्यासक जागा झाला. अमेरिकेचा आणि अन्य ठिकाणांचा शोध लावणारा दर्यावर्दी ख्रिस्तोफर कोलंबस (१४५१-१५०६) याच्या अस्थींना अद्याप कायमचे स्थान मिळालेले नाही. तो जन्माने कोण होता? त्याचा जन्म कोणत्या देशात झाला? तो काळा होता की गोरा होता? खऱ्या अस्थी कोठे आहेत? अद्याप असे बरेच वाद संपलेले नाहीत. यांपैकी त्याच्या अस्थी आणि डीएनए पृथक्करण यांचा वाद खूपच रंगलेला आहे. तो वाद सध्या डीएनए प्रयोगशाळेत आणि अमेरिकेच्या समाजकारणात चर्चेतही आहे. सोबतच्या फोटोत दिसणाऱ्या शिल्पातील बंद पेटीत कोलंबसच्या अस्थी आहेत, असा स्पेनचा दावा आहे.

कोलंबसचा जन्म ३१ ऑक्टोबर, १४५१ रोजी जीनोवा (इटली) येथे झाला. आपल्या ५५ वर्षांच्या दर्यावर्दी आयुष्यात त्याने १९ समुद्रसफरी केल्या. 'सांतामारिया' या जहाजाने सुरुवात करून बहामा, क्युबा, वेनिझुअला, हिस्पनिओला (डोमिनिकन रिपब्लिक), कॅनरी बेटे इत्यादी देश त्याने शोधले आणि स्पेनच्या राजाचे राज्य स्थापन केले. काही देश त्याला

चीन वाटले तर काही जपान वाटले. पृथ्वीचा परीघ २३०० मैल असावा, असा अंदाज त्याने व्यक्त केला होता, प्रत्यक्षात मात्र पृथ्वीचा परीघ २५००० मैल आहे. त्याच्या शोधांमुळे तो स्पेनमधील सन्माननीय दर्यावर्दी समजला जातो. सध्या ५०० वर्षांनंतर त्याचा वंश, रंग आणि त्याच्या अस्थी यांच्या वादामुळे त्याचे नाव पुन्हा गाजते आहे. त्या संदर्भात विविध दिशांनी झालेल्या संशोधनाचा आढावा पुढे थोडक्यात दिला आहे.

१. वंश : i) केंब्रिज विद्यापीठातील संशोधनानुसार (इ.स. २००२) कोलंबस मूळचा आफ्रिकन असावा आणि काळा असावा. ii) वेलिंग्टन मालेच्या अभ्यासानुसार कोलंबसचा जन्म जीनोआतील असावा, स्पॅनिशमध्ये अधिकाधिक लिहिले व बोलले जात असावे. पण तो १००% काळा असावा आणि कदाचित केमेरूचा असावा. iii) कार्ल मिनिसी (न्यू जर्सी) हा संशोधक म्हणतो, कोलंबस इटालियन अमेरिकन असावा, पण काळा नक्की नसावा. iv) प्रा. एस्तेल्ली इरीझणी ह्या भाषाशास्त्रज्ञ म्हणतात, त्याची भाषा काताालान (स्पॅनिश) होती. तो ज्यू होता, पण त्याने ते गुप्त ठेवले होते. त्याच्या लिहिण्याची पद्धत, चिन्हे, भाषा इत्यादींवरून तो आयबेरीयान किंवा कातालोनिया किंवा बलेत्रिक बेटे येथील असावा, असे प्रतिपादन इरीझणी यांनी केले आहे. v) तो पोर्तुगीज राजपुत्राचा अनौरस मुलगा असावा, असेही मत एका संशोधकाने व्यक्त केले आहे. कोलंबस स्वत: म्हणतो, ‘मी पोकळीतून (Nothing) आलो.’

२. रंग : कोलंबस हा गोरा नव्हताच आणि काळा होता, हे प्रतिपादन नुकतेच मान्य व्हायला लागले आहे आणि त्याचे पुतळे योग्य पद्धतीने बदलावेत, असा विचारही चर्चेत आहे.

३. कोलंबसच्या अस्थी : हा विषय तर सर्वांत गुंतागुंतीचा आणि संबंधित राष्ट्रांतील जनतेच्या जिव्हाळ्याचा आहे. कोलंबसचा मृत्यू २० मे, १५०६ मध्ये वालोडोलीड (स्पेन) येथे झाला. त्या गावात त्याला दफन करण्यासाठी योग्य दर्जाची दफनभूमी नव्हती, म्हणून त्याचे दफन ला कार्तुजा येथे करण्यात आले. हे ठिकाण सेविलीजवळ (स्पेन) आहे. या वेळी त्याच्या काही अस्थी सांता डोमिंगो (डोमिनिकन रिपब्लिक) येथे दीपगृहाच्या आवारात ठेवण्यात आल्या असाव्यात. कोलंबसच्या विधवा पत्नीने इ.स. १५३७ मध्ये दफनभूमी खणून त्या अस्थी सांता डोमिंगोला नेण्याची परवानगी दिली होती. या अस्थी

फ्रान्सकडे जायला नकोत म्हणून इ.स. १७९५मध्ये हवाना (क्युबा) किंवा सेविली (स्पेन) येथे नेण्यात आल्या असाव्यात.

इ.स. १८७७मध्ये सेविली येथे जमीन खणताना कोलंबसचे नाव कोरलेली अस्थींची पेटी सापडली. सध्या सेविली येथील भव्य कॅथीड्रलमध्ये चार पालवाहक ही पेटी वाहून नेत असल्याचे शिल्प कोरून ती जतन केली गेली आहे. खऱ्या अस्थी सेविलीमध्येच आहेत आणि सांता डोमिंगोमधील दीपगृहाच्या आवारातील अस्थी खऱ्या असतील, तर त्या डीएनए पद्धतीने तपासून घ्याव्यात, असा स्पेनचा दावा आहे. कोलंबस दीपगृहाचा संचालक जॉन बॉप्टिस्ट मेसी याने दफनभूमी खणायला हरकत घेतली आणि ख्रिश्चन धर्म मृत व्यक्तीच्या शरीराला त्रास देत नाही, असे सांगितले. त्यामुळे कोलंबसच्या अस्थींच्या नेमक्या ठिकाणासंदर्भातील वाद तसाच आहे. इ.स. १७९५ मध्ये कोलंबसचे समजून एक चुकीचे शरीर स्पेनला गेले, असाही दावा संशोधक करतात.

या सर्व वादावरची कडी म्हणून, तसंच कोलंबस काळा होता आणि तो स्पॅनिश होता याचा निर्णय लावण्यासाठी म्हणून (इ.स. २००६मध्ये) जोस अन्तेनो लोरेन्ते हा मुख्य संशोधक आणि फोरेन्सिक समूहाने कंबर कसली आहे. कोलंबस आणि कोलंबस या नावाशी सारखेपणा असलेल्या ३५० कॅटलोनियान स्पॅनिश पुरुषांचे आणि इटलीच्या कोलंबस किंवा कोलाबस नावाशी सारखेपणा असलेल्या जिनोवाजवळ (इटली) राहणाऱ्या ८० पुरुषांचे आणि दोन पोर्तुगीज राजवंशातील पुरुषांचे नमुने घेतलेले आहेत. पुरुषांना डीएनएमधील वाय क्रोमोसोम फक्त त्यांच्या वडिलांकडूनच मिळतो. या पुरुषांच्या जिभेच्या खालील भागातून द्राव घेऊन डीएनएसाठी त्याचे पृथक्करण करण्यात येईल. त्याचा निर्णय अद्याप लागायचा आहे. निवडलेल्या पुरुषांनी ह्या परीक्षणासाठी मान्यता दिलेली आहे. मात्र एका अभ्यासकाने कोलंबस हे त्याचे खरे नाव होते की घेतलेले नाव होते असा संशय व्यक्त केला आहे.

इटली आणि अमेरिका यांच्या सहकार्याने अमेरिकेत 'कोलंबस डे' साजरा करण्यात येतो. सध्या अस्तित्वात असलेल्या कोलंबसच्या पुतळ्यात तो काळा असावा की नाही आणि तो इटलीचा होता का नव्हता, हा संभ्रम आहे. भविष्यातील संशोधनच कोलंबसचा इतिहास उलगडून निर्णय घेईल.

लिखित इतिहास, पुरावे आणि पृथक्करण यांबद्दल संशय आणि संभ्रम असणे, ही प्रक्रिया केवळ भारतातच नाही, तर जगात सर्वत्र आहे.

# १४. नॉर्वे-स्वीडन-फिनलंड (स्कँडेनेव्हियन राष्ट्रे)

इ.स. १९५२मध्ये फिनलंडसारख्या लहान देशाने ऑलिम्पिकचे यजमानपद घेतले होते आणि ते सामने उत्तम प्रकारे आयोजित करून वाहवा मिळवली होती. महाविद्यालयात असल्याने खेळांचे आकर्षण होते आणि ऑलिम्पिक म्हणजे अखेरचा शब्द होता. त्यामुळे फिनलंडने स्मरणात कायमचे स्थान मिळवले होते.

इ.स. १९७६मध्ये बेल्जिअमच्या सोसायटीची अभ्यास परिषद हेलसिंकीला होती. मी एक शोधनिबंध पाठवला होता. तो मान्य झाला आणि परिषदेचे निमंत्रण आले. कॉलेजमध्ये प्राध्यापक होतो, त्यामुळे यूजीसीची मान्यता, पारपत्र इत्यादी गोष्टींत वेळ गेला आणि मी या परिषदेला जाऊ शकलो नाही, पण हा योग नंतर ३० वर्षांनी आला. नुसते फिनलंड नाही, तर नॉर्वे आणि स्वीडनही बघता आले.

दिनांक २३ जून २००६ ते ३ जुलै २००६ असा (प्रवासाचा) काळ होता. पुणे ते मुंबई टॅक्सीप्रवास, ट्रॅफिक जाम, विमानप्रवासापूर्वी तीन तास पोहोचणे म्हणजे ८-१० तास आणि पैसे वाया जातात. महाराष्ट्र शासनाचे मुंबईवेड कमी होईल, तेव्हाच यात बदल होईल. ऑस्ट्रीअन एअर लाइन्सने मुंबई-व्हिएन्ना प्रवास केला. विमानतळ छान आहे. लगेच ४ तास थांबून कोपनहेगनला गेलो.

**डेन्मार्क**

डेन्मार्कची राजधानी असलेले शहर पाहण्यासारख्या वस्तूंनी आणि वास्तूंनी भरलेले आहे. राजवाडे, लोकसभा आणि शासकीय इमारती देखण्या आहेत. राजवाड्यातील विस्तीर्ण बाग आणि त्याची राखलेली निगा डोळ्यांत भरते. युरोपियन देशांतील रस्ते आणि बागांची स्वच्छता विशेष असते. नंतर त्रीवोली ही आणखी मोठी बाग/करमणूक केंद्र बघितले. निरनिराळ्या राईड्स, खाण्याच्या उत्तम पदार्थांसाठी आणि जेवण्यासाठी हॉटेल्स/दुकाने हे बघताबघता वेळ भर्रकन निघून जातो. एप्रिल ते सप्टेंबर आणि नोव्हेंबर ते

ख्रिसमस ह्या काळात त्रीवोली उघडे असते. तेथूनच कालव्याला लागून असलेल्या पायवाटेने चालत आम्ही कोपनहेगनचे मोठे आकर्षण असलेली 'छोटी जलपरी' बघितली. बरेच फोटो काढले. मुक्कामासाठी स्कॅंडीक सिटी हॉटेल उत्तम होते.

**नॉर्वे**

स्कॅंडेनेव्हियन देशांना भेट देण्यासाठी मग समुद्रातून क्रुझ म्हणजे तर अनुभवण्यासारखीच गोष्ट आहे. स्वच्छ आकाश, स्वच्छ निळाशार समुद्र, आकाशातील समुद्रपक्षी आणि हालणारी क्रुझ हे एकत्रित अनुभवणे वर्णनापलीकडचे आहे. समुद्रपक्ष्यांचे थवेच्या थवे बोटीवर फिरायचे. फोटो घ्यायला मजा येत होती. क्रुझची स्वयंपूर्ण केबिन आणि खायला विविध पदार्थ यांमुळे नॉर्वेच्या ओस्लो बंदरात कधी पोहोचलो हे समजलेच नाही. ओस्लो हे राजधानीचे शहर आहे. शहराच्या हद्दीतच छोटी-छोटी ४० बेटे आहेत. संपूर्ण शहर डोंगर, पर्वत आणि दाट जंगलाने वेढलेले आहे. मेट्रो शहराची लोकसंख्या सुमारे १५ लाख आहे. विशेष म्हणजे ३.६% वस्ती पाकिस्तानी आहे. या शहराचे एक दुर्भाग्य म्हणजे ओस्लोला १४ वेळा मोठ्या आगी लागलेल्या आहेत. मग इ.स. १६२४ मध्ये सबंध शहर नवीन जागेत हलवण्यात आले. या शहरात गुस्ताव विजेलंड अशी मोठी बाग आहे. गुस्ताव विजेलंड हा प्रसिद्ध मूर्तिकार होता. त्यानेच ह्या बागेचा मूळ आराखडा तयार केला आणि ती बाग प्रत्यक्षात आणली. या बागेत सुमारे २०० निरनिराळ्या मूर्ती किंवा शिल्प आहेत. या अप्रतिम मूर्ती मानवाच्या जीवनातील वेगवेगळ्या अवस्था दाखवणाऱ्या आहेत. इकडच्या शिल्पकारांना आणि मूर्तिकारांना कपड्यांचे वावडे असावे. नग्न मूर्ती किंवा शिल्प हेच विशेष आहेत. बागही झाडांनी आणि हिरव्यागार गवताने भरलेली आहे. दरवर्षी १० लाख पर्यटक येथे भेट देतात.

ओस्लोनंतर बसने प्रवास करत बर्जेनला आलो. हीच बस आम्हांला स्वीडन आणि फिनलंडमध्ये प्रवास घडवणार होती. बर्जेन शहर पूर्वी राजधानीचे शहर होते. या शहरात पाहण्यासारखे आणि अनुभव घेण्यासारखे खूपच आहे. केबल कारने माउंट उलरीक तर फनिकुलर रेल्वेने माउंट फ्लोईनला जाता येते. टूरबरोबर गेला असाल, तर साधारणपणे फनिकुलर रेल्वे कार्यक्रमात असते. (पुण्यात ६०-७० वर्षांपूर्वी नाणेघाटात अशा रेल्वेसाठी कंपनी स्थापन झाली होती, पण ती प्रत्यक्षात आली नाही.) मला नॉर्वेतील अशा रेल्वेचा अनुभव

घेता आला. पर्यटकांनी जरूर बसून बघावे. काही मिनिटांचाच प्रवास आहे. सध्या रोलर कोस्टरच्या राइड्स असतात, तसा थोडासा अनुभव येतो. या प्रवासात आपण एका खोल विहिरीत वेगाने जात असतो.

नॉर्वेचे खास आकर्षण म्हणजे फियोर्ड (Fiord) आहे. हे जागतिक आकर्षण आहे. समुद्राच्या दोन्हीही बाजूला घनदाट वृक्षांनी भरलेले उंच डोंगर किंवा समुद्रच जमिनीत शिरलेला आहे. खाडी नाही. स्वच्छ निळेशार पाणी, निरभ्र आकाश, थंड हवा, दोन्ही बाजूला दाट वृक्षराजी, शांतता आणि अधूनमधून येणारे समुद्रपक्ष्यांचे थवे आणि त्यांचा किलकिलाट. यापेक्षा जास्त पर्यटकांना काय पाहिजे! बोटीच्या डेकवर पर्यटक हेच अनुभवत असतो.

सराग्रेफियोर्ड म्हणजे जमिनीत शिरलेला समुद्र. हा युरोपमधील सर्वांत जास्त आत शिरलेला (२०४ किमी. आत) आणि खोल (१२९६ मी.) समुद्र आहे. ह्या वातावरणाचा मला खास जाणवलेला परिणाम म्हणजे कुठल्याही देशाचे पर्यटक एकमेकांशी दिलखुलास गप्पा मारत होते आणि आपआपले अनुभव सांगत होते.

नॉर्वेतील बसप्रवास फारच छान आहे. डोंगरावरील वृक्षराजीला धक्का न लावता आणि वृक्ष न तोडता रस्ते उत्तम केले आहेत. डोंगरात बोगदे करून रस्ते केलेले आहेत. एकेक बोगदा काही किमी. लांब आहे. मध्येच हवेसाठी झरोके ठेवलेले आहेत. गुदमरून जाणे, श्वासाला त्रास होणे अथवा हवा कमी पडल्याचे कोठेही जाणवत नाही. लारडेल बोगदा जगातील सर्वांत लांब (२४.५ किमी.) बोगदा आहे. लारडेलच्या लोकसंख्येची वाढ गेल्या १० वर्षांत उणे ०.१% आहे. पुण्यात आसपासच्या डोंगरांतून (चतुःशृंगी, तळजाई इत्यादी) असे बोगदे बांधले, तर वाहतूक समस्या हलकी होणे आणि वेळेची बचत असे फायदे निश्चित जाणवतील. पर्यावरणवादातील अतिरेक्यांना उत्तर मिळेल. आपल्याकडील वरिष्ठ अधिकारी परदेशात प्रागतिक शिक्षणासाठी दौरे करतात, पण त्या शिक्षणाचा वापर त्यांच्या कामात करत नाहीत. पर्यावरणाचा ऱ्हास न करता डोंगरातील, बर्फाळ प्रदेशातील, दाट जंगलातील रस्ते कसे काढावेत आणि बांधावेत यासंदर्भात नार्वेचे उदाहरण जगाला पथदर्शक ठरेल असेच आहे. संपूर्णपणे बोगद्यांतून काढलेल्या या एकदिश रस्त्यांना क्रॉस रोड नाहीत. त्यामुळे अपघात कमी आणि वेग जास्त ठेवता येतो आणि वेळेची बचत होते. नॉर्वेत सगळ्या वाहनांना २४ तास दिवे लावण्याचे बंधन आहे.

बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्यांना नित्य गरजांसाठी शहरात यावे लागू नये, म्हणून शासनच त्यांच्या दारात या गोष्टी पुरवते.

लीलीहामर येथे जगातील सर्वांत मोठे स्कीइंग आणि हिवाळी खेळांचे केंद्र आहे. ऑलिम्पिक म्युझियम, ओपन एअर म्युझियम हीदेखील येथील आकर्षणे आहेत. इ.स. १९९४चे हिवाळी ऑलिम्पिक येथे झाले होते.

या देशातील इतकी पर्यटनस्थळे पाहून आणि अनुभवून पर्यटक आश्चर्यचकित होतात. हा देश जरूर बघावा असा आहे.

स्वीडन, स्टोकहोमला आमचा मुक्काम रिका हॉटेलमध्ये होता. न्याहारी, जेवण आणि खोल्या चांगल्या होत्या. एक दिवस शहरातीलच काही ठिकाणे बघितली. स्टोकहोमला प्रयाण केले. दुपारी तीन वाजता चेकइन केले. तेथील एलिट पॅलेस हॉटेलमध्ये राहायला होतो. खोल्या छानच होत्या. सुपर मार्केटला भेट दिली, पण डॉलर्स घेत नसल्याने खरेदी करता आली नाही. रात्री ८.४५ला जेवण झाले, पण १२पर्यंत सूर्यप्रकाश होता. अगदी दोन वाजतासुद्धा दिवसासारखा प्रकाश होता. सकाळी ५.३०ला उठलो आणि ६.३०ला न्याहारीला गेलो. भरपूर ब्रेकफास्ट केला की, दिवसभर जेवणाची आठवण होत नाही. दिनचर्या म्हणून आणि जेवणातील पदार्थ बघून आपोआप जेवावेसे वाटते. सुपरमार्केटला भेट दिली आणि सिटीटूर घेतली. जगातील सर्वांत महाग शहर. स्वच्छता आणि नागरी शिस्त या गोष्टी प्रामुख्याने जाणवतात. नॅशनल म्युझियम उत्तम आहे. ज्या हॉलमध्ये नोबेल पारितोषिक दिले जाते, त्या हॉलला भेट दिली. फोटो काढले. तो समारंभ कसा असतो, ते नेटवर बघितले होते. त्यामुळे तेथील वातावरणाचा अनुभव घेऊ शकलो. व्यवस्थित राखलेली इमारत बघितली. प्रसिद्ध स्टोकहोम विद्यापीठ बघितले. दुपारी महाराजा हॉटेलमध्ये जेवण झाले आणि सिटीटूरचा उरलेला भाग पूर्ण केला.

सायंकाळी – खरे म्हणजे दुपारीच – ५.०० वाजता व्हायकिंग शीपवर फिनलंडसाठी (हेलसिंकीसाठी) प्रयाण केले. चार जणांची केबिन मला एकट्याला मिळाली. उत्तम जेवण, वाइन, बियर अशा सगळ्या गोष्टी भरपूर होत्या. ड्यूटी फ्री दुकाने निरनिराळ्या आकर्षक वस्तूंनी भरलेली होती. काही वस्तू घरच्या शोकेसमध्ये ठेवण्यासाठी, काही वस्तू भेट देण्यासाठी खरेदी केल्या. डेकवर सहप्रवाशांशी गप्पा-विनोद झाले. वर समुद्रपक्षी आणि थंड

हवा अशा वातावरणात निळा समुद्र अनुभवला. हा अनुभव अगदी जरूर घ्यावा. आमच्या गटामध्ये ३८ जण होते. त्यांपैकी १९ जण पुण्यातील होते. त्यामुळे गप्पांची कमतरता नव्हती. बोट १२ मजली होती. छान केबिन, हिंडायला जागा, खाण्याची उत्तम व्यवस्था आणि छान हवा यांमुळे वेळ मजेत गेला. बर्फाच्छादित डोंगरातून समुद्रात येणारे पाणी इतके स्वच्छ असते की, अशा झऱ्यांजवळ थांबून बोटी पाणी भरून घेतात.

हेलसिंकीला सोकोस हॉटेलमध्ये उतरलो होतो. सकाळी ११.०० वाजता सिटी टूरला निघालो. हेलसिंकी मेट्रोची वस्ती सुमारे १३ लाख आहे. सेंट पीटर्स रशियापासून ३०० किमी. दूर आहे. ऑलिम्पिक स्टेडियम, जमिनीखालील कॅथीड्रल, इमारती आणि रस्त्यातील पुतळे हे सर्व बघण्यासारखे आहे. इ.स. १५५० मध्ये स्वीडिश राजाने हेलसिंकी शहर वसवले. त्यानंतर इ.स. २००० मध्ये हेलसिंकी शहर युरोपची सांस्कृतिक राजधानी म्हणून गणली गेली. साधारण ९ लाख लोकसंख्या असलेले हे शहर फिनलंडची राजधानी आहे. येथे उंच इमारती नाहीत, पण जुनी शिल्पकला टिकवलेली आहे. बागा, बाजार, चौक, खुली कॅफेज आणि मोकळी हवा ही येथील खासियत आहे. लुथेरन आणि ओर्थोडोक्स असे धार्मिक समीकरण आहे.

भारताचे श्री. खाशाबा जाधव यांनी १९५२ मध्ये येथेच कुस्तीमध्ये ऑलिम्पिक कांस्य पदक मिळवले होते. त्याचे कौतुक तर झाले नाहीच, पण देशाला महत्त्वही वाटले नाही; पण या छोट्याशा देशाने ऑलिम्पिक भरवून यशस्वी केले, हे स्पृहणीय आहे. शहरातील खेळाडूंचे पुतळे उभारून कौतुकही केलेले आहे. कोल्हापूरला उभारलेले श्री. खाशाबांचे स्मारक इतके अस्वच्छ आणि दुर्लक्षित आहे की, आज साध्या जिल्हा स्तरावर मिळवलेले पदकही मोठे ठरेल.

स्कँडेनेव्हियन देश लहान लहान असून देखणे आहेत. जगातील अनेक देशांतून प्रवास केल्यानंतर येथील नागरिकांचा सार्वजनिक जीवनातील स्वच्छता आणि शिस्तीवर तुलनात्मकदृष्ट्या अधिक भर असल्याचे जाणवले. युरो नाणे खातरीचे वाटत नसल्यामुळे अद्याप त्या-त्या देशाचे चलन वापरले जाते. आमचा प्रवास आणि राहणे दोन्ही निर्विघ्नपणे पार पडले. या तीनही देशांच्या नागरिकांना तीन वेळा नमस्कार करतो. रात्रीच्या सूर्याला प्रणाम...

-- -- --

# १५. काळे पाणी ते निळे पाणी...

ग्रीसमधील बेटांना भेट दिल्यावर त्या सृष्टीची आणि निळ्याशार स्वच्छ पाण्याची मला भुरळ पडली होती. अंदमानमधील बेटे, स्वच्छ पाणी आणि पाण्याखालील रंगीबेरंगी कोरल्स पाहिल्यावर ग्रीसचा समुद्र फार मागे पडला.

पुण्याहून मी पोर्ट ब्लेअरला गेलो. १५ जानेवारी ते २४ जानेवारी २००८ हे दिवस कसे संपले ते कळले नाही. पोर्ट ब्लेअरपासून सुमारे ५४ समुद्री किमी. बोटीचा प्रवास करून 'हॅवलॉक' बेटावर पोहोचलो. राधानगरचा स्वच्छ समुद्रकिनारा, वाळू आणि निळे पाणी बघून दिवसाचा थकवा निघून गेला. हॅवलॉकचे वैशिष्ट्य म्हणजे हिरवीगार वनश्री, निळा स्वच्छ समुद्र आणि पाण्याखालील बहुरंगी कोरल्स. कोरल्स म्हणजे फक्त शंख-शिंपले नाहीत; तर विविध रंगांची, विविध आकारांची सागरी प्राण्यांची कडक आणि कठीण झालेली घरे म्हणता येतील. तिथे प्रवाळ कीटकांची लाइमस्टोन असलेली घरेसुद्धा आहेत.

किनाऱ्यापासून सुमारे २००-३०० मीटर आत समुद्रात आमची डुंगी (छोटी बोट) नांगरली. मग नावाड्यांनी आम्हाला एकेकाला 'स्नॉरकेलिंग' म्हणजे काय, कसे करायचे आणि पाण्याच्या खाली कोरल्स कसे पाहायचे याचे थोडे प्रात्यक्षिक आणि माहिती दिली. नाकाने श्वास न घेता फक्त तोंडाने श्वास घेता आला की आले 'स्नॉरकेलिंग'. पाण्याखालचे रंगीबेरंगी कोरल्स आणि त्याहीपेक्षा विविध रंगीबेरंगी आकारांचे मासे, कोरल्सनी झालेल्या दऱ्या पाहून आश्चर्य वाटते. नावाड्यांनी विश्वास दाखवल्याने पोहता येत नसलेल्या तिघांनीही स्नॉरकेलिंग कीट आणि गळ्यात टायर टाकून स्वतःला समुद्रात झोकून दिले. लाटा नाहीत, स्वच्छ निळा-हिरवा समुद्र आणि पाण्याखाली कोरल्स पाहिल्यावर त्यांनीही पुन्हा पुन्हा स्नॉरकेलिंग केले. नावाडी हात धरून चक्कर मारून आणतो. आपण 'काळे पाणी' हा शब्दच विसरून जातो आणि फक्त समोरचे हिरवेगार जंगल, त्याची पाण्यात पडलेली हिरवी छाया, निळे स्वच्छ पाणी आणि बहुरंगी कोरल्स अनुभवायला लागतो. कोरल्सचे आकार,

रंग, विविधता मनाला आकर्षित आणि आनंदित करणारी आहे. पर्यटकांनी या कोरल्सच्या बेटांना समुद्राची भीती न बाळगता भेट द्यावी.

कोरल्स बघण्यासाठी काचेच्या तळाच्या मोटरबोटी आहेत. त्यामध्ये १५–२० जण बसू शकतात. काही बेटांवर स्नॉरकेलिंगप्रमाणेच डुंगी, छोट्या-मोठ्या बोटी, नावाडी, मार्गदर्शक यांत सुसूत्रता नाही. शिक्षित मार्गदर्शक, नावाडी, डुंगीवाले आणि निरनिराळ्या सेवांचे दर यात शिस्त आवश्यक आहे.

ही थोडीशी निळ्या रंगाची ओळख झाली. आता सुमारे ५०० बेटांची थोडक्यात माहिती देतो. क्षेत्रफळ ८२४१ स्क्वे. किलोमीटर (त्सुनामीपूर्वीचे) आहे. लोकसंख्या साडेतीन ते चार लाखांच्या आसपास. पोर्ट ब्लेअर कोलकात्यापासून १२५५ किमी. आणि चेन्नईपासून ११९० किमी. अंतरावर आहे. येथे मराठी-गुजराथी सोडून अन्य भाषा वापरात आहेत. हिंदी आणि इंग्रजी भाषेत सर्व व्यवहार होऊ शकतात. भारताचे संरक्षण खाते आणि पर्यटन ही दोन नोकऱ्यांची प्रमुख स्थाने आहेत. येथे मुख्यत: पावडर दूध मिळते.

आता अंदमान बेटांचा हिरवा रंग बघा. १२ टक्के जंगलाचे आच्छादन असलेला हा प्रदेश आहे. पांढऱ्या स्वच्छ बर्फाकरता काश्मीर किंवा युरोपला जातात. त्याप्रमाणेच हिरवीगार झाडी, दाट जंगले, अंदमानची बेटे आणि स्वच्छ समुद्र पाहायला तिथे जायलाच हवे.

सीपीघाट, मरिन नॅशनल पार्क येथील बराचसा भाग संरक्षित जंगल आहे. येथे दालचिनी, लवंग इत्यादी मसाल्याच्या पदार्थांची झाडे आहेत. तेथूनच पुढे वडुरचा स्वच्छ समुद्रकिनारा आहे. जाताना दोन्ही बाजूंस दाट जंगल आहे. त्यामुळे प्रवास जाणवतच नाही. 'त्सुनामीमुळे' झालेले नुकसान मात्र दिसून येते.

'चिडीयाटापू' या पक्षिअभयारण्यात मिनी झूदेखील आहे. या अभयारण्यात दाट झाडी, वेली, वृक्ष आहेत. एकंदर बेटावर मानवी वस्ती कमी आहे. पक्ष्यांचे आणि समुद्राच्या लाटांचे संमिश्र आवाज या अभयारण्यातच ऐकायला मिळतात. माउंट हॅरीयट हा सुमारे ११०० फूट उंच गर्द झाडीत लपलेला डोंगर आहे. तेथे ट्रेकिंगसाठी २० किमी.चा ट्रॅक आहे. या डोंगरावरील पार्क व परिसर यातील स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे.

रॉस आयलंड हे पोर्ट ब्लेअरला अगदी जवळचे बेट आहे. या बेटावर महायुद्धाचे अवशेष आहेत. हिरवागार समुद्रकिनारा आणि त्सुनामीचा बसलेला तडाखा हे येथील लक्षात येणारे घटक आहेत. अंदमान-निकोबार बेटांत १६ वन्यजीव अभयारण्ये व ६ नॅशनल पार्क्स आहेत. ऑर्चिड्स, मासे, कोरल्स, पक्षी यांच्या खूप जाती आहेत; परंतु हिंस्र पशू कोठेही नाहीत.

याशिवाय अॅन्थ्रॉपॉलाजिकल म्युझियम, नाविक दलाचे 'समुद्रिका' संग्रहालय, 'सागरिका' वस्तुदालन, चेथम लाकडाची मिल, सेल्युलर जेल, राष्ट्रीय स्मारक, नेहमीचा बाजार इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत.

भूतकाळातील काळ्या पाण्याचा, सेल्युलर जेलचा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचा इतिहास तर कायम आहेच; पण अंदमान-निकोबार बेटांचे वर्तमान आणि भविष्य फार सुंदर, बहुरंगी, हिरवे-निळे, आकर्षित करणारे आहे, हे निश्चित.

-- -- --

# १६. रशियाची दोन महत्त्वाची शहरे : सेंट पीटर्सबर्ग आणि मॉस्को

झारशाहीचे केंद्रस्थान सेंट पीटर्सबर्ग आणि स्टालिनचे शक्तिशाली मॉस्को ही माझ्या पर्यटनाची दोन मोठी आकर्षणे होती. झारशाहीचे क्रौर्य, श्रीमंती; स्टालिनचे छुपे क्रौर्य आणि एकाधिकार यांबद्दल खूप वाचले होते. चित्रपटातही पाहिलेले होते. जुलै, २००७च्या पहिल्या आठवड्यात ही शहरं प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला. पहिल्याची राजेशाही श्रीमंती आणि दुसऱ्याची एका तणावाखाली झालेली वाढ आणि भयग्रस्तता अनुभवली.

फिनलंडच्या हेलसिंकीतून बसनेच सकाळी ९.३० वाजता निघालो आणि रशियात प्रवेश केला. येताना सीलबंद जेवण आणि पाण्याच्या बाटल्या घेऊन निघालो होतो. फिनिश सीमा संपली आणि रशियाची सीमा सुरू झाली. पासपोर्ट इमिग्रेशन, बस तपासणी झाली. स्कँडेनेवियन देशात कोठेही हा वेळ गेला नाही. वाटेतच थांबून जेवण घेतले. घनदाट जंगल, प्रचंड रुंद रस्ते आणि मार्गदर्शन करणारे मोठे फलक दिसायला लागले. रस्त्यावरील स्वच्छता मात्र कमी झालेली लक्षात आली. वाटेत रस्त्यावर एक प्रचंड युद्धस्मारक होते. जर्मनीने दुसऱ्या महायुद्धात त्या ठिकाणापर्यंत रशियात प्रवेश केला होता. रशियाच्या बाजूने विचार केला तर येथून जर्मनीला परत जावे लागले होते. त्या ठिकाणी विशेष थांबता आले नाही. फक्त फोटो घेता आले. सेंट पीटर्सबर्गमधील हॉटेल प्रीबाल्तीस्कायामध्ये खोली क्रमांक १२०६५ मिळाली. हॉटेल प्रचंड होते. १२००च्या आसपास खोल्या असाव्यात. मात्र खोल्या छान होत्या.

सकाळी ब्रेकफास्ट झाल्यावर सिटीटूर सुरू झाली. सेंट पीटर्सबर्ग हे उत्तरेतील व्हेनिस समजले जाते. नेवा नदीच्या काठावरील राजवाडे, कालवा, दुतर्फा झाडे असलेले रस्ते, प्रमाणबद्ध इमारती हे सर्व दृश्य मोहक आणि रमणीय वाटते. नदी म्हणजे समुद्रच आत आणला आहे. एवढे पात्र आहे. वस्ती ४२ लाख आहे आणि क्षेत्रफळ ६०० स्क्वे. किमी. आहे. सेन्ट पीटर्सबर्ग चर्च फारच सुरेख आहे. मॉस्कोतील लाल चौकात असलेल्या सेन्ट

बासिलच्या धर्तीवर हे चर्च बांधण्यात आले आहे. बांधकामाला ७००० स्क्वे. मीटर्स मोझेइक टाइल्स वापरल्या आहेत आणि त्याचे बांधकाम २४ वर्षे चालू होते. हे चर्च झार अलेक्झांडर दुसरा ह्याच्या स्मरणार्थ बांधले आहे. १ मार्च १८८१ रोजी अतिरेक्यांनी त्याला बॉम्ब फेकून मारले होते.

हर्मिटेज हे रशियन म्युझियम आवर्जून पाहावे असे आहे. सुमारे २०० वर्षांत जमवलेल्या काही कोटी प्रदर्शनीय वस्तूंचे हे संग्रहालय आहे. येथे अगदी अश्मयुगापासून २० व्या शतकापर्यंतच्या वस्तू आहेत. या संग्रहालयाद्वारे आपल्याला रशियन कला आणि संस्कृती यांचे दर्शन होते. मिखीलाव पॅलेस, बाजूची बाग आणि म्युझियमची इमारत रात्रीच्या उजेडात आणि रंगीत प्रकाशात खुलून दिसतात. आपल्याकडील बागांत आणि युरोप-रशियातील बागांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. क्षेत्रफळ, (झाडांची) विविधता, सुसंगती, विद्युत् रोषणाई, रचना, पर्यटकांसाठी करण्यात आलेल्या सोयी, कसोशीने पाळलेली स्वच्छता अशा सर्वच गोष्टींत तुलना होऊ शकत नाही. झार अलेक्झांडर पहिला आणि निकोलस पहिला यांचा भाऊ मिखीलाव याला इ.स. १८१९-२५ या काळात झारची गादी न मिळाल्याबद्दल या गोष्टी देण्यात आल्या होत्या. या सर्व गोष्टी म्हणजे सुंदर, रेखीव आणि अमाप श्रीमंतीचे प्रदर्शन करणाऱ्या कलाकृती आहेत.

कॅथेरीन पॅलेस हा रोकोको पद्धतीचा ३२५ मीटर लांब आणि आजूबाजूला मोठी बाग असलेला राजवाडा सुमारे चार वर्षांत बांधून जुलै १७५६ मध्ये तयार झाला. वास्तविक १०० किलो सोने आणि साठ लाख मिलियन रूबल्स खर्च करून केलेले हे श्रीमंतीचे फाजील प्रदर्शन आहे, तयार झालेली वास्तू मात्र फारच सुंदर, प्रेक्षणीय, सुबक, डोळ्याला समाधान देणारी आहे. युरोपमधील इमारती, पुतळे, संगमरवरी बांधकाम, भिंतीवरील चित्रे, म्युरल्स, फ्रेस्कोस अशा सगळ्या कलाकृती फिक्या पडतील, असा हा राजवाडा आहे. सोन्याने मढवलेले पुतळे, प्रवेशद्वार, बॉलरूम, (चापेल) पोर्ट्रेट हॉल, डायनिंग रूम, अम्बर रूम, झुंबरे, आरसे, दरवाजावरील देखणी कलाकृती, इमारतींवरील सोन्याने मढवलेले घुमट अशा एकाहून एक प्रेक्षणीय वास्तू-वस्तू येथे एकत्र पाहायला मिळतात. पायपीट खूप होते, पण ती कारणी लागते. आपण लाल किल्ला, जयपूर राजवाडा, म्हैसूर राजवाडा, रोम इत्यादी

पाहून आणि त्यावर विचार करून अचंबित होतो. कॅथेरीन राजवाडा अनुभवल्यावर आपले शब्दच संपतील.

कॅथेरीनने बागेतले पुतळे सोन्याने मढवायचे ठरवले होते, पण खर्च जास्त व्हायला लागल्यामुळे तिने ते सोन्याने मढवले नाहीत. जुने राजवाडे आवडत नसल्याने झार राजांच्या काळात नवीन राजवाडे बांधण्यात आले. जुन्याचे नूतनीकरण झाले. पण हे सर्व नूतनीकरण एकमेकांशी सुसंगत आहे.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने कॅथरीन पॅलेसचे खूप नुकसान केले. बंदुकीमधून गोळ्या सोडण्याच्या सरावासाठी वापरल्याने राजवाड्याचे खूप नुकसान झाले. इ.स. २००३ पर्यंत राजवाड्यांची दुरुस्ती आणि नूतनीकरण चालू होते. आता हा राजवाडा पांढरा हत्ती झाला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तो भाड्याने दिला जातो आणि थोडाफार खर्च भरून काढला जातो. हा राजवाडा सेंट पीटर्सबर्गपासून २५ किमी. दूर आहे.

रात्री ९.३० वाजता नोव्गार्द शहरात हॉटेल बेरीस्त पॅलेसमध्ये आलो. हे शहर मॉस्कोपासून ५०० किमी. दूर आहे. तिथून मॉस्कोला जायला रेल्वेने ९ तास लागण्याची शक्यता होती. रेल्वेच्या फलाटांवर भिंतीवर म्युरल्स, पोलादावरची कोरीव कामे आणि अन्य सुशोभित करणाऱ्या बाबी होत्या. जमिनीखाली दोन-तीनमजले खोल रेल्वे लाइन्स होत्या. लिफ्ट्स, (वोक्केज) होते. १०० वर्षांहून जास्त जुन्या सुविधा होत्या, पण वीजपुरवठ्यावर विश्वास होता. त्या वेळी एक खास बाब निदर्शनास आली. ती म्हणजे राजवाडे, रेल्वे स्टेशन्स, रस्ते यांवरील सुशोभीकरण फक्त झारशाहीत होऊ शकले. मजुरांकडून, कैद्यांकडून जुलमाने, कमी पैशात, जबरदस्तीने, सैबेरियाच्या यातना टाळण्यासाठी आणि हुकूमशाहीत ही चैन होऊ शकली. मॉस्कोतील इमारती, रस्ते, चर्च, क्रेमलिनमधील वास्तू आणि लाल चौक हे सर्व पाहून या विचारांबद्दल खातरी झाली. पोलादी पडदा पाहायला मिळत नाही, पण त्याचे दृश्य परिणाम पाहता येतात.

मी प्राचार्य असताना माझ्या मुलुंड कॉलेजमधील काही विद्यार्थी इ.स. १९८८-८९ मध्ये मॉस्कोतील विद्यापीठात शिक्षण घेत होते, वसतिगृहात राहत होते; पण त्यांना सुट्टीत वसतिगृहात जेवणखाण मिळत नसे. साधा ब्रेडही मिळत नसे. झारशाही, लेनिनवाद, स्टालिनशाही, ख्रुश्चेव्ह अशा कारकिर्दी बदलत जाऊन संपूर्ण रशियाच फुटला होता.

मॉस्कोत मोठे स्वच्छ रस्ते, श्रीमंत गाड्या, उंच इमारती, अखंड दगडाची स्मारके, शेजारीच जुने चर्च, जुने धार्मिक मठ असे चित्र एकीकडे पाहायला मिळते, तसेच दुसरीकडे रस्त्यावर भिकारीदेखील दिसतात. मॉस्कोत जवळजवळ ८५ लाख लोकवस्ती आहे. पूर्वेला वोल्गा नदी आहे. ही नदी एक मोठा जलमार्ग आहे.

क्रेमलिन हे राजकारण्यांचे प्रमुख केंद्र आहे. क्रेमलिन याच नावाने बऱ्याच इमारती आहेत. आज क्रेमलिन म्हटल्यावर फक्त मॉस्को क्रेमलिन समजले जाते. वास्तविक, सबंध क्रेमलिन किल्ल्याप्रमाणे आहे. इ.स.पूर्व २०० पर्यंत इतिहास सापडतो. ६७ एकर परिसरात पसरलेल्या क्रेमलिनमध्ये सर्वांत उंच इमारत ७४ मी. आहे. इ.स. १४८५ ते इ.स. १४९५ या काळात ती बांधली गेली आहे. मध्यंतरी १३२८ रोजी चर्च, १३३० रोजी मोनॅस्टरी, १३३३ रोजी कॅथीड्रल अशी वाढ झाली. क्रेमलिनच्या त्रिकोणी जागेत १४८५ ते १४९५ मध्ये प्रचंड भिंती बांधल्या गेल्या. इ.स. १५०५ ते इ.स १५०८ मध्ये बेल टॉवर बांधला गेला. इ.स. १६१० ते इ.स १६१२ या काळात क्रेमलिन पोलंडच्या ताब्यात होते. पुन्हा रशियाच्या ताब्यात आल्यावर (टॉवर्स), गेट्स, करमणूक पार्क, ११ घुमटांचे कॅथीड्रल बांधले गेले. १६८२ च्या धुमश्चक्रीनंतर सेंट पीटर्सबर्ग ही नवीन राजधानी करण्यात आली आणि क्रेमलिन पूर्ण सोडून देण्यात आले.

वारंवार होणाऱ्या लढायांत चर्च आणि मोनॅस्टरी पाडली गेली. इ.स. १८१२ मध्ये नेपोलियनने क्रेमलिन पूर्ण पाडून टाकण्याची आज्ञा केली गेली. त्यानुसार काही भाग खरोखरच पाडण्यात आले, परंतु १८१६ ते १८१९ या कालावधीत या भागाची पुनर्बांधणी आणि नूतनीकरण केले गेले. १९१८ मध्ये लेनिन, स्टालिन शासन सुरू झाले. इ.स. १९३३ मध्ये स्टालिनने कॅथीड्रल पाडले. त्यानंतर इ.स. १९५५ पर्यंत पर्यटकांसाठी क्रेमलिन बंद होते. मग २००३ पर्यंत क्रेमलिनची दुरुस्ती आणि नूतनीकरण चालू होते. त्यानंतर ते पर्यटकांसाठी खुले करण्यात आले.

क्रेमलिन हे एके काळी शासन आणि चर्च यांचे केंद्रस्थान होते. आज नवीन बेल टॉवरच्या खालीच जुनी तुटलेली घंटा पडलेली आहे. प्रचंड भिंत, खास बंदूकधारी सैनिक आणि शिस्त यांमुळे येथे एक भीतीदायक घुसमटलेले वातावरण जाणवते. कमालीच्या स्वच्छतेने आणि शांततेने त्याला आणखी

धार येते. मात्र इमारतीचा रंग अजूनही उत्तम ठेवलेला आहे. तसेच फोटो काढायला परवानगी आहे.

लाल चौक आणि तेथे होणारी मे डे परेड हे मोठे आकर्षण आहे. लेनिनची कबर आणि प्रचंड भिंतींच्या पार्श्वभूमीवर दगडी चेहऱ्याचे जोसेफ स्टालिन, निकिता ख्रुश्चेव्ह इत्यादी पुढारी परेडची मानवंदना घेतानाचे आणि मग सैनिकांच्या संचलनाचे फोटो बघितले होते. त्यामुळे आकर्षणापेक्षा औत्सुक्य होते. आता फक्त डोळ्यापुढे आणणे शक्य आहे. सेंट बसील कॅथीड्रल, विस्तीर्ण लाल पसरलेला लाल चौक, डिपार्टमेंट स्टोअर, लेनिनची कबर यांमुळे ते स्थळ प्रेक्षणीय आहे. पर्यटकांना (पादचाऱ्यांना) रस्त्याचे नियम कसोशीने पाळावे लागतात. आमच्या गटामधील एक जण रस्त्यावरील वाहतुकीचे नियम न पाळता पलीकडे जाण्याच्या प्रयत्नात होता. त्याला आमच्या महिला मार्गदर्शकाने तंबी देऊन सांगितले की, तो नियम न पाळता पलीकडे गेला असता, तर तिला सैबेरियात छळछावणीत जावे लागले असते.

सेंट पीटर्सबर्ग, क्रेमलिन आणि लाल चौक सोडताना झारशाही, कम्युनिस्ट राजवट आणि आत्ताचे वातावरण यांबद्दल मिश्र भावना होत्या.

-- -- --

# १७. रोहिडेश्वर, शनिवारवाडा ते पर्ल हार्बर

लहानपणी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याबरोबर (त्या वेळी ते शिवशाहीर नव्हते, पण प्रचंड अभ्यासक होते.) रोहिडेश्वर बघितला होता. त्यानंतर शनिवारवाडा पाहिला होता. बाबासाहेबांबरोबर ऐतिहासिक वास्तू पाहणे म्हणजे मोठा आनंददायी सणच असायचा. प्रत्येक पावलागणिक, प्रत्येक दगडागणिक बाबासाहेब इतिहास जिवंत करतात, हा माझा अनुभव होता. इतिहास योग्य लिहिला गेला नाही, वास्तू जपल्या गेल्या नाहीत, याची खंत ते व्यक्त करत.

दुसऱ्या महायुद्धात पर्ल हार्बरवर जपानने केलेला हल्ला आणि त्यावर लिहिली गेलेली पुस्तके, कादंबरी आणि सिनेमा यांमुळे खूप माहिती मिळाली होती. तरीही पर्ल हार्बरवरचा हल्ला जपानने काही हजार मैलांवरून कसा केला असेल; अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेला, नौसैनिकांना, विमान दलाला न कळता डावपेच कसे आखले असतील आणि बंदराचा, बोटींचा विध्वंस कसा झाला असेल, हे प्रत्यक्ष पाहण्याची सुप्त इच्छा मनात होती. पर्ल हार्बरवरील स्मृती भवन, प्रदर्शन आणि लघुपट पाहिल्यावर श्री. बाबासाहेब पुरंदरेंना खंत वाटण्याची कारणे कळतात.

तारीख ३०-३१ मे आणि १-२ जून २००७ रोजी हवाई बेटांची राजधानी होनोलुलू येथे समाजशास्त्र विषयाची आंतरराष्ट्रीय परिषद होती. अर्थशास्त्रातील Demand Curve आणि Indifference Curves वर मी पाठवलेले Abstract (सारांश) आणि शोधनिबंध मान्य झालेले होते व मला परिषदेचे आमंत्रण होते.

हवाईच्या होनोलुलू या मोठ्या बेटावरील मुख्य व्यवसाय संरक्षण खात्यातील नोकरी आहे आणि दुसरा पर्यटन आहे. स्वच्छ समुद्रकिनारा आणि चांगली हॉटेल्स यांमुळे येथे रोज हजारो पर्यटक येतात.

हॉटेलपासूनच सुरू होणारी पहिली सफर म्हणजे संपूर्ण होनोलुलू बेटाला एक प्रदक्षिणा झाली. स्वच्छ वातानुकूलित प्रवासी बस, शिक्षित मार्गदर्शक

यांमुळे सफरी चांगल्या होतात. होनोलुलू बेटावर सध्या जिवंत ज्वालामुखी नाहीत, पण पूर्वी होते. त्या टेकड्या पाहता येतात. त्या ज्वालामुखीतून, जमिनीखालून येणारा गरम लाव्हारस समुद्राच्या पाण्यात कुठेतरी मिसळतो. अशा ठिकाणी तापमान अचानक वाढल्याने वर समुद्रात मासेमारी करत असलेले मच्छीमार गायब होतात. बोटींनी हेलिकॉप्टरमधून त्यांचा शोध घेतला जातो. माझ्या सफरीच्या दिवशी दोन मच्छीमारांचा शोध चालू होता. प्रदक्षिणेचा रस्ता रुंद, स्वच्छ आणि चांगला होता. वाटेत स्वच्छतागृहे, पाणी वगैरेंची सोय होती. आपल्याकडे सध्या सहापदरी, चौपदरी रस्ते होत आहेत, पण स्वच्छतागृहे दिसत नाहीत.

त्यानंतर पर्ल हार्बरला भेट दिली. देशाचा विजय असो, पराभव असो अथवा नैसर्गिक गोष्टी असोत; अमेरिका त्याचे पर्यटन आकर्षण निर्माण करते. सर्व सुविधा असतात. यामुळे इतिहास, वास्तू, नैसर्गिक स्थळे पर्यटन व्यवसायातून आपोआप जपली जातातच.

पर्ल हार्बर आणि स्मृती भवन यांचा एकूण ७५ मिनिटांचा कार्यक्रम विनाशुल्क असतो. त्यात २३ मिनिटांचा माहितीपट दाखवतात. बोटीतून प्रत्यक्ष महायुद्धात बुडालेल्या बोटींना भेट, स्मृती भवन, छायाचित्र प्रदर्शन हे त्यात प्रामुख्याने असते. प्रदर्शन आणि दूरचित्रवाणीवर सतत दाखविला जाणारा चित्रपट हे पाहिल्यानंतर तुम्हांला पाहिजे तेवढा वेळ मिळतो.

होनोलुलू शहरापासून पर्ल हार्बर आणि ॲरिझोना मेमोरियल २५ मिनिटांच्या अंतरावर आहे. 'प्रथम आगमन प्रथम प्रवेश' या तत्त्वावर एक प्रवेशपत्रिका दिली जाते. सुमारे ४५ मिनिटे ते एक तासानंतर तुमच्या पत्रिकेवरील क्रमांक जाहीर होतो. मग तुम्हांला रांगेने एका सिनेमागृहात प्रवेश मिळतो. एका वेळी अंदाजे २००–२५० व्यक्तींना प्रवेश देतात. या सिनेमागृहात पर्ल हार्बर हल्ल्यावरील २३ मिनिटांचा माहितीपट दाखवतात. हल्ल्याचे प्रत्यक्ष चित्रीकरण, हल्ल्याबद्दल मिळालेल्या तीन पूर्वसूचना आणि त्या पूर्वसूचनांकडे दुर्लक्ष केलेल्या अधिकाऱ्यांची माहिती– फोटो वगैरे दाखवतात. जपानी विमानांचे हल्ले, त्यामुळे झालेले नुकसान, बुडालेल्या छोट्या–मोठ्या बोटी, लागलेल्या आगी, झालेला गोंधळ यांचे प्रत्यक्ष चित्रीकरण दाखवतात. तरीही काही चित्रीकरणे तयार केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या

चित्रीकरणाद्वारे अमेरिकेचा सर्व पराभव प्रत्यक्ष पाहायला मिळतो. जणू इतिहासच जागृत होतो.

७ डिसेंबर १९४१ला जपानी विमानांनी विमानवाहू जहाजे आणि अन्य तऱ्हेच्या बोटींसह पर्ल हार्बरवर प्रचंड हल्ला केला. यात अमेरिकेचे किती नुकसान झाले? १८८ विमाने नष्ट झाली. ६ मोठ्या युद्धनौका व माइनस्वीपर, ३ डिस्ट्रॉयर्स, २ छोट्या बोटी बुडल्या. ४ युद्धनौका, ३ क्रुझर्स निकामी झाल्या. २३३३ सैनिक आणि ५५ अन्य नागरिक मारले गेले. ॲरिझोना, उत्ताह, व्हर्जिनिया, मेरीलँडसारख्या युद्धनौका बुडाल्या. जपानचे नुकसान २९ विमाने, ४ मिडगेट सबमरीन्स, ६५ वैमानिक/सैनिक एवढे आहे. ७ डिसेंबरला सकाळी केलेल्या दोनच हल्ल्यांत एवढे प्रचंड नुकसान करून जपानी विमाने आणि जहाजे परत गेली. तिसरा हल्ला झाला असता, तर तो युद्धनीतीच्या दृष्टीने जास्त हानिकारक ठरला असता, पण पेट्रोल आणि परत जाण्याचे प्रचंड अंतर यांमुळे रहित करण्यात आला. यातील बऱ्याच गोष्टी माहितीपटात प्रत्यक्ष दिसतात.

हा माहितीपट पाहून झाल्यावर अमेरिकी नौदलाच्या बोटीतून सर्वांना ॲरिझोना मेमोरिअलला नेण्यात येते. ॲरिझोना ही बुडालेली बोट समुद्रात ठेवण्यात आली आहे. धुराड्याचा दोन फुटांचा भाग समुद्राच्या पृष्ठभागावर आहे. बाकी बोट पाण्यात तशीच दिसते. या अपघातात कामी आलेल्या सैनिकांची नावे असलेली संगमरवरी भिंत स्मृतिभवनात आहे. हे सर्व पाहण्यासाठी, फोटो काढण्यासाठी वेळ मिळतो. ॲरिझोना या बोटीशिवाय अन्य बुडालेल्या बोटींच्या जागा दाखवण्यासाठी पाण्याच्या वर दिसतील असे चबुतरे बांधलेले आहेत. प्रदर्शन उत्तम आहे. मी गेलो त्या वेळी प्रत्यक्ष युद्धात भाग घेतलेला सुमारे ८०-८५ वर्षांचा अधिकारी युद्धाची माहिती देत होता.

समुद्रकिनारी उभे राहून समोर ॲरिझोना स्मृती भवन, बुडालेले ॲरिझोना जहाज, अन्य जहाजांच्या स्मृती असे पाहताना जपानने काही हजार किलोमीटर्सवरून केलेल्या हल्ल्याचे चित्र आपण डोळ्यांपुढे आणू शकतो आणि विस्मय, अचंबा व आश्चर्य वाटते. हल्ल्याचे कौतुक करावे की मेलेल्या सैनिकांविषयी सहानुभूती व्यक्त करावी अशी द्विधा मनःस्थिती होते.

-- -- --

# १८. इजिप्त, ग्रीस आणि तुर्कस्तान

इजिप्त आणि ग्रीस हे जुन्या संस्कृतीचे आणि प्रगत शास्त्राचे देश पाहण्याची इच्छा होती. त्याला जोडून तुर्कस्तानपण करायचे ठरविले. बरोबर तीन मित्रही तयार झाले. त्यामुळे ताबडतोब तीन देशांना भेट देण्याचे निश्चित केले. २८ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २००५ असा प्रवास होता.

इस्तंबूलच्या अतातुर्क विमानतळावर तेथील ५.४५ वाजता उतरलो. हवा छान होती. लगेच बस करून हॉटेल रॉयलमध्ये गेलो. हॉटेल भर गावात होते. एअर पोर्ट ते हॉटेल खूप अंतर होते, पण रस्ता चांगला होता. आम्ही गेलो त्या वेळी तुर्कस्तानचा युरोपियन युनियनमध्ये जाण्याचा प्रयत्न चालू होता. लगेचच त्याकरता आंतरराष्ट्रीय सभा आयोजित केलेली होती. युरोपियन युनियनने मान्यता दिली नसल्याचे पाच दिवसांनी कळले.

राजधानी इस्तंबूलचा इतिहास फार वैविध्यपूर्ण आहे. इ.स. ३३०-३९५ रोमन, ३९५-१२०४ बिझातैन, १२०४-१२६१ लॅटिन, १२६१-१४५३ बिझातैन, १४५३-१९२२ ओट्टोमन, १९२३ इस्लामिक आणि प्रजासत्ताक अशा वेगवेगळ्या राजवटी येथे होऊन गेल्या. इस्तंबूलचे सुरुवातीचे कॉन्स्तान्तिनोपल हे नाव रोमन सेनापतीच्या नावाने पडले. इ.स. १९२३ मध्ये मुस्तफा केमल अतातुर्क याने हे नाव प्रजासत्ताक आणि इस्लामिक केले. अतातुर्कच्या नावाने विमानतळ, तसेच स्पोर्ट्स स्टेडियमदेखील आहे. यांपैकी ओट्टोमनच्या काळातील जनसंहार फार मोठा होता.

इस्तंबूलच्या ४-५ (पर्यटक) स्थळांना महत्त्व आहे. निळी मस्जिद, ग्रांट बझार, टोपकापी राजवाडा, सोफिया. मारामारा समुद्र आणि काळा समुद्र यांना जोडणारी बॉस्फरसची सामुद्रधुनी फार महत्त्वाची आहे. हा युरोप आणि मध्य पूर्व यांना जोडणारा समुद्र आहे. येथे मोठा पूल आहे. पुलाच्या पलीकडे युरोप आणि अलीकडे आशिया. इस्तंबूलमध्ये १/३ लोक आशियात आणि २/३ लोक युरोपमध्ये राहतात. या पुलाखाली बरेच लोक काठावर बसून गळ टाकून मासेमारी करताना दिसतात. निळा

समुद्र, प्रचंड पूल, मासेमारी करणारे लोक असे दृश्य चित्रकारांना आवडण्यासारखे आहे.

निळी मस्जिद (ब्लू मॉस्क) हे एक प्रमुख ठिकाण आहे. इ.स. ५३२ ते ५३७ या पाच वर्षांत ती बांधली आहे. मुळात ते 'हगीया सोफिया' नावाने बसिलिका किंवा कॅथीड्रल म्हणून बांधले गेले. नंतर त्याचीच मस्जिद करण्यात आली. ७२.५ मीटर बाय ६९.५ मीटर आणि उंची ३१ मीटर अशी ती मोठी वास्तू आहे. आता तेथे म्युझियमही आहे. आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या मुख्य घुमटाला अनुसरून वेळोवेळी चार कोपऱ्यांत चार मिनार बांधले. आतील सभागृह फारच स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवले आहे. जाताना पादत्राणे न काढता प्लॅस्टिकच्या दोन पिशव्या पायावर घालून आत जाता येते. नऊ दरवाजे, मोठे प्रवेशद्वार, ४० मोठ्या खिडक्या आणि उंची ३१ मीटर यावरून भव्यतेची कल्पना येईल. हिचा घुमट स्थापत्यकलेचा एक खास नमुना आहे. हा परिसर मात्र इमारतींनी आणि माणसांनी भरलेला आहे.

ग्रांट बझार हा निरनिराळ्या वस्तू मिळण्याचे आणि घासाघीस करून खरेदी करण्याचे ठिकाण आहे. येथे कपडे, सुका मेवा, कापड, क्रोकरी, इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादी सर्व मिळते. ३००० दुकाने आहेत. रोज २.५ लाख ते ४ लाख ग्राहक येत असतात. ६१ रस्ते, १८ गेट्स, परिसर ३०.७ हेक्टर एकर आहे आणि हे सर्व एका छपराखाली आहे. येथे नीट खुणा, दुकाने, रस्ते लक्षात ठेवले नाहीत, तर चुकण्याची दाट शक्यता आहे. या वास्तूचे पहिले बांधकाम इ.स. १४५५ पासून १४६१ पर्यंत चालले. त्यानंतर आगी, भूकंप यांनी खूप वेळा पडझड झाली. १८९४ मध्ये मोठा भूकंप झाला आणि खूप हानी झाली. अशा संकटांमुळे या वास्तूची पुनर्बांधणीची आणि नूतनीकरणाची प्रक्रिया सतत चालूच असते.

टोपकापी राजवाडा म्हणजे बादशहाला लागणाऱ्या सर्व सुविधा एका छताखाली पुरवणारी वास्तू! या राजवाड्याचे बांधकाम इ.स. १४५९मध्ये सुरू होऊन १४६०च्या सुमारास संपले. हा राजवाडा मारामारा समुद्राच्या जवळ आहे. सुलतान (महंमद दुसरा) याने या राजवाड्याचे बांधकाम सुरू केले. राजवाडा बांधताना सर्वोत्तम साहित्याचा वापर करण्यावर त्याचा भर होता. रचनाकार, स्थापत्यकार, कारागीर, सामग्री इत्यादी गोष्टी सर्वोत्तम असायलाच हव्यात, असा त्याचा कटाक्ष होता. या राजवाड्याचा पहिली

४०० वर्षे केवळ राहण्यासाठी उपयोग केला गेला. ४००० लोक राहत होते. मात्र १५०९चा भूकंप आणि १६६५ची आग यांमुळे पुनर्बांधणी आणि नूतनीकरण चालू राहिले. ४ कोर्ट यार्ड्स, १०० खोल्या, दरबार, दिवान, दफ्तर, शिवाय मोठेमोठे हॉल्स असे पसरलेले हे आवार प्रथम ६ लाख आणि नंतर ७ लाख स्क्वेअर मीटर्स आहे. आता हा राजवाडा म्हणजे संग्रहालय आहे. उपलब्ध वेळात नीट पाहिले, तरी समाधान होत नाही. कपडे, क्रोकरी, युद्धसाहित्य, तलवारी, ढाली, चिलखते, म्युरल्स, हस्तलिखिते, जडजवाहीर, स्वयंपाकघरातील भांडी अशा अनेक वस्तूंचा येथे संग्रह आहे. बादशहांचे कपडे आणि तलवारी आणि त्यांचे आकारमान बघितले आणि अंदाज केला, तरी माणूस एवढा मोठा असू शकेल काय, असा प्रश्न पडतो. राजवाडा उत्तम आहे आणि पाहण्यासारखा आहेच.

**ग्रीस**

पुन्हा एकदा अतातुर्क विमानतळ बघितला आणि अथेन्ससाठी प्रयाण केले. विमानतळ ते हॉटेल 'इस्पेरीया पॅलेस' रस्ता उत्तम होता. वाहतूकही व्यवस्थित होती. सांस्कृतिक, औद्योगिक, राजकीय, आर्थिक ह्या दृष्टींनी अथेन्स हे मोठे शहर आहे. सॉक्रेटीस (इ.स.पू. ४६९–३९९), ॲरिस्टॉटल (इ.स.पूर्व ३८४ ते ३२२), प्लेटो (इ.स.पूर्व ४२८–३४८) अशा महान तत्त्वज्ञानी संशोधकांचा हा देश. इ.स.पू. ३४००पर्यंत पुराव्यासह इतिहास आहे. येथे पार्थनॉन विद्यापीठ, पापागॉन, पर्निथा ॲक्रोपोलीस इत्यादी महत्त्वाची ठिकाणे आहेत. ४–५ हजार प्रेक्षक अथवा श्रोते बसतील अशी खुली नाट्यगृहे किंवा प्रेक्षागृहे आजही सहज वापरता येतील अशा स्थितीत आहेत. प्रख्यात राजकीय नेते, संशोधक, कलाकार यांचे पुतळे आहेत. जगाला प्रजासत्ताक ही पायाभूत कल्पना ग्रीसने दिलेली आहे. हे सर्व इ.स.पूर्व तीन हजार वर्षांपूर्वीचे आहे, याची नोंद करून घ्यायला हवी. याबरोबरच ग्रीसला समुद्रकिनारा आहे आणि समोरील काही बेटे त्यांचीच आहेत. तसेच ऑलिम्पिक स्पर्धांचे मूळही ग्रीसमध्येच आहे.

येथील पार्थेनॉन हे मंदिर इ.स.पूर्व ४४७–४३८ या काळात बांधलेले आहे. ६९.५ मीटर बाय ३०.९ मीटर अशा या प्रचंड मंदिराची उंची १३.५ मीटर आहे. हे मंदिर एका टेकडीवर बांधलेले आहे. इ.स.५व्या शतकात ते ख्रिश्चन चर्च, व्हर्जिन मेरीच्या नावे करण्यात आले. हिपास्टुसचे मंदिर, ऑलिम्पियन

झेउस्चे मंदिर, एरेचथेममधील कॅरीटीडस पोर्च हे सर्व पाहण्यासारखे आहे. येथे दर दिवशी हजारो लोकांची गर्दी असते. पोर्चमधील सहा उभ्या मूर्ती आजही त्यांच्या मूळ रूपात सुरेख दिसतात. ॲक्रोपोलीस म्युझियम, लोकसभा, मोनॅस्ट्री चौक, झॅपिओन यांनाही भेट देणे आवश्यक आहे. येथे मेट्रो, ट्राम, बस, रेल्वे अशी वाहतूक उपलब्ध आहे. मेट्रो पूर्ण भूमिगत आहे. ऑलिम्पिक स्टेडियम, इतर खेळांची मैदाने चांगल्या स्थितीत आहेत.

प्लाका या बाजाराला जरूर भेट द्यावी. छोटी छोटी दुकाने आणि रस्त्यावर मांडलेला माल बघायला आणि क्वचित खरेदी करायला उत्तम आहे. पुराणवास्तू आणि प्राचीन स्थळे या विषयात रस असणाऱ्यांनी ग्रीसला जरूर भेट द्यावी. तुर्कस्तानपेक्षा ग्रीसमध्ये पर्यटकांना आकर्षित करणारी जास्त ठिकाणे आहेत, पण प्रत्येकाचे वर्णन करणे जरा कंटाळवाणे होऊ शकेल. एकूण ग्रीस देश मला आवडला.

एजियन समुद्रात एक दिवसाच्या भेटीला गेलो. सारख्या बोटी जात-येत असतात. दिवसभर थांबून खेडेगाव पाहायला मिळते आणि थोडीफार खरेदीही करता येते. स्वच्छ समुद्र, बोटी, निळे पाणी आणि सुरेख हवा अशा सुखद आठवणीत ग्रीसला निरोप दिला.

अथेन्सहून निघून आमची फ्लाइट दुपारी ३.३०ला कैरोला पोचली. काहीही अडचण आली नाही. विमानतळ शहरापासून दूर आहे. याचा फायदा म्हणजे शहरात जाताना आणि परत येताना शहराची ओळख झाली. थेट झोसेर हॉटेलमध्ये गेलो.

इ.स.पूर्व ९६९ मध्ये कैरो वसवले गेले. सुरुवातीच्या नावात बदल होत गेले आणि अखेरीस कैरो हे नाव स्थिरावले आहे. सुएझ कालवा, अलेक्झांड्रिया, मेम्फिस, गिझा, फुस्ताद, ग्रेट स्फिंक्स, इतर पिरॅमिड्स, म्युझिअम अशी बरीच पर्यटन स्थळे आहेत. इ.स.पूर्व ३००० वर्षांपूर्वीचे प्रत्यक्ष पुरावे येथे पाहायला मिळतात. भारतीय संस्कृती फार पुरातन म्हणतात, पण तुर्कस्तान, ग्रीस, इजिप्त अशा अन्य देशांत जसे त्यांच्या संस्कृतीचे दृश्य पुरावे पाहायला मिळतात तसे दृश्य पुरावे भारतात उपलब्ध नाहीत. एकदा 'वेदकाळात' असा संदर्भ दिला की, विचार बंद करावा लागतो, पण वेदकाळाला इ.स.पूर्व अथवा इ.स. ही मिती दिली जात नाही. या त्रुटीमुळे वेदकाळ आणि संदर्भ फोल ठरतात. ही त्रुटी या (तिन्ही) देशांत

जाणवत नाही. भारतातील, विशेषतः मराठी वाचकांसाठी हे प्रवासवर्णन असल्याने माझ्या वाचनाच्या आणि पर्यटनाच्या मर्यादेत हे मत झाले आहे.

कैरो म्युझियम दुमजली आहे. एक लाख साठ हजार वस्तू आहेत. कपडे, पुतळे, जडजवाहीर, हत्यारे, सोन्याचांदीचे दागिने, मृत राजा-राणीची रसायनांनी शाबूत ठेवलेली शरीरे (रॉयल मम्मीज), कॅलीग्राफी, रत्नजडित शवपेट्या, नाणी, लिखित पत्रे, फर्निचर अशा अनंत पाहण्यासारख्या गोष्टी आहेत. अस्सल सोन्याचे मुखवटे (तुतीनखामेनचा मुखवटा ११ किलोचा आहे), चांदीचे किंवा ब्रॉँझचे मुखवटे, फेरोस, रामसेस अशा असंख्य वस्तू आहेत. जेवढ्या प्रदर्शनात आहेत त्यापेक्षा जास्त तळघरात शिल्लक आहेत. तळघर बघता येत नाही. भेट देणारे खूपच असतात. एखादा अभ्यासक गेला, तर त्याच्यासाठी  हा मोठा खजिना आहे. पर्यटकांनी जरूर भेट द्यावी.

पिरॅमिडचा आकार, उंची, बांधण्याचे कौशल्य, वापरलेली सामग्री (दगड, चुना, ठरावीक आकाराचे आणि मिश्रणाचे मोठे ठोकळे, एवढ्या उंचीवर नेण्यासाठी वापरलेली साधने इत्यादी) बघितल्यावर आश्चर्य वाटते. दक्षिण भारतातील मंदिरावर चढवलेल्या पूर्वयोजित शिल्पाकृती हे असेच एक नवल आहे. भूमितीच्या दृष्टिकोणातूनसुद्धा पिरॅमिड हे आश्चर्यच आहे. १४६ मीटर उंची, २३० मीटर चौरस, तिरकी लांबी १८६ मीटर असे हे अवाढव्य पिरॅमिड्स आहेत. आत जायला मार्ग आहेत आणि आत राजा, राणी आणि इतर अशा खोल्या आहेत. राजा किंवा राजवंशातील व्यक्ती मृत पावल्यावर त्यांच्या वापराच्या वस्तू आतच ठेवलेल्या आहेत. एवढे पूर्वनियोजित चुनखडीचे दगड (आकार, वजन, जागा, त्याचे कोन) कसे केले, तयार करून दूर अंतरावरून कसे आणले, एवढ्या निरनिराळ्या उंचीवर कसे नेले, योग्य ठिकाणी कसे बसवले, एकमेकांत कसे गुंतवले, आतून आणि बाहेरून गिलावा कसा दिला असे असंख्य प्रश्न पडतात. एका प्राचीन संदर्भात असे दिसते की, या बांधकामासाठी ४ लाख माणसे २० वर्षे काम करत होती. मृत व्यक्तीच्या मानाप्रमाणे पिरॅमिडचा आकार मोठा किंवा लहान आहे. हे सर्व प्रत्यक्ष बघायलाच हवे.

वाळवंटात स्फिंक्स ही एक अजब कलाकृती आहे. ही कलाकृती पिरॅमिड्सजवळच आहे. मी मुद्दाम असा फोटो काढून घेतला, ज्यात मागे दोन मोठे पिरॅमिड्स आहेत आणि स्फिंक्स आहे. त्यात स्थापत्यकार, शिल्पकार,

मुळात कल्पना करणारा यांची त्या भव्यतेमागची कल्पकता जाणवते. २० × ६ मी. आणि उंची ७३.५ मीटर असे या स्फिंक्सचे माप आहे. ते चुनखडीने बनवलेले आहे. नाईल नदीच्या पश्चिम किनाऱ्याला पूर्वेकडे तोंड करून पिरॅमिड्सच्या जवळ हे स्फिंक्स आहे. सिंहाचे शरीर आणि मानवाचे डोके अशी ही कलाकृती आहे. हा चेहरा इजिप्तची राणी हेतीफिटसचा असावा, असे समजले जाते. हे स्फिंक्स इ.स.पूर्व ३००१च्या सुमारास तयार झाले. स्फिंक्सचा चेहरा निरनिराळ्या देशांत निरनिराळा आहे. भारतातही दक्षिणेत चिदंबरम्‌ला नटराजाचे मंदिर आहे. ते स्फिंक्सचे रूप आहे, असे समजले जाते. स्फिंक्सच्या चेहऱ्याला पुरुषमृग समजतात. कन्याकुमारी येथे शिवरात्रीला स्फिंक्स आणि भीम यांची शर्यत होते. स्फिंक्स आणि नरसिंहाचा अवतार ह्यांत बरेचसे साम्य आहे.

**मेम्फिस**

हे शहर लोअर इजिप्तची राजधानी होती. इ.स.पूर्व ३०००च्या सुमारास ही राजधानी आकाराला आली. व्यापार, धर्म, बाजार आणि युरोपशी देवाणघेवाण यांमुळे या ठिकाणाला महत्त्व होते. मेम्फिस कैरोपासून २० किलोमीटर दूर आहे. मात्र अलेक्झांड्रिया उदयास आल्याने मेम्फिस मागे पडले. मेम्फिसमध्ये अपरीस पॅलेस, हथोरचे मंदिर यांचे अवशेष आहेत. राम्सेसचा पुतळा आहे. राम्सेसचा प्राचीन पुतळा कैरो येथील संग्रहालयाच्या दारात बसवणार आहेत.

**फुस्ताद**

इजिप्तमधील फुस्तादच्या सत्ता आणि राजधान्या बदलत राहिल्या. इ.स. ६४१ मध्ये मुस्लीम सत्ता आल्यावर पुढील सुमारे ५०० वर्षे फुस्ताद हे राजधानीचे ठिकाण होते. शावर या मुख्य अधिकाऱ्याला जेव्हा ख्रिश्चन आक्रमक आणि सिरीयाचे आक्रमक हल्ला करणार असे जाणवले तेव्हा त्याने फुस्ताद शहर निरनिराळ्या बॉम्बस्फोटांनी जाळून टाकले. ५४ दिवस हे शहर आगीत जळत होते. हे नव्या कैरोला लागूनच आहे. आता तो केवळ कचरा डेपो आहे.

जुने आणि नवीन कैरो शहर यांत मोठा फरक आहे. जुनी वस्ती अगदी चिकटून चिकटून आहे आणि तेवढीच गरीब आहे. नवीन कैरोत प्रचंड मोठे रस्ते, वाहतूक बेटे आणि मोटारी आहेत. रस्ते ओलांडून जाणे जवळजवळ

अशक्य वाटते. वाहतूक दिवे फार कमी आहेत. आमचे हॉटेल मोठ्या रस्त्यावर होते. एक मॉल समोरच होता, पण जाणे फार अवघड होते. दोन दिवस सण होता. त्यामुळे बाहेर रेस्टॉरंट किंवा मॉल हे दुपारच्या वेळी बंद होते आणि सायंकाळी उघडत. त्यामुळे थोडीफार खरेदी करता आली.

**नाईल क्रूझ**

नाईल क्रुझ ही नदीतील चारपाच तासांची सफर फारच उत्तम आहे. सायंकाळी बोटीवर जायचे. ३०-४० जणांची पर्यटक अधिक कर्मचारी अशी छोटी बोट असते. दिव्यांनी सजवलेली असते. अशा कित्येक छोट्या बोटी पर्यटकांना घेऊन नदीतून जात असतात. दिव्यांनी सजवलेल्या बोटी अधिक नदीकिनाऱ्यावरील इमारतीतून प्रकाशणारे दिवे त्यामुळे वातावरण आल्हाददायक असते. उत्तम जेवण, नाच-गाणी, जादूचे आणि कसरतीचे प्रयोग यांमुळे चारपाच तास सहज निघून जातात.

-- -- --

# १९. मोरोक्को आणि पोर्तुगाल

दोन्ही देश नकाशावर इतक्या जवळजवळ आहेत, पण साम्य काढायचे ठरविले तर मोठा प्रश्न पडेल. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी, गोवा ही पोर्तुगीज वसाहत महाराष्ट्राच्या सीमेवर असल्याने मराठी जनतेला परिचित होती. गोवा मुक्तिसंग्रामात मराठी लोकांचा मोठा सहभाग होता. त्यामुळेही पोर्तुगाल/लिस्बन हे नवीन नव्हते. मोरोक्को मात्र मराठी माणसासाठी खरा अज्ञात देश होता.

राजकीय चित्र विचारात न घेता एका पर्यटकाच्या दृष्टीने दोन्ही देश भेट देण्यासारखे आहेत.

मुंबईहून कतार एअर लाइन्सने साडेतीन तास प्रवास करून दोहाला पोचलो. मग जवळजवळ १० तास प्रवास करून कासाब्लांका या मोरोक्कोच्या मोठ्या शहरात उतरलो. कसामी बसमा हॉटेलमध्ये उतरलो होतो. कासाब्लान्काचा स्पॅनिश अर्थ आहे व्हाइट हाउस. सध्याच्या वातावरणात व्हाइट हाउस म्हणजे रशियाची मॉस्कोतील शासकीय इमारत किंवा अमेरिकेच्या अध्यक्षांचे वॉशिंग्टनमधील राहण्याचे ठिकाण एवढेच अर्थ आहेत. कासाब्लान्काचा हा अर्थ तेथे गेल्यावर समजतो.

राजवाडा आणि राजवाड्याचा बाहेरचा परिसर अतिशय सुरेख ठेवला आहे. बाजूला वृक्ष, झाडे आणि बारीक राखलेले गवत असा राजेशाही थाट आहे.

यानंतर पाहिली राजा हसन दुसरा याची मशीद. ही मोरोक्कोमधील आणि आफ्रिकेतील सर्वांत मोठी मशीद आहे. इ.स. १९८६ ते १९९३ या काळात ती बांधली गेली. राजाने सर्वांत उत्तम साधन-सामग्री वापरून जगात नाव होईल अशी मशीद बांधण्याचे ठरविले होते. धर्म, स्थापत्यशास्त्र, अद्ययावत तंत्रज्ञान यांचा संगम करून ही मशीद बांधली आहे. पाया अर्धा जमिनीवर आणि अर्धा समुद्रावर आहे. मुख्य मिनार २१० मीटर उंच आहे. मुख्य

प्रार्थनागृहात २५ हजार आणि बाहेरील आवारात ८० हजार भाविक बसू शकतील असे आवार आहे. ४१ कारंजी आणि मोठमोठी झुंबरे आहेत. मशिदीचे ११०० टन वजनाचे छत सरकते आहे. पाच मिनिटांत संपूर्ण उघडता येते. मुख्य प्रार्थनागृहातील काचेच्या टाईल्समधून समुद्राचा तळ दिसू शकतो. स्नानगृह आणि वस्तुसंग्रहालय ही खास पाहण्याची ठिकाणे आहेत. खर्चही ५८५ मिलियन युरो झाला आहे. एवढी मोठी प्रार्थनास्थळे आणि सौंदर्यस्थळे सध्याच्या युगात होऊ शकतात, यावर विश्वास ठेवण्यासाठी प्रत्यक्ष बघणेच आवश्यक ठरते.

अर्धे बांधकाम समुद्रावर असल्याने खारे पाणी आणि समुद्राच्या लाटा यांचा पायाच्या खांबांवर परिणाम झाला आहे आणि दुरुस्ती आवश्यक झाली आहे.

एकंदर वास्तू फारच छान आणि रेखीव आहे.

कौटोबिया मशीद आणि आसपासची बाग यांचे बांधकाम इ.स. ११४७ मध्ये सुरू होऊन ते ११५७ मध्ये संपले. मग मशीद भाविकांना प्रार्थनेसाठी खुली करण्यात आली. पण थोड्याच दिवसांत ही मशीद आणि पवित्र मक्का यांच्या दिशा योग्य नाहीत असे लक्षात आले. या दुरुस्तीसाठी नवीन मशीद पवित्र मक्केशी योग्य कोन घेऊन बांधण्यात आली. इ.स. ११९० पर्यंत दोन्हीही मशिदी शेजारीशेजारी होत्या, पण कालांतराने जुन्या मशिदीचा वापर बंद झाला. मिनार मार्केट, एलफिना चौक ही ठिकाणे सहज हिंडण्यासाठी आणि काही खरेदीसाठी ठीक आहेत.

कासाब्लांकाहून मोरोक्कोची राजधानी रबातला प्रवास केला. रस्ते चांगले आहेत. रबात मेट्रोची लोकसंख्या १२ लाख आहे. हे महत्त्वाचे बंदर अटलांटिक समुद्रावर आहे आणि बोरिग्रेग या नदीच्या मुखावर आहे. सतत येणाऱ्या गाळामुळे बंदराचे महत्त्व कमी झाले आहे. कापड, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, बांधकाम, पर्यटन आणि शासकीय कचेऱ्या ही उद्योगाची ठिकाणे आहेत. इ.स.च्या १२व्या शतकापासून या शहराला इतिहास आहे. इ.स. ११९५ मध्ये राजा हसनने मोठा टॉवर बांधण्यास सुरुवात केली. पण त्याच्या मृत्यूनंतर काम अर्धवट राहिले आहे, ते आजही तसेच आहे. टॉवर ८६ मीटर उंचीपैकी फक्त ४४ मीटर पूर्ण झालेला आहे. संपूर्ण काम लाल दगडात होणार होते. उरलेल्या इमारतीचे २०० कॉलम्स अपूर्ण अवस्थेत आजही दिसतात.

महम्मद मोठी कबर आणि हसन टॉवर (अपूर्ण) ही ठिकाणे ऐतिहासिक वारसा म्हणून बघण्यासारखी आहेत. तेथून पुढे टॅन्जिअर्स या आणखी एका मोठ्या शहराकडे गेलो.

टॅन्जिअर्स हे जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीचे, मेडिटरेनियन समुद्र आणि अटलांटिक महासागर यांना जोडणारे पश्चिमेकडील प्रवेशद्वार आहे. सध्या हे शहर ८५ लाखांचे (इ.स. २०१२ प्रमाणे) आहे. याला खूप जुना इतिहास आहे. निरनिराळ्या संस्कृती या शहराने अनुभवल्या आहेत. रोमन साम्राज्य, अरब, पोर्तुगीज वसाहत, इत्यादी राज्यकर्ते पहिले. इ.स. १४७१ मध्ये पोर्तुगिजांनी प्रत्यक्ष ताबा घेतला. नंतर पोर्तुगिजांनी हे शहर (कॅथरिन ऑफ ब्रगांझाच्या विवाहात) इंग्लंडला हुंडा म्हणून दिले होते. ब्रिटिशांशी युद्ध करून सुलतान इस्माइलने हे शहर ताब्यात घेतले, पण इंग्रजांनी शहर सोडण्यापूर्वी शहराचा पूर्ण (इ.स.१६८४) नाश केला होता.

२० व्या शतकात त्याच्या भौगोलिक परिस्थितीमुळे या शहराला खूप महत्त्व आले आहे.

सोको मार्केट, ग्रांट मशीद (प्रथम रोमन मंदिर, मग पोर्तुगीज कॅथीड्रल आणि मग सध्याची मशीद), मार्बल कारंजे, मेदिना हा भाग हिंडण्यासाठी आणि खरेदीसाठी चांगला आहे.

मोरोक्कन जेवण मात्र काही विशेष वाटले नाही. आमची इतर जेवणे नेहमीसारखी भारतीय होती. हॉटेल्स चांगली आहेत त्यामुळे पर्यटनाला पोषक वातावरण आहे. मुख्य गावातील रस्ते लहान आहेत.

नकाशा बघितला तर मोरोक्को आशियात आहे, तर पोर्तुगाल युरोपमध्ये आहे. समुद्रमार्गे थेट पोर्तुगालला जाता येते, पण आम्ही आखलेल्या प्रवासात प्रथम स्पेन होता. त्यामुळे समुद्रमार्गे स्पेनला जाऊन तेथून पोर्तुगालला गेलो.

**पोर्तुगाल देश : दर्यावर्दी आणि अंधश्रद्धा**

भारतातील बऱ्याच राज्यांना समुद्रकिनारा आहे. कोकण ही तर किनारपट्टी समजली जाते. पण दर्यावर्दी आणि धाडसी वृत्तीच्या व्यक्ती आपल्या इतिहासात त्या मानाने कमी दिसतात.

दर्यावर्दी वृत्तीमुळे पोर्तुगीज लोक समुद्रावर राज्य करत होते. छोटासा देश असून जगात कित्येक ठिकाणी वसाहती केल्या. आपल्याकडील गोवा,

दमण, दीव या पोर्तुगीज वसाहती होत्या. दर्यावर्दींनी आणि धाडसी वृत्तीच्या संशोधकांनी राजाच्या मदतीने मोठमोठ्या सफरी करून राज्य वाढविलेच, पण व्यापारही वाढविला.

लिस्बन हे राजधानीचे शहर आहे. सात टेकड्यांवर, ९५८ चौ. किमी.वर वसलेले आणि ३० लाख वस्तीचे आहे. इ.स.पूर्व १२०० पासून याला इतिहास आहे. सिंत्रा नॅशनल पॅलेस, बेल्म टॉवर, जेरीनोम्स मोनेस्ट्री, ख्रिस्ताचा पुतळा, पॅलेस चौक, अक्काडकत, वास्को-द-गामा आणि समुद्री संग्रहालय अशी पर्यटकांना आकर्षित करणारी बरीच ठिकाणे येथे आहेत. ज्यूलिअस सीझरने या शहराला म्युनसिपियाचा दर्जा दिला. म्युनिसिपिया म्हणजे थोडासा स्वतंत्र कारभार करायला परवानगी होती.

१५ ते १९ या शतकांत सिंत्रा नॅशनल पॅलेस वापरात होता. आता ते पर्यटन स्थळ झाले आहे. दोन टॉवर आहेत. एक टेकडीवर आहे आणि दुसरा टेकडीच्या उतारावर आहे. वास्तुशास्त्रात इस्लामिक, मुरीश, गोथिक, मॅन्युलीन, अरब असे मिश्रण आहे. स्वान रूम, अरब रूम, पेगास रूम, मॅन्युलीन खिडक्या हे सारे पाहण्यासारखे आहे. भूकंपामुळे थोडे नुकसान झालेले आहे. आता जागतिक वारसा झाल्यामुळे देखभाल चांगली आहे. वास्को-द-गामाची स्मृती म्हणून जे स्मारक दाखवितात, त्यात राणी फिलिया, राजा मॅन्युअल, वास्को-द-गामा, कवी कामोज, इतर संशोधक, शास्त्रज्ञ अशा बऱ्याच प्रसिद्ध व्यक्ती आहेत. स्मारक आणि संग्रहालय बारकाईने बघण्यासारखे आहे. जवळजवळ १७ हजार वस्तू प्रदर्शनात आहेत. जुन्या बोटी, शस्त्रे, कपडे, कागद, इत्यादी वस्तू आहेत. ओशिनरिओत स्कुबा सुट न घालता समुद्रतळाचे दर्शन घेता येते. जुनी पाणीपुरवठा करणारी अक्काडकत १८ किमी. लांब, १०९ कमानी असलेली आणि टेकड्यांवरून जाणारी आहे. पेशव्यांनीदेखील अशीच एक पाणीपुरवठा योजना कात्रज ते पुणे अशी सुमारे १०-१५ किमी. लांबीची भूमिगत जलवाहिनी टाकून केली होती. त्या जलवाहिनीवर मध्येमध्ये हवेच्या उच्छ्वासाची सोय केली होती. त्याला जोडूनच पर्वतीजवळ ४० एकर जागेत तळे आणि बाग यांची सोय केली होती. आता मात्र या इतिहासाला महत्त्व दिले जात नाही.

लिस्बनची आकाशरेषा ख्रिस्ताच्या प्रचंड पुतळ्याने लक्षात राहते. दुसऱ्या महायुद्धात पोर्तुगालचे नुकसान झाले नाही म्हणून हा पुतळा इ.स.

१९५९ मध्ये उभा केला आहे. दक्षिण अमेरिकेतील रिओ-ड-जनेरिओ येथील पुतळ्याप्रमाणेच पण उंची (२८ मी.) कमी आहे. एकूण लिस्बनमधील इमारती बघण्यासारख्या आहेत. पण अशा इमारती राजेरजवाड्यांच्या काळातच निर्माण होऊ शकल्या.

लिस्बनहून पाहायला गेलो सेन्ट फतीमा बॅसिलिका हे कॅथालिक धर्माचे पवित्र स्थान, चॅपल ऑफ अप्पारिशन्स आणि ख्रिस्ताचे कॅथीड्रल बघण्यासाठी. तेथील नीटनेटकेपणा उल्लेखनीय आहे.

लिस्बनहून काही अंतरावर कोव्हा-ड-इरिया या छोट्या गावात १३ मे, १९१७ ला तीन मुलांना; गुराखी/मेंढपाळ लुसिया, जसिंता आणि मार्त्तो यांना वीज, कडकडाट, ढग आणि पाऊस अशा वातावरणात एका झाडाजवळ दिव्य शुभ्र वेषातील स्त्री दिसली. अतर्क्य दृश्य दिसल्याने ते चकित झाले. मेरीच्या नावाने घोष करण्यास सांगितले. दर १३ तारखेला ती दिसणार होती आणि जगाच्या शांततेसाठी संदेश देणार होती. पुन्हा पुढील १३ तारखेला तेच दृश्य त्या मुलांना दिसले. तिने मुलांना तीन गुप्त संदेश दिले. त्यांपैकी दोन त्या मुलांनी इतरांना सांगितले. सहा वेळा ती दर्शन देणार होती. जनतेचा विश्वास बसला. शासकीय अधिकाऱ्यांचा विश्वास न बसल्याने १३ ऑगस्टला त्या तिघांना कारावासात टाकले, पण जनतेच्या दबावाखाली १५ ऑगस्टला सोडण्यात आले. त्या महिन्यात १३ च्याऐवजी १५ तारखेला दर्शन दिले असे म्हणतात. १३ ऑक्टोबरला ४० हजार ते १ लाख भाविक जमा झाले होते. कॅथॉलिक चर्चने त्या अद्‌भुत घटनेला मान्यता दिली. सध्या तेथे लाखो भाविक दरवर्षी जमा होऊन प्रार्थना करतात. तीनही वास्तू फारच छान आहेत. नवीन चर्च काही हजार भाविकांना सहज सामावून घेईल. बॅसिलिका आणि चर्च यांत ३०० ते ४०० मीटर्स अंतर आहे. पूर्ण टाइल्सचा वापर करून आवार उत्तम राखले आहे. बाजूला खूप झाडे आहेत. तेथे सुमारे २ मीटर बाय ३ मीटरचे प्लॅस्टिक रोल भाड्याने मिळतात. भाविक या रोलवरून लोळतलोळत हे अंतर पूर्ण करतात. श्रद्धा अशी आहे की, यामुळे पुण्य लागते आणि जागतिक शांतता लाभते. शेकडो भाविक लोळताना पाहून आपल्याकडील निरनिराळे नवसपूर्तीचे उपक्रम डोळ्यांसमोर येतात. मानवाचा रंग, जात, धर्म, राहण्याची भौगोलिक परिस्थिती, आर्थिक स्थिती इत्यादी काहीही असो, आतला मानव आणि त्याची भावना यांत विशेष फरक नसतो

असे जाणवते. बॅसिलिका ऑफ आवर लेडी, हाउस ऑफ लुसिया आणि पॅरिस चर्च हे बघितल्यावर आणि तेथील वातावरण अनुभवल्यावर श्रद्धा कशी आणि कोणत्या रूपात असते, हे प्रचितीस येते. वास्तू म्हणून अतिशय उत्तम आहेत.

पोर्तुगालने जगाला नवीन देश दिले, शास्त्रीय विचार, समुद्रप्रवासातील विविध उपकरणे आणि धाडस दाखविले, पण एक माणूस विचारात घेतला की, श्रद्धा-अंधश्रद्धा आलीच.

पोर्तुगाल खरेच बघण्यासारखा आहे. जाण्याअगोदर थोडा इतिहास आणि भूगोल जाणून घेतला, तर पर्यटन जास्त परिणामकारक होईल. एक विचार मात्र शिल्लक राहतो तो म्हणजे आपल्याकडे मोठा समुद्रकिनारा आहे, पण दर्यावर्दी झाल्याचे, नवीन देश पादाक्रान्त केल्याचे इतिहासात दिसत नाही. शिवाजी महाराजांनी समुद्राचे महत्त्व ओळखून समुद्री किल्ले, मासेमारीच्या छोट्या नावा, पडाव इत्यादी नीट केल्याचे आणि संभाजी राजांनी जहाज बांधल्याचे उल्लेख आहेत. कोणाही साहसी व्यक्तीने राजाश्रयाने दर्यावर्दी सफर केल्याचे आणि नवीन देश बघितल्याचे उल्लेख वाचनात येत नाहीत.

धार्मिकता, परकीय आक्रमणे, समुद्र पार न करणे ही कारणे पुढे येतील, पण त्यांना तोंड न देता आपण आकुंचित झालो. पण पोर्तुगालने शास्त्रीय विचारसरणी, पराक्रम, धाडसीपणा आणि राजाश्रय यांचा योग्य वापर करून उत्तर दिले आहे.

-- -- --

# २०. इटली, रोम आणि व्हेटिकन

इटली हे राष्ट्र युरोपमधील फ्रान्स, स्विझर्लंड, ऑस्ट्रिया, स्लोवाकिया आणि अल्पाइन रेन्ज असे विविध प्रदेश तसेच ॲन्ड्रियाटीक समुद्र आणि मेडिटेरिअन समुद्र यांनी वेढलेले आहे. मुख्य इटलीपासून सुमारे २०० किमीच्या आत सिसिली आणि सारीदिना ही जवळची बेटेही त्यांचाच भाग आहेत. खास वैशिष्ट्य म्हणजे इटलीत सेन्ट मरिना आणि व्हेटिकन सिटी ही स्वतंत्र राज्ये आहेत. इटलीची लोकसंख्या सुमारे ६ कोटी आहे. इटलीचा इतिहास इ.स. पूर्व २५०० पेक्षा जुना आहे. बरीच युद्धे इटलीने सहन केलेली आहेत. रोमन राज्य (इ.स.पू ७५३), रोमन प्रजासत्ताक (इ.स.पू ५१०), रोमन साम्राज्य (इ.स.पू २७) असे बदलही अनुभवले आहेत.

अलेक्झांडर सहावा, जुलिअस सीझर, एम्परर ऑगस्टस, नीरो (कथित राजधानी जळत असताना फिडल वाजवणारा) आणि शेवटी मुसोलिनी असे राज्यकर्ते इटलीने पाहिले.

योद्धे आणि पराक्रमी पुरुष पाहिले, त्यापेक्षा जास्त प्रसिद्ध असलेले मायकेलएंजेलो, पेरुजीनो, राफेल, लिओनार्द-ड-विंसी, माचव्हाली हे कलाकार इटलीने जगाला दिले. दर्यावर्दी पोलो, कोलंबस असे धाडसी खलासी दिले. प्रसिद्ध इमारतींची आणि शिल्पांची यादी फारच मोठी आहे. धुळीच्या आणि गरम राखेच्या खाली पूर्ण गाडले गेलेले पॉम्पी शहरसुद्धा इटलीमध्येच आहे. कोलोसिअमसारखी क्रीडाभूमी/आखाडा इ.स.च्या पहिल्या शतकात बांधणे हे समृद्धीचे आणि कल्पकतेचे द्योतक आहे. कलता मनोरा आणि त्याच्या आसपासच्या इमारती पाहण्यासाठी कितीही वेळ दिला तरी कमी पडेल. व्हेनिसमधील शिल्प पाहतापाहता आणि फोटो घेताघेता घड्याळाकडे लक्ष राहत नाही. गोन्डोला बोटीतून कॅनलमधून सफर आणि शेजारच्या बोटींतून फिरणाऱ्या आणि प्रेमात मश्गूल असलेल्या जोड्या हेही अनुभवायला मिळते. फ्लोरेन्स, मिलान, इत्यादी शहरे आहेतच. इटली, रोम आणि व्हेटिकन बघायचे तर एखादा महिनासुद्धा पुरणार नाही. तेथील

मार्गदर्शक खिसेकापूंपासून सावध राहण्याच्या सूचना मात्र वारंवार देतात. सुदैवाने मला त्याचा अनुभव आला नाही.

**१ कोलोसिअम (फ्लेवियन स्टेडिअम) :** एम्परर व्हेस्पिअनच्या काळात सुरू झाले, पण टायटसच्या काळात इ.स. ८० मध्ये पूर्ण झाले. इ.स. ८१ ते ९६ मध्ये काही सुधारणा झाल्या. ६ एकर जमिनीवर, १८९ मीटर लांब आणि १५६ मीटर रुंद आणि ४८ मीटर उंच अंडाकृती बांधकाम आहे. ५० हजार ते ८० हजार प्रेक्षक बसू शकतील अशी त्या स्टेडिअमची क्षमता आहे. सुरुवातीला युद्ध प्रात्यक्षिके, खऱ्या जिवंत प्राण्यांची शिकार, फाशीची शिक्षा, नाटके इत्यादींसाठी वापर होत होता. उद्घाटनाला ९००० हिंस्र प्राण्यांची हत्या केली गेली. कालांतराने हे सर्व बंद झाले. इ. स. २१७ साली आगीने आणि इ.स. ४४३ साली भूकंपाने त्या स्टेडिअमचे नुकसान झाले. त्याचा आधी दफनभूमी म्हणून आणि नंतर लोकरीच्या कारखान्यासाठी वापर झाला. आता जागतिक वारसा म्हणून त्याला संरक्षण मिळाले आहे.

**२ पिसाचा कलता मनोरा :** कॅथीड्रलच्या शेजारी हा बेल टॉवर म्हणून बांधण्यात आला. बोनानो पुसानो हा शिल्पकार स्थापत्यशास्त्रज्ञ याच्या देखरेखीखाली इ.स. ११७३ मध्ये काम सुरू झाले. बांधकाम चालू असतानाच टॉवर कलणे सुरू झाले. भुसभुशीत पाया, वारा आणि पाऊस ही कारणे सांगण्यात आली. जीनोआ, लुका, फ्लोरेन्स इत्यादी युद्धांमुळे काम लांबत गेले. १४५०० मेट्रिक टन वजन, बाहेरच्या भिंती २.४४ मीटर रुंद, ५६ मीटर उंच आणि सात मजले असे ते भव्य काम होते. एका बाजूला २९६ पायऱ्या आणि दुसऱ्या बाजूला २९४ पायऱ्या आहेत. सातव्या मजल्याला एका बाजूला २ पायऱ्या कमी आहेत. सुरुवातीला कल ५.५ डिग्री होता, तो दुरुस्ती केल्यावर ३.९ डिग्री झाला. इ.स. १३७२ मध्ये काम पूर्ण झाले. १९९९–२००१ मध्ये इमारत भक्कम करण्याचे काम झाले. त्या वेळी एका बाजूकडील ३८ घनमीटर माती काढण्यात आली. बेल टॉवरवर सात स्वरांच्या सात घंटा आहेत. इ.स. १९८७ पासून हा जागतिक वारसा म्हणून जाहीर झाला आहे. पर्यटकांनी जरूर भेट द्यावी असाच आहे.

**३ ट्रेवी कारंजे :** ट्रेवी कारंजे हा एक अद्‌भुत शिल्पाचा नमुना आहे. आख्यायिका बऱ्याच आहेत. रोमला पाणी पुरविण्यासाठी बांधलेली ॲक्वा डक्ट मुळात १३ किमी. योजलेली होती. मात्र प्रत्यक्षात २२ किमी. पर्यंत

वाढली. अॅक्वा नदी जवळजवळ ४०० वर्षे रोमला पाणी पुरवत होती. तिच्यावर डक्ट बांधण्याची योजना नोकोला सल्वीने आखली आणि पित्रो ब्रासीने ती पूर्ण केली. कारंजे आणि शिल्प अप्रतिम आहे. तीन रस्ते मिळतात अशा ठिकाणी असल्याने ट्रेवी शब्द आला आहे. एक वदंता आहे की इ.स.पू. १९ मध्ये हे पाण्याचे ठिकाण एका युवतीने सैन्याला दाखविले म्हणून ते व्हर्जिन पाणी समजले जाते. त्यात उजव्या हाताने डावीकडून नाणे टाकल्यास मनःकामना पूर्ण होते, असा समज आहे. तिथे येणारे पर्यटक रोज सुमारे ३ हजार युरो टाकतात आणि त्या कारंज्याची देखभाल होण्यास त्याची मदत होते.

**४ व्हेनिस :** उत्तर पूर्व इटलीत ११८ छोट्या बेटांचे पुलांनी किंवा कॅनॉलनी जोडलेले हे शहर आहे. पोनदी आणि पिव्हे ह्या नद्यांच्या मुखांवर वसलेले आहे. ४१४ चौ. किमी. क्षेत्राचे, समुद्रसपाटीपासून केवळ ३ मी. उंचीवर आणि लोकसंख्या २ लख ७० हजार असलेले हे शहर आहे. सिटी ऑफ ब्रिजेस, वॉटर सिटी, फ्लोटिंग सिटी, सिटी ऑफ कॅनॉल, मास्क सिटी अशा विविध नावांनी ओळखले जाते. अॅद्रीयातिक समुद्रच्या तोंडावर असल्याने महत्त्वाचे शहर आहे. ३००० जहाजे, ३६००० खलाशी या उद्योगात होते. ९ ते १२ या शतकांपर्यंत सिटी हे राज्य होते. रोमशी सहकार्य, असहकार, लॅटिन एम्पायर, कॉन्स्तान्तिनोपालचा ताबा, सुलतान मेहमेदबरोबर युद्ध असे बरेच चढउतार व्हेनिसने पाहिले आहेत. कोलंबसने इंडियाला जाण्याचा नवीन मार्ग काढल्याने आणि मार्कोपोलो चीनला गेल्याने व्हेनिसचे महत्त्व कमी झाले. इ.स.१५७५-७७ या काळात प्लेगने ५० हजार लोक मेले. इ.स. १८६६ मध्ये इटलीचे राज्य निर्माण झाले

आज व्हेनिस शिल्पकला, उत्तम इमारती, कॅनॉल, रस्ते यांकरिता प्रसिद्ध आहे. गोन्डोलात बसून कॅनॉलमधून हिंडताना मजा येते. शेजारील गोन्डोलात एखादे नवविवाहित अथवा तरुण जोडपे मश्गूल झालेले दिसते. येथील पुतळ्याचे शिल्पकार आणि पुतळे लक्षात राहतात. ज्या पर्यटकांना शिल्पकला, चित्रकला, वास्तुशास्त्र, पूलबांधणी यांत रस असेल, तर त्यांना बघण्यासारखे खूपच आहे.

**५ पोम्पी शहर :** पॉम्पी शहर नेपल्सच्या जवळ होते. ज्वालामुखीप्रवण आणि भूकंपप्रवण असलेला व्हेसुलिअस हा डोंगर जवळच आहे. इ.स.पू.

१७८० पासून हे शहर अस्तित्वात होते. इ.स. ६३ ला भूकंपाने धक्का दिला होता. परंतु लोकांनी शहर सोडले नव्हते. इ.स. ७९ मध्ये प्रथम ज्वालामुखीतून गरम राख येणे सुरू झाले. बरेच नागरिक शहर सोडून गेले, पण उरलेले नागरिक त्या गरम राखेखाली जिवंत गाडले गेले. ९०० डिग्री तापमानाची गरम राख असावी असे संशोधक म्हणतात. सुमारे १००० लोक गाडले गेले. राखेचा थर एवढा प्रचंड होता की, या शहराचे अस्तित्व इ.स.१७४८ मध्ये कालव्याचे काम करणाऱ्या एका अभियंत्याला जाणवले, पण त्याने इतरांना सांगितले नाही. इ.स.१७८० साली उत्खनन सुरू झाले. सर्व माणसे मृत, घरे, रस्ते, घरातील चित्रे, पाणीपुरवठ्याची व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहे, बँक रिसीट्स, चित्रांचे रंग तसेच्या तसेच होते. भिंतींवर स्त्री-पुरुष संभोगाची बीभत्स आणि अश्लील चित्रे काढलेली आहेत. उत्खनननानंतर मृत व्यक्तींचे प्लास्टर कास्ट करून प्रत्यक्ष दृश्ये निर्माण केली आहेत.

आता हे मोठे पर्यटन स्थळ आणि संशोधन स्थळ झाले आहे आणि जागतिक वारसा म्हणून जाहीर झाले आहे. इ.स. १९४४ नंतर व्हेसुलीअस ज्वालामुखी जागृत झालेला नाही.

**व्हेटिकन सिटी**

टायबर नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर रोम शहरातच व्हेटिकन सिटी आहे. ह्या शहराला इ.स.पू १४ पासून इतिहास आहे. ख्रिश्चन धर्माच्या अगोदरपासूनच हा भाग पवित्र मानला जात होता. त्याच्या बांधकामास सुरुवातीला मोठ्या बागांपासून प्रारंभ झाला आणि नंतर एम्परर नीरोने ते पूर्ण केले. तो भाग नीरो सर्कस म्हणून ओळखला जाऊ लागला. नंतर दफनभूमी म्हणून हा भाग वापरला जात होता. इ.स. ६४ साली रोमला लागलेल्या आगीत नुकसान झाले. नीरो सर्कसच्या चौकातच सेंट पीटर्सला क्रूसिफाय (मारण्यात) करण्यात आले, असे समजतात. हळूहळू इमारतींना प्राधान्य मिळत गेले. दफनभूमीच्या जागेत इ.स.३२६ मध्ये सेंट पीटर्स बॅसिलिका बांधण्यात आले. ५व्या शतकात राजवाडा बांधण्यात आला. पोपचे निवासस्थान होते. निरनिराळ्या देशांतील कॅथॉलिक क्लर्जिमान या राजवाड्यात राहत होते. ओबोलिस्क तर नीट पाहायलाच हवे. नंतर हा राजवाडा रोमने ताब्यात घेतला. इ.स. १९२९ च्या तहानुसार मुसोलिनीने

व्हेटिकनला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला. दुसऱ्या महायुद्धात, ११ जुलै १९४३ रोजी ५०० विमानांनी तुफानी हल्ला केला. १३ ऑगस्ट १९४३ रोजी दुसरा हल्ला झाला. या हल्ल्यातून व्हेटिकन आणि काही चांगल्या इमारती बचावल्या म्हणून पर्यटकांना आज इतिहास पाहायला मिळतो आहे.

११ फेब्रुवारी १९२९ रोजी लॅटेरन येथे तह झाला. सेन्ट पीटर्स बॅसिलिका, सिस्टीन चॅपेल, व्हेटिकन या अप्रतिम इमारती झाल्या आहेत. १०९ एकर जागा, ७९८ (२००० प्रमाणे) लोकसंख्या, युरोचा वापर, स्वतंत्र राज्याचा दर्जा असे हे राष्ट्र आहे. जगातील सर्वांत लहान राज्य आहे. पर्यटन, पोस्टेज, स्मृतिवस्तू, प्रवेश शुल्क, संग्रहालय, प्रकाशने ह्या आर्थिक जमेच्या बाजू आहेत. इमारती, त्यांतील शिल्पे, चित्रे, मोझेइक काम उत्तम आहे. प्रसिद्ध चित्रकारांनी आणि शिल्पकारांनी इमारती सजविल्या आहेत. मायकेलएॅन्जेलोचा मोठा सहभाग आहे. पुतळे, नक्षीकाम, अवाढव्यता, पण नीटनेटकेपणा, स्वच्छता ह्यांचे वर्णन करणे सोपे काम नाही. ते प्रत्यक्ष बघायलाच हवे.

आमच्या टूर कार्यक्रमात इटली आणि रोम लिहिलेले होते. सर्वांनी रोममध्ये व्हेटिकन सिटी हे ठिकाण गृहीत धरले होते. व्हेटिकनसाठी निश्चित वेळही आखलेला होता. व्हेटिकन नाही असे कळल्यावर सर्व प्रवाशांनी तक्रार करताच व्हेटिकन दाखविले आणि ते व्यवस्थित पाहता आले.

-- -- --



**फोटो क्र. १**
लेखक श्री. सिंगवी, सौ. सिंगवी,
कन्या विद्युल्लता आणि तृप्ती,
जामात संजय नहार आणि
नात निराली समवेत
आल कपितान आणि
सिकोवा वृक्षांच्या सान्निध्यात.
(लेख : कॅलिफोर्नियातील निसर्गरम्य 'योसेमिटे पार्क')

**फोटो क्र. २**
पानगळ सुरू व्हायच्या आधी होणारी रंगांची बरसात
(लेख : पश्चिमेकडील 'झाडाझडती' (पानगळ))






**फोटो क्र. ३**
शिकागो बोटॅनिकल गार्डनचे
निरीक्षण करताना
लेखक श्री.पुनम सिंगवी आणि
सौ.पुष्पलता सिंगवी
(लेख : शिकागो बोटॅनिकल गार्डन)



**फोटो क्र. ४**
झेफिरच्या मार्गावरील डोंगराच्या कुशीत वसलेले एक टुमदार खेडे
(लेख : रॉक रॉक रॉकी अॅन्ड सॅन्ड सॅन्ड सॅन्डी)



**फोटो क्र. ५**
हालोवीनच्या उत्सवाचा निसर्गरक्षणासाठी असाही उपयोग केला जातो.
(लेख : पाश्चात्त्य सण 'हालोवीन')




**फोटो क्र. ६**
मॉर्टनमध्ये निसर्गशिक्षण देणारा एक सुरेख फलक
(लेख : वृक्षसंस्कृतीचे धडे देणारे 'मॉर्टन आर्बोरेटम')



**फोटो क्र. ७**
लेखक श्री. सिंगवी आणि
त्यांचे सहकारी श्री. राजाभाऊ कोटणीस
'ॲग्रि मशीनरी न्यूज व
फार्मिंग मेकेनायझेशन'
या नियतकालिकाच्या संपादकांबरोबर
(लेख : जपान....)



**फोटो क्र. ८**
शेरलॉक होम्स म्युझियममध्ये
शेरलॉक होम्स, डॉ. वॉटसन आणि
मिस हडसन यांच्या डमीजसमवेत
लेखक श्री.पुनम सिंगवी
(लेख : शेरलॉक होम्स म्युझियम)



**फोटो क्र. ९**
इन मीन तीन वॉक इन चीन
(लेख : इन मीन तीन वॉक इन चीन)

**फोटो क्र. १०**
कॉन्फरन्समध्ये
सादरीकरण करताना
लेखक श्री. पुनम सिंगवी
(लेख : इन मीन तीन वॉक इन चीन)





**फोटो क्र. ११**
चीनच्या शाही भूमीवरील राजवाडा
(लेख : इन मीन तीन वॉक इन चीन)

**फोटो क्र. १२**
लक्षद्वीपची सफर घडवून आणणारे
चार मजली 'केवराट्टी' जहाज
(लेख : लक्षद्वीप)





**फोटो क्र. १३**
यासार विद्यापीठात
सादरीकरण करताना
लेखक प्रा. अच्युत ओक
(लेख : यासार विद्यापीठ....परिषद
तुर्कस्तान २००७)




**फोटो क्र. १४**
प्रा. भोळे, लेखक प्रा. ओक आणि श्री. खरे
विषुव वृत्तावर
(लेख : केनिया : पर्यटन आणि पर्यावरण)



**फोटो क्र. १५**
कोलंबसची शवपेटी
(लेख : दर्यावर्दी ख्रिस्तोफर कोलंबस :
त्याच्या अस्थी, वंश, रंग आणि
डीएनए)



**फोटो क्र. १६**
विजेलंड नॉर्वे : एक शिल्प
(लेख : नॉर्वे-स्वीडन-फिनलंड (स्कँडेनेव्हियन राष्ट्रे)



**फोटो क्र. १७**
अंदमान त्सुनामी स्मारक
(लेख : काळे पाणी ते निळे पाणी)

**फोटो क्र. १८**
लेखक प्रा. ओक आणि श्री. सोमण
क्रेमलिन चौकात
(लेख : रशियाची दोन महत्त्वाची शहरे :
सेंट पीटर्सबर्ग आणि मॉस्को)





**फोटो क्र. १९**
सेंट कॅथरीन राजवाडा, रशिया
(लेख : रशियाची दोन महत्त्वाची शहरे : सेंट पीटर्सबर्ग आणि मॉस्को)



**फोटो क्र. २०**
ॲक्रोपोलीस, अथेन्स
(लेख : इजिप्त, ग्रीस आणि तुर्कस्तान)



**फोटो क्र. २१**
टोपकापी राजवाडा, तुर्कस्तान
(लेख : इजिप्त, ग्रीस आणि तुर्कस्तान)



**फोटो क्र. २२**
पोर्तुगाल, सेंट फतीमा कॅथेड्राल
(लेख : मोरोक्को आणि पोर्तुगाल)



**फोटो क्र. २३**
लेखक प्रा. ओक व्हॅटिकनमध्ये
(लेख : इटली आणि व्हॅटिकन)



**फोटो क्र. २४**
इटली राजवाडा
(लेख : इटली आणि व्हॅटिकन)




पाश्चात्य जगतातील 'फॉल सीझन' अनुभवताना लेखक श्री. पुनम सिंगवी




पिरॅमिड आणि स्फिंक्ससमोर लेखक प्रा. अच्युत ओक

# आमची जागतिक मुसाफिरी



पुनम सिंगवी



अच्युत ओक

लेख लिहिताना मोठे प्रवासवर्णन देणे हा विचार दोघांचाही नव्हता. युरोपचे वैभव आणि भव्यता; अमेरिकेचे आणि जपानचे भौतिक ऐश्वर्य आणि त्यांची औद्योगिक प्रगती; अंदमान आणि लक्षद्वीप येथील मानवाने हात न लावलेले सृष्टिसौंदर्य; आफ्रिकेच्या एका कोपऱ्यात असलेल्या चिमुकल्या केनियासारख्या देशांच्या गवती पठारांवर निर्धास्तपणे बागडणारे आणि परस्परावलंबी सहजीवनाची (mutual co-existence) अनुभूती देणारे वन्य प्राणी तसेच स्पेनच्या आणि ग्रीसच्या निळ्याशार समुद्राने दिलेला आनंद; आणि अमेरिका, इंग्लंड, जपान, तुर्कस्तान, रशिया, फिनलंड, भारतातीलच अंदमान आणि लक्षद्वीप येथील चित्ररूप दर्शन पुस्तकाच्या मर्यादा लक्षात घेऊन वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा हा एक प्रयत्न आहे.